# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १२/२०१०** **दिनांक २१.११.२०१०**

**स्थळ - शिर्डी (साईनिवास अतिथीगृह)** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा रविवार दिनांक २१.११.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-१०४७५-२०१०, दिनांक १६ नोव्हेंबर,२०१० रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक २१.११.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष
०२. मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष
०३. मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग
०४. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०५. मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे
०६ मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
०७. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०८६. मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्ड्ये
०९. मा.डॉ.प्यारेलाल तिवारी
१०. मा.सौ.अलका बाळु शेजवळ

मा.किशोर रा.मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे, यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत सर्वश्री मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव, मा.श्रीमती रिम्पल लोहिया,मा.रमाकांत गणेश कर्णिक, यांनी दूरध्वनीवरुन तसेच मा.समि खतिब व कॅप्टन सुरेश वासूदेवा यांनी फॅक्स पत्राव्दारे कळविले आहे. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

सभेचे सुरुवातीस शिर्डी नगरपंचायत शिर्डीच्या नव्याने नियुक्त झालेल्या नगराध्यक्षा व संस्थान अधिनियम कलम ५(३) नुसार विश्वस्तव्यवस्थेच्या पदसिद्ध सदस्या, सौ.अलका बाळु शेजवळ यांचे संस्थानचे वतीने शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१** **दिनांक १०.१०.२०१० रोजी शिर्डी (श्री साईबाबा हॉस्पिटल) येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र. ८४९** दिनांक १०.१०.२०१० रोजी शिर्डी (श्री साईबाबा हॉस्पिटल) येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या-

**(०१) निर्णय क्र. ७७६**

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे, नाक-कान-घसा तज्ञ, श्री साईनाथ हॉस्पिटल हे पुढील महिण्यात ट्रेनिंगसाठी परदेशी जात आहे. त्यामुळे त्यांचा राजीनामा तूर्त न घेता ते स्वतः ट्रेनिंगमधून आल्यानंतर मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडे राजीनामा देतील असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. तद्‌नंतर त्यांनी राजीनामा न दिल्यास डॉ.गेठे यांना संस्थान सेवेतून मुक्त करण्यात यावे, असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.योगेश बाळकृष्ण गेठे, नाक-कान-घसा तज्ञ, श्री साईनाथ हॉस्पिटल यांना राजीनामा देण्याचे सांगण्यात यावे, त्यांनी राजीनामा न दिल्यास डॉ.गेठे यांना त्वरीत संस्थान सेवेतून मुक्त करण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/ अधिक्षक,आस्थापना)

**(०२) निर्णय क्र. ७८५ (०४)**

श्रीसाईबाबा हॉस्पीटलमधील फिजीशियन डॉ.गिरी यांचेबाबत तक्रार असल्याने त्यांची बदली त्वरीत कायमस्वरुपी श्रीसाईनाथ रुग्णालयाकडे फिजीशियन पदावर करण्यात यावी, असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

श्रीसाईबाबा हॉस्पीटलमधील फिजीशियन डॉ.गिरी यांचेबाबत तक्रार असल्याने त्यांची बदली त्वरीत कायमस्वरुपी श्रीसाईनाथ रुग्णालयाकडे फिजीशियन पदावर करण्यात यावी, **ते हजर न झाल्यास त्यांना सेवामुक्त करण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक,आस्थापना)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक १०.१०.२०१० रोजी शिर्डी (साईनिवास अतिथीगृह) येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र. ८५०** दिनांक १०.१०.२०१० रोजी शिर्डी (साईनिवास अतिथीगृह) येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या-

**(०१) निर्णय क्र. ७९७**

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम प्रकल्पाचे देणगीदार साईभक्त मा. श्री. के. व्ही. रमणी, कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, पट्टीपुलम, चेन्नई (तामिळनाडू) यांना साईआश्रम प्रकल्प भाग १ मधील २० खोल्या संस्थान निश्चित करील ते स्वच्छता व देखभाल शुल्क भरणेचे अटीवर, त्यांचे ट्रस्टमार्फत येणाऱ्या भक्तांसाठी शिर्डी साई ट्रस्टमार्फतच वाटप व वापर करणेस, तसेच त्यांचे ट्रस्टचे कार्यालय सुरु करणेसाठी देण्यात यावे असे ठरले.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम प्रकल्पाचे देणगीदार साईभक्त मा. श्री.के.व्ही.रमणी, कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, पट्टीपुलम, चेन्नई (तामिळनाडू) यांना साईआश्रम प्रकल्प भाग १ मधील २० खोल्या संस्थान निश्चित करील ते स्वच्छता व देखभाल शुल्क भरणेचे अटीवर, त्यांचे ट्रस्टमार्फत येणाऱ्या भक्तांसाठी शिर्डी साई ट्रस्टमार्फतच वाटप व वापर करणेस देण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**(०२) निर्णय क्र.८२६**

यावर सविस्तर चर्चा होऊन,कु.श्रद्धा शरद भोंगळे, हिस इयत्ता १० वी अखेर पर्यंत शैक्षणिक फी माफीची सवलत देण्यात यावी,असें ठरलें

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन,कु.श्रद्धा शरद भोंगळे, हिस इयत्ता १० वी अखेर पर्यंत शैक्षणिक फी माफीची सवलत देण्यात यावी, याकामी शासनाची मान्यता घेण्यात येऊन कार्यवाही करण्यात यावी, असें ठरलें. (कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मि.स्कुल)

**(०३) निर्णय क्र. ८४३ (०३)**

सदर हॉलचे डिपॉझिट रुपये ५०००/- व १२ तासासाठी सेवाआकार रुपये ५,०००/- घेण्यात यावा.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

सदर हॉलचे डिपॉझिट रुपये ५०००/- व २४ तासासाठी सेवाआकार रुपये ५,०००/- घेण्यात यावा. मात्र २४ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी सदर हॉल देण्यात येऊ नये.

(कार्यवाही-अधिक्षक,श्री साईप्रसाद निवासस्थाने/जनसंपर्क अधिकारी/संरक्षण विभागप्रमुख)

**(०४) निर्णय क्र.८४४**

यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर नवीन व्यवसाय सुरु करणेकामी मा.जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे शुल्क भरुन त्यांचेकडून विहीत नमुन्यात अर्ज घेऊन, विहीत पध्दतीने कार्यवाही करणेस, याकामी संस्थेतील सध्याच्या ट्रेडच्या जागा बदलणे, सध्या उपलब्ध कार्यशाळा व इमारतींमध्ये काही फेरबदल व दुरुस्त्या करणेस, आवश्यक निदेशक व अनुषंगिक पदे भरणेस, साहित्य खरेदीस व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कोणतेही नविन व्यवसायाच्या तुकड्या सुरु न करता सध्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सुरु असलेल्या व्यवसायांमध्ये ज्या व्यवसायांना जास्त मागणी आहे अशा व्यवसायांच्या तुकड्या वाढविण्यात याव्यात. याकामी उपलब्ध कार्यशाळा व इमारतींमध्ये काही फेरबदल व दुरुस्त्या करणेस,आवश्यक निदेशक व अनुषंगिक पदे भरणेस, साहित्य खरेदीस व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच नवीन व्यवसाय सुरु करणेकामी मा.जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे भरलेले शुल्क सोडून देण्यात यावे,असें ठरलें. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०३** **(अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१.** **(अ) जमा खर्च तक्ता माहे सप्टेबर -२०१०**

**(ब) माहे सप्टेबर-२०१०मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे ऑक्टोबर २०१० मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे ऑक्टोबर-२०१०मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(A) माहे सप्टेंबर,२०१० मधील जमा रु.१९,८०,३४,१०४/- आणि खर्च रुपये १३,३६,७२,९२४/- चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील सप्टेंबर,२०१० रुपये १,५७,२७९/- चा तक्ता,दिनांक ३०.१०.२०१० अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ४७७,४०,२१,७१७/- चा तक्ता, माहे ऑक्टोबर,२०१० या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या रुपये ९,०७,२३,४४७/- देणगीचा तक्ता, माहे ऑक्टोबर,२०१० मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रुपये ३,६८,६४९/-चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८५१ नोंद घेण्यात आली.**

---

**०२. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये सप्टेबर-२०१० या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

(B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे सप्टेंबर,२०१० मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रुपये १९,८२,३९२/- देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८५१ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. माहे ऑगस्ट-२०१० मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडीकल स्टोअरचे लेखा अहवालाची नोंद घेणे बाबत.**

(C) श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी माहे ऑगष्ट,२०१० या महिन्यात रुपये ९,९०,५८०/- मात्र देणगीचे चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र. ८५१ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षक)

---

**०४. श्री साईनाथ रुग्णालयात माहे सप्टेबर-ऑक्टोबर २०१० या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

(D) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे सप्टेंबर-ऑक्टोबर,२०१० मध्ये अनुक्रमे रुपये ४०,०७,२६७/- व रुपये ३७,५८,२१७ देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८५१ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

---

**०५. श्रीसाईनाथ रुग्णालय व श्रीसाईनाथ रक्तपेढीमध्ये सप्टेबर २०१० या महिन्यात वैद्यकीय बीलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे बाबत.**

(E) साईनाथ रुग्णालयात माहे सप्टेंबर २०१० मध्ये अंतररुग्ण व बाह्यरुग्ण रुपये १,३७,५१७/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ४१,८००/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८५१ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षक)

---

**०६. श्री साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर -२०१० मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

(F) साईनाथ रुग्णालयात माहे ऑक्टोबर,२०१० मध्ये अंतररुग्ण व बाह्यरुग्ण रुपये ३९,९२२/- थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ४२,०५०/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८५१ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षक )

---

**०७. माहे माहे सप्टेबर-२०१० मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(G) माहे सप्टेंबर,२०१० संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४५,५६५ मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ८५१ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

---

**०८. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

(H) बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८५१ नोंद घेण्यात येऊन तक्ता "ब" मधील खालीलप्रमाणे बांधकामाची अंतिम बिले अदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(०१) संस्थानचे वाहन विभागासाठी सर्व्हे नं.१०९ मधील गोवरी शेडचे पूर्वेकडील जागेत पार्किंग शेड उभारणेकामी शापूरजी पालूनजी ॲण्ड कं.लि.,नाशिक यांचे अंतिम बिल रुपये ७,५५,१३१/-आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(०२) श्रीसाई प्रसादालय इमारतीकरिता मेन्टेनन्स शेडचे बांधकाम करणेकामी श्री.महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर यांचे अंतिम बिल रुपये १०,८१,६९१ आदा करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(०३) संस्थानचे निमगाव-कोऱ्हाळे येथील गट नं.१६९ मधील कर्मचारी निवासस्थानाचे बाहेरील बाजूस कम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणेकामी मे.आर.एल.भूतडा,कोपरगाव यांचे अंतिम बिल रुपये १२,५८,८७९/- आदा करण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**०९. पाणी तपासणी अहवाल.**

(I) माहे ऑक्टोंबर,२०१० मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.८५१ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

---

**विषय नं.०४ श्रीसाईप्रसाद निवासस्थान व साईबाबा भक्तनिवास विभागाकडील साईभक्तांचे सोयीसाठी असलेले कॉटला रंगकाम करणे व टीपॉयचे टॉपला सनमायका बसवून रंगकाम करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) व श्री साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे खाली नमूद केलेप्रमाणे कॉटस्, टिपॉय व लगेज रॅक आहेत. सदर साहीत्य सततचे वापराने खराब झाल्याने ते दुरुस्त करुन रंगकाम करणे आवश्यक आहे.

| अ. नं. | विभागाचे नांव | कॉट | टिपॉय | लगेज रॅक |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्तनिवास (५०० रुम्स) | १७९८ | ४८६ | -- |
| ०२ | श्री साईप्रसाद निवासस्थान | | | |
| | १. साईप्रसाद नं. १ | १७४ | २० | ७८ |
| | २. साईप्रसाद नं. २ | १८२ | -- | -- |
| | ३. साईउद्यान | ६० | -- | -- |
| | ४. सेवाधाम | ४० | -- | -- |
| | ५. समर्पण | ०६ | -- | -- |
| | एकुण | २२६० | ५०६ | ७८ |

**(ब)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २२.०५.२०१० रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ४५९ नुसार, निवासस्थान विभागाकडे असणारे कॉटस्, लगेज रॅकस्, टिपॉय दुरुस्त करुन त्यांना स्प्रे पेंटींग करणे, टिपॉयचे पृष्ठभागास सनमायका बसविणे आदि कामांसाठी येणाऱ्या रक्कम रु. ७,०४,०७०/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून सदरचे काम करुन घेणेस मान्यता मिळालेली आहे.

**(क)** उपरोक्त काम, विशिष्ट प्रकारचे (स्प्रे पेंटींगचे व दुरुस्तीचे) व सदरहू काम प्रत्यक्ष कार्यस्थळावर पुर्ण करावयाचे असल्याने, सदरहू कामी स्थानिक वर्तमान पत्रात व संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि. २३.१०.२०१० अखेर पर्यंत स्पर्धात्मक निवीदा मागविण्यात आल्या आहेत. करीता विहीत मुदतीत खालील ठेकेदारांनी सिलबंद निवीदा सादर केल्या आहेत.

०१. रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फेब्रीकेशन, श्रीरामपूर

०२. संतोष पेंटींग वर्क्स, मुंबई

०३. उज्वला हाऊस पेन्टर्स, संगमनेर

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या तीन सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | निविदेतील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | रविंद्र रबर प्रोडक्ट ॲण्ड फेब्रीकेशन, श्रीरामपूर | १९,९९,१७४/- | १८,९९,२१५/- |
| ०२. | संतोष पेंटींग वर्क्स, मुंबई | ९,५०,२३६/- | ९,०२,७२४/- |
| ०३. | उज्वला हाऊस पेन्टर्स, संगमनेर | ६,९५,३२०/- | ६,६०,५५४/- |

**निर्णय क्र.८५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उज्वला हाऊस पेन्टर्स, संगमनेर यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०५ साईनगर कर्मचारी वसाहत परिसरातील ए टाईप अधिकारी निवासस्थान इमारतीलगत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८/०४/२०१० रोजीचे सभेतील विषय क्र. २०, निर्णय क्र. ३७५ अन्वये साईनगर ए टाईप अधिकारी निवासस्थान इमारती लगत पेव्हींग ब्लॉक बसविणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता मिळाली आहे. याकरीता इकडील विभागाचे जा.क्र.१०१२८/१० दि.२५/१०/२०१० रोजीचे कोटेशन मागणी पत्रान्वये स्थानिक ठेकेदारांकडून कोटेशन मागविणेत आले असून त्यापैकी खालील चार ठेकेदारांनी सिलबंद कोटेशन सादर केले आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१ | इं. योगेश सु. पाटील, कोपरगांव |
| ०२ | श्रेणीक प्रफुल्ल बोरा, कोपरगांव |
| ०३ | संजय गणपत गायकवाड, राहाता |
| ०४ | संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या तीन सिलबंद निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | इं. योगेश सु. पाटील, कोपरगांव | १९ % अधिक | ५ % कमी |
| ०२. | श्रेणीक प्रफुल्ल बोरा, कोपरगांव | २१ % अधिक | १३.५% अधिक |
| ०३. | संजय गणपत गायकवाड, राहाता | २.५०% कमी | अनुपस्थित |
| ०४ | संतोष नागनाथ गुंजेगांवकर, निघोज | ४% अधिक | निविदा दरात |

**निर्णय क्र.८५३ यावर सविस्तर चर्चा होऊन इं. योगेश सु. पाटील, कोपरगांव यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०६ साईआश्रम ए व बी प्रकल्पाकरीता सोलर वॉटर हिटींग सिस्टीम सुविधा पुरविणेकामी प्राप्त झालेल्या टेंडर्समधील कमर्शिअल बीड उघडून टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये, शिर्डी साइर ट्रस्ट, चेन्नई (तामीळनाडू) यांचेमार्फत साईभक्तांच्या निवासाकरीता साईआश्रम प्रकल्प देणगी स्वरुपात बांधकाम चालू आहे. संस्थानकडून उपलब्ध होणारे जागेत साईआश्रम हा प्रकल्प उभारणेत येणार आहे. या साईआश्रम इमारतीत सुमारे १०,००० साईभक्तांची निवासी व्यवस्था होणार आहे. या साईआश्रम प्रकल्पाच्या इमारतींमध्ये साधनगृहासह राहण्याच्या खोल्या, धर्मशाळा, स्वच्छतागृह आदि सोयी करुन दिल्या जाणार आहेत. या साईआश्रम प्रकल्पामध्ये सौर उर्जा सुविधा पुरविणेबाबत मेडा, पुणे यांचे मार्गदर्शन घेऊन टेंडर तयार करण्यात आले होते.

साईआश्रम ए टाईप इमारतींमध्ये २,७२,५०० लिटर्स प्रती दिन व बी टाईप इमारतींमध्ये १,२२,५०० लिटर्स प्रती दिन अशी मिळून ३,९५,००० लिटर्स प्रती दिन क्षमतेची सोलर वॉटर हिटींग सिस्टिम बसविणेकामीच्या टेंडर विक्रीसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती व टेंडरची विक्री दि. २०-१०-२०१० पासून चालू करण्यात येऊन दि. ०१-११-२०१० पर्यंत करण्यात आली. प्री बीड मिटींग शिरडी येथे दि. १०-११-२०१० रोजी होती. टेंडर सबमिशन तारीख दि. १८-११-२०१० अशी होती.

याकामी खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव |
|---|---|
| ०१. | मे.न्यु टेक सोलर सिस्टीम प्रा.लि., बंगलोर |
| ०२. | मे.बिपीन इंजिनिअर्स प्रा.लि., पुणे |
| ०३. | मे.सुदर्शन सौरशक्ती प्रा.लि., औरंगाबाद |
| ०४ | मे.सोलर प्रॉडक्टस् कंपनी ॲण्ड पॅराडाईज सेल्स कार्पोरेशन, पुणे |
| ०५ | मे.जैन इरिगेशन सिस्टम्स लि., जळगाव |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम ए व बी प्रकल्पांकरीता सोलर वॉटर हिटींग सिस्टीम सुविधा पुरविणेसाठी प्राप्त झालेल्या टेंडर्समधील कमर्शिअल बीडस् आजचे सभेत उघडणेत येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१. | मे.न्यु टेक सोलर सिस्टीम प्रा.लि., बंगलोर | ६,०५,१६,२५०/- | ५,६८,८५,२७७/- |
| ०२. | मे.बिपीन इंजिनिअर्स प्रा.लि., पुणे | ५,९७,२०,६२०/- | ५,७३,३५,६३५/- |
| ०३. | मे.सुदर्शन सौरशक्ती प्रा.लि., औरंगाबाद | ५,०७,४८,४६७/- | अपात्र |
| ०४ | मे.सोलर प्रॉडक्टस् कंपनी अॅण्ड पॅराडाईज सेल्स कार्पोरेशन, पुणे | ६,४८,८४,५००/- | ६,१०,००,०००/- |
| ०५ | मे.जैन इरिगेशन सिस्टम्स लि., जळगाव | ५,८४,८०,२०४/- | ५,११,००,०००/- |

**निर्णय क्र.८५४** साई आश्रम ए व साईआश्रम बी या दोन्ही प्रकल्पांकरीता सोलर वॉटर हिटींग सिस्टिम सुविधा पुरविणेकामी आवश्यक असणारे टेंडर डाक्युमेंट या इमारतीचे आर्किटेक्ट मे.डि.ओ.निकम यांनी तयार केले होते. पण या टेंडर डाक्युमेंटमध्ये अत्यंत चुका असल्याने तसेच माहिती अपुरी असल्याने या इमारतीतील खोल्यांची संख्या तसेच निवासासाठी येणा-या भक्तांची संख्या विचारात घेऊन तसेच प्रत्यक्ष पाहणी करुन तांत्रिक माहिती परीपूर्ण असणारे टेंडर करुन देणेबाबत या क्षेत्रातील अग्रगणी संस्था महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) यांना सांगण्यात आले होते. कारण प्रकल्प उभा करणे, उभारणीपूर्व साहित्याची तांत्रिक तपासणी करणे, प्रकल्प उभा करतेवेळी वेळोवेळी इन्स्पेक्शन करणे, प्रकल्पाची ट्रायल घेणे वगैरे बाबी मेडामार्फत केल्या जातात. शिवाय महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) ही महाराष्ट्र शासनाची अपारंपारिक ऊर्जा संबंधी काम करणारी एकमेव संस्था आहे. त्यांनी टेंडर तयार करुन दिल्यानंतर सोलर वॉटर हिटींग सिस्टिम सुविधा पुरविणा-या ठेकेदारांकडून टेंडर मागविणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली. या जाहिरातीच्या झालेल्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

या जाहिरातीनुसार एकुण १३ जणांनी टेंडर विकत घेतले. दिनांक १० नोव्हेंबर २०१० रोजी प्री-बीड मिटींग झाली. या प्री-बीड मिटींगमध्ये टेंडरधारकांचे शंकानिरसन झाल्यानंतर दिनांक १८ नोव्हेंबर २०१० या टेंडर सबमिशनच्या शेवटच्या दिवशी एकुण ५ जणांनी टेंडर सबमिट केले. या ५ टेंडरचे टेक्निकल बीड तपासणीकामी मेडाकडे पाठविण्यात आले. सर्वांचे टेक्निकल बीड तपासून मेडा यांनी रिपोर्ट सादर केला होता. त्यामध्ये सोलर इक्विपमेंटसाठी अत्यंत आवश्यक असणारे बी.आय.एस.हे सर्टिफिकेट मे.सुदर्शन सौरशक्ती प्रा.लि., औरंगाबाद यांनी कागदपत्रांसोबत जोडलेले नसल्याने ते अपात्र असल्याचे मेडा यांनी लेखी दिले आहे. तसेच सोलर प्रॉडक्ट कंपनी ही कंपनी मेडाच्या आर.सी.मध्ये नाही परंतू केंद्र सरकारच्या एम.एन.आर.ई च्या पॅनेलवर असल्याचे कळविलेले होते. त्यानुसार टेंडर भरलेल्या पाचही टेंडरधारकांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येऊन सुदर्शन सौर शक्ती यांना चर्चा / वाटांघाटी चे वेळी बी.आय.एस.सर्टिफिकेट सादर करण्याबाबत दूरध्वनीवरुन कळविले. परंतू चर्चा / वाटाघाटीचे वेळीही मे. सुदर्शन सौर शक्ती प्रा.लि., औरंगाबाद हे बी.आय.एस.सर्टिफिकेट सादर करु शकले नाहीत व त्यामुळे त्यांना अपात्र ठरविण्यात आले.

या चर्चा / वाटाघाटीचे वेळी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) चे प्रकल्प अधिकारी, श्री.अभिजित हिंगे हे उपस्थित होते. त्यांनी या कामाबद्दलची तांत्रिक माहिती सभेला उपस्थित असणा-या मा.सदस्यांना दिली. तसेच हे काम पूर्ण झाल्यानंतर शासनाची सबसिडी (जी साधारणतः २० ते २५ टक्के असेल) ती मिळविण्यासाठी मेडामार्फत पूर्ण प्रयत्न केले जातील परंतू यासाठी या प्रकल्पाचे सुपरविजनसाठी मेडाला संस्थानने कार्यादेश देणे गरजेचे राहील व प्रकल्पाची सुपरव्हिजन फी जी प्रकल्पाच्या किंमतीच्या ३ टक्केइतकी होईल, ती मेडाला आदा करावी लागेल, असे मेडाचे अधिका-यांनी सभेपुढे सांगितले. या प्रकल्पाला शासनाची सबसिडी मिळविण्यासाठी मेडाची गरज लागणार असल्याने या कामाच्या सुपरव्हिजनचा कार्यादेश मेडा यांना देणेस व प्रकल्पाचे प्रत्यक्षात होणारे कामाच्या किंमतीचे ३ टक्के इतकी सुपरव्हिजन फी मेडा यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.

टेंडरधारकांशी चर्चा/वाटाघाटी होऊन मे. सुदर्शन सौर शक्ती प्रा.लि., औरंगाबाद हे बी.आय.एस.सर्टिफिकेट सादर करण्यास असमर्थ ठरल्याने यावर सविस्तर चर्चा होऊन मेडाचे सूचनेनुसार मे. सुदर्शन सौर शक्ती प्रा.लि., औरंगाबाद यांना अपात्र ठरविण्यात येऊन सेंकड लोएस्ट दर दिलेले मे.जैन इरीगेशन सिस्टिम लि.जळगांव यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.०७ सन २०१०-११ विद्युत विभागासाठी इलेक्ट्रीक व हार्डवेअर साहित्य खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१०-११ सालामध्ये विद्युत विभागासाठी आवश्यक असणारे इलेक्ट्रीक साहित्य तसेच एम.एस. हार्डवेअर साहित्य, खरेदीस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.३१,००,०००/- मात्रच्या खर्चास, तसेच वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागणीस मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५.०९.२०१० मध्ये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सन २०१०-११ विद्युत विभाग साहित्य खरेदीकरणेकामी दि.०२.१०.२०१० चे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०४.१०.२०१० ते दि.१२.१०.२०१० अखेर मुंबई कार्यालय व शिर्डी कार्यालय येथे स्वतंत्रपणे निविदा विक्री करण्यात आलेली असून दि.१४.१०.२०१० अशी निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आलेली आहे.

त्यानुसार मुदतीअंती प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१. | मे.काशिको ट्रेडींग प्रा.लि., कोपरगांव |
| ०२. | मे.अनुराधा एजन्सीज, लोणी |
| ०३. | मे.विनायक इंजिनिअर्स, मुंबई |
| ०४. | मे.गांधी ब्रदर्स, मुंबई |

उपरोक्त प्रमाणे निविदा आजचे सभेत उघडणेत येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. उपरोक्त उपस्थित निविदासादरकर्त्यांना सभेपुढे एकत्रित बोलविण्यात येऊन त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे? याबाबत लेखी बंद पाकिटात देणेबाबत सांगणेत आले.

त्यानुसार निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेले बंद पाकिटे उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | देऊ केलेली सुट |
|---|---|---|
| ०१. | मे.काशिको ट्रेडींग प्रा.लि., कोपरगांव | अनुपस्थित |
| ०२. | मे.अनुराधा एजन्सीज, लोणी | ५% |
| ०३. | मे.विनायक इंजिनिअर्स, मुंबई | आयटेमवाईज |
| ०४ | मे.गांधी ब्रदर्स, मुंबई | १.५% |

**निर्णय क्र.८५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या सुटीच्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन या तक्त्यातील निम्नतम दर स्विकारणेत येऊन निम्नतम दराच्या निविदासादरकर्त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.०८ पाणीपुरवठा विभागासाठी ब्लिचिंग पावडर, फेरीक अॅलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.०७.०८.२०१० चे सभेतील निर्णय क्र.६४६ अन्वये संस्थानचे पाणीपुरवठा विभागाचे कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुद्धीकरणासाठी आवश्यक असणारी ब्लिचींग पावडर-३५ टन, फेरीक अॅलम (तुरटी)-६० टन व क्लोरीन गॅस सिलेंडर-४० नग खरेदीस व त्याकामी येणारे रु.१३,१०,०००/-चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.२७.१०.२०१० चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.२७.१०.२०१० ते दि.१०.११.२०१० अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.१३.११.२०१० अशी निविदा स्विकारणेची मुदत ठेवणेत आलेली आहे. मुदतीअंती प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१. | मे.चिंतामणी केमिक्रॉप, परळी वैजनाथ |
| ०२. | मे.विक्रम केमिकल्स, सिन्नर |
| ०३. | मे.अजय केमिकल्स इंडस्ट्रीज, अहमदनगर |
| ०४. | मे.श्री इंटरप्रायजेस, औरंगाबाद |
| ०५. | मे.मनिषा इंटरप्रायजेस, बीड |
| ०६. | मे.एस.व्ही.एस.केमिकल कार्पोरेशन, पुणे |
| ०७. | मे.जी.एस.कमर्शियल कार्पोरेशन, मुंबई |

उपरोक्त प्रमाणे निविदा आजचे सभेत उघडणेत येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. उपरोक्त उपस्थित निविदासादरकर्त्यांना सभेपुढे एकत्रित बोलविण्यात येऊन त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे? याबाबत लेखी बंद पाकिटात देणेबाबत सांगणेत आले.

त्यानुसार निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेले बंद पाकिटे उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | देऊ केलेली सुट |
|---|---|---|
| ०१. | मे.चिंतामणी केमिक्रॉप, परळी वैजनाथ | आयटेमवाईज |
| ०२. | मे.विक्रम केमिकल्स, सिन्नर | आयटेमवाईज |
| ०३. | मे.अजय केमिकल्स इंडस्ट्रीज, अहमदनगर | अनुपस्थित |
| ०४ | मे.श्री इंटरप्रायजेस, औरंगाबाद | --- |
| ०५ | मे.मनिषा इंटरप्रायजेस, बीड | आयटेमवाईज |
| ०६ | मे.एस.व्ही.एस.केमिकल कार्पोरेशन, पुणे | आयटेमवाईज |
| ०७ | मे.जी.एस.कमर्शियल कार्पोरेशन, मुंबई | आयटेमवाईज |

**निर्णय क्र.८५६ मे.अजय केमिकल्स इंडस्ट्रीज, अहमदनगर हे चर्चा/ वाटाघाटीसाठी अनुपस्थित होते त्यांनी फॅक्स पत्राद्वारे सुट कळविली आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.अजय केमिकल्स इंडस्ट्रीज, अहमदनगर वगळता उपस्थित निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या सुटीच्या दराचा तुलनात्मक तक्ता तयार करुन या तक्त्यातील निम्नतम दर स्विकारणेत येऊन निम्नतम दराच्या निविदासादरकर्त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.०९ शांतीनिवास दर्शनहॉलचे स्लाईडींग गेटमध्ये रुपांतर करणेकामी व बॅगेज स्कॅनरसाठी दोन नग ट्रॉली बनविणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून कोटेशन्ससादरकर्त्याशी चर्चा /वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** शांतिनिवास दर्शनहॉलचे स्लाईडींग गेटमध्ये रुपांतर करणेकामी व बॅगेज स्कॅनरसाठी दोन नग ट्रॉली बनविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून करुन घेणेकामी व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. २,७०,०७६/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०५-०९-२०१० चे सभेत विषय क्र.१२ निर्णय क्र.७४३ अन्वये मान्य करण्यात येऊन या कामासाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झाला होता. त्यानुसार कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०६ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मुकुंद एन्टरप्राईजेस, नाशिक |
| ०२ | मे.शुभम स्टील रेलींग्ज ॲण्ड फर्निचर, नाशिक |
| ०३ | मे.मेहता स्टील कार्पोरेशन, नाशिक |
| ०४ | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक |
| ०५ | मे.आकार मशिन्स् प्रा.लि., नाशिक |
| ०६ | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव. |

उपरोक्तप्रमाणे शांतिनिवास दर्शनहॉलचे स्लाईडींग गेटमध्ये रुपांतर करणेकामी व बॅगेज स्कॅनरसाठी दोन नग ट्रॉली बनविणेकामी प्राप्त झालेली कोटेशन आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांशी समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. उपस्थित सर्व कोटेशनसादरकर्त्यांना एकत्रित सभेपुढे बोलविण्यात येऊन त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सूट देणार किंवा कसे यांबाबत बंद पाकिटात दर देणेबाबत सांगण्यात आले. त्यानुसार कोटेशनसादरकर्त्यांनी दिलेली बंद पाकिटे उघडण्यात आली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.क्र. | पार्टीचे नांव | कोटेशनमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मुकुंद एन्टरप्राईजेस, नाशिक | ३,२४,०९१/- | अनुपस्थित |
| ०२ | मे.शुभम स्टील रेलींग्ज ॲण्ड फर्निचर, नाशिक | ३,३७,५९५/- | ३,२०,०००/- |
| ०३ | मे.मेहता स्टील कार्पोरेशन, नाशिक | ३,२४,०९१/- | अनुपस्थित |
| ०४ | मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक | २,९७,०८४/- | २,८५,०००/- |
| ०५ | मे.आकार मशिन्स् प्रा.लि., नाशिक | ३,१०,५८७/- | ३,१०,५८७/- |
| ०६ | मे.साई इंडस्ट्रीज, कोपरगांव. | २,९७,०८४/- | अनुपस्थित |

**निर्णय क्र.८५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक यांची निम्नतम दराचे कोटेशस स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१०** **सुरक्षा साहित्य कंट्रोल रुमचे विद्युतीकरणाचे काम करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून कोटेशससादरकर्त्याशी चर्चा /वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** सुरक्षा साहित्य कंट्रोल रुमचे विद्युतीकरणाचे काम विद्युत ठेकेदारांकडून कोटेशन मागवून करुन घेणेकामी व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ३,८३,२७३/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०५-०९-२०१० चे सभेत विषय क्र.३८ निर्णय क्र.७१३ अन्वये मान्य करण्यात येऊन या कामासाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झाला होता. त्यानुसार कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| **अ.क्र.** | **पार्टीचे नांव** |
|---|---|
| ०१ | मे.रुद्रा इलेक्ट्रीकल्स्, नागपूर |
| ०२ | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, अंबड, नाशिक |
| ०३ | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, उपनगर, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे सुरक्षा साहित्य कंट्रोल रुमचे विद्युतीकरणाचे काम करुन घेणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा / वाटाघाटी साठी बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ. क्र.** | **पार्टीचे नांव** | **कोटेशनमधील दर** | **चर्चेअंती देऊ केलेले दर** |
|---|---|---|---|
| ०१ | मे.रुद्रा इलेक्ट्रीकल्स्, नागपूर | ५% अधिक | अनुपस्थित |
| ०२ | मे.स्वरांजली इलेक्ट्रीकल्स्, अंबड, नाशिक | १२% कमी | १५% कमी |
| ०३ | मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, उपनगर, नाशिक | १०% कमी | २०% कमी |

**निर्णय क्र.८५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.श्री साईश्रद्धा इलेक्ट्रीकल्स्, उपनगर, नाशिक यांची निम्नतम दराचे कोटेशस स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.११** **श्री साईनाथ रुग्णालयामधील रुम नंबर ११३ व ११४ मध्ये बसविणेकामी व संरक्षण विभागाचे सेंट्रलाईज कंट्रोल रुमसाठी नविन ए.सी. खरेदी करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५-०९-२०१० चे सभेतील (१) विषय नं.३७ निर्णय ७१२ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयामधील रुम नंबर-११३ व ११४ मध्ये बसविणेकामी नविन ए.सी.खरेदी करणेकामी रक्कम रुपये २,४१,०८८/- इतक्या खर्चास तसेच कोटेशन मागविणेस व (२) आयत्या वेळचा विषय नं.०९ निर्णय क्र.७४० अन्वये संरक्षण विभागाचे सेंट्रल लाईज कंट्रोल रुमसाठी नविन ए.सी.खरेदी करणेकामी रक्कम रुपये १,६०,७२६/- इतक्या खर्चास तसेच कोटेशन मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत / ९७२० / २०१० दिनांक ०४-१०-२०१० अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे ०८ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.तेजस्वीनी रेफ्रीजरेशन, पुणे |
| ०२ | मे.कुल ब्रीज, पुणे. |
| ०३) | मे.श्री विघ्नेश्वर एअरकंडिशनिंग (इं) प्रा.लि., मुंबई |
| ०४) | मे.वेस्टएक एअर इक्युपमेंट, मुंबई |
| ०५) | मे.शुभम एन्टरप्राईजेस, मुंबई |
| ०६) | मे.निकिथा कुलींग वर्क्स, मुंबई |
| ०७) | मे.कॉन्टेक एअरफ्लो प्रा.लि., मुंबई |
| ०८) | मे.केल्व्होल्ट (इं) प्रा.लि., मुंबई |

उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालय नविन ऑपरेशन थिएटरमध्ये बसविणेकामी व संरक्षण विभागाचे सेंट्रल लाईज कंट्रोल रुमसाठी नविन ए.सी. खरेदी करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा / वाटाघाटी साठी बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ. क्र.** | **पार्टीचे नांव** | **कोटेशनमधील दर रु.** | **चर्चेअंती देऊ केलेले दर रु.** |
|---|---|---|---|
| ०१) | मे.तेजस्वीनी रेफ्रीजरेशन, पुणे | ३,५५,०००/- | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | मे.कुल ब्रीज, पुणे. | ३,३६,९००/- | अनुपस्थित |
| ०३) | मे.श्री विघ्नेश्वर एअरकंडिशनिंग (इं) प्रा.लि., मुंबई | ५,८३,०३०/- | ५,२४,७२७/- |
| ०४) | मे.वेस्टएक एअर इक्युपमेंट, मुंबई | ५,९८,९००/- | अनुपस्थित |
| ०५) | मे.शुभम एन्टरप्राईजेस, मुंबई | ५,१६,७२०/- | ४,५४,७१४/- |
| ०६) | मे.निकिथा कुलींग वर्क्स, मुंबई | ४,८४,२२०/- | अनुपस्थित |
| ०७) | मे.कॉन्टेक एअरफ्लो प्रा.लि., मुंबई | ४,६१,६५३/- | अनुपस्थित |
| ०८) | मे.केल्व्होल्ट (इं) प्रा.लि., मुंबई | ४,५८,०२०/- | ४,३०,०००/- |

**निर्णय क्र.८५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.केल्व्होल्ट (इं) प्रा.लि., मुंबई यांची निम्नतम दराचे कोटेशस स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१२ बॉयलर चिमणी ३ नग, जुना गॅस प्लॅंन्ट टॅंक २ नग व नवीन व जुन्या गॅस प्लॅन्टच्या पाईपलाईनला पेंटींग कामी प्राप्त झालेले दरपत्रक उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती दिनांक ५.९.२०१० चे सभेतील निर्णय क्रं. ७२१ अन्वये श्री साईप्रसादालयातील स्टीम बॉयलर चिमणी ०२ नग, थर्मिक फ्ल्युड हिटर चिमणी ०१ नग, जुन्या व नव्या गॅस प्लॅन्टची पाईपलाईन व जुना गॅस प्लॅन्ट स्टोअरेज टॅंक २ नग करीता रंग देणेकामी कोटेशन मागविणेस व अंदाजे रक्कम रुपये १,७५,०००/- पर्यतच्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार खालील एजन्सींना दरपत्रक पाठविणेसाठी कळविणेत आले होते.

०१. साईसमर्थ इंजिनिअर्स, दहिगाव बोलका ता. कोपरगाव
०२. साई सर्व्हिसेस , कोपरगाव
०३. डॉट असोसिएट, कोपरगाव
०४. समर्थ उदयोग, राहाता.

दि.२८.१०.२०१० या विहीत मुदतीत उपरोक्त ४ एजन्सी पैकी खालील ३ एजन्सींनी दरपत्रक सादर केलेले आहे.

०१. साईसमर्थ इंजिनिअर्स, दहिगाव बोलका ता. कोपरगाव
०२. डॉट असोसिएट, कोपरगाव
०३. समर्थ उदयोग, राहाता.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन दरपत्रक धारकांना समक्षा चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले होते. परंतु एकही दरपत्रकधारक उपस्थित नव्हते. त्यांनी देऊ केलेले दर खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Discription/ Colour code | Diamention | Length | श्री साईसमर्थ इंजिनिअरींग, दहेगांव बोलका | | श्री साईसमर्थ उद्योग, राहाता | | डॉट असोसिएट, कोपरगांव | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ॲटमनुसार मुळ दर रुपये | एकुण रक्कम रुपये | ॲटमनुसार मुळ दर रुपये | एकुण रक्कम रुपये | ॲटमनुसार मुळ दर रुपये | एकुण रक्कम रुपये |
| 01. | Boiler Chimney (Aluminium Silver) | Bottom Dia:- 25 inch Top Dia:- 12 inch | 16 mtr | 5900.00 | 5900.00 | | | 6500.00 | 6500.00 |
| 02. | Boiler Chimney (Aluminium Silver) | Bottom Dia:- 17 inch Top Dia:- 06 inch | 10 mtr | 4000.00 | 4000.00 | | | 4850.00 | 4850.00 |
| 03. | Thermic Fluid Heater Chimney (Aluminium Silver) | Bottom Dia:- 19 inch Top Dia:- 06 inch | 12 mtr | 5000.00 | 5000.00 | | | 5500.00 | 5500.00 |
| 04. | L.P.Gas Tank :- 2 Nos (White) | Dia :- 2.1 mtr | 6.4 mtr | 4500.00 | 9000.00 | | | 4960.00 | 9920.00 |
| 05. | M.S.Pipe (Yellow) | 50NB | 492 mtr | 30.00 | 14760.00 | | | 37.00 | 18204.00 |
| 06. | M.S.Pipe (Yellow) | 40NB | 61 mtr | 25.00 | 1525.00 | | | 32.00 | 1952.00 |
| 07. | M.S.Pipe (Yellow) | 25NB | 175 mtr | 22.00 | 3850.00 | | | 27.00 | 4725.00 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 08. | M.S.Pipe (Yellow) | 20NB | 40 mtr | 20.00 | 800.00 | | | 25.00 | 1000.00 |
| 09. | M.S.Pipe (Red) | 50NB | 99 mtr | 30.00 | 2970.00 | | | 38.00 | 3762.00 |
| 10. | M.S.Pipe (Red) | 40NB | 4 mtr | 25.00 | 100.00 | | | 32.00 | 128.00 |
| 11. | M.S.Pipe (Red) | 25NB | 11 mtr | 22.00 | 242.00 | | | 29.00 | 319.00 |
| 12. | M.S.Pipe (Red) | 20NB | 6 mtr | 20.00 | 120.00 | | | 26.00 | 156.00 |
| 13. | M.S.Pipe (Green) | 50NB | 34 mtr | 30.00 | 1020.00 | | | 38.00 | 1292.00 |
| 14. | M.S.Pipe (Green) | 40NB | 24 mtr | 25.00 | 600.00 | | | 33.00 | 792.00 |
| 15. | M.S.Pipe (Green) | 25NB | 52 mtr | 22.00 | 1144.00 | | | 29.00 | 1508.00 |
| 16. | M.S.Pipe (Green) | 20NB | 30 mtr | 20.00 | 600.00 | | | 26.00 | 780.00 |
| 17. | M.S.Pipe (Blue) | 20NB | 51 mtr | 20.00 | 1020.00 | | | 28.00 | 1428.00 |
| 18. | M.S.Pipe (Black) | 25NB | 24 mtr | 22.00 | 528.00 | | | 55.00 | 1320.00 |
| 19. | M.S.Pipe ( Red Oxide Glossy) | 20NB | 117 mtr | 50.00 | 5850.00 | | | 130.00 | 15210.00 |
| 20. | ISMB ( Red Oxide Glossy) | 150x150x4 mm | 115 mtr | 100.00 | 11500.00 | | | 129.00 | 14835.00 |
| 21. | ISMC ( Red Oxide Glossy) | 125x65x4 mm | 142 mtr | 100.00 | 14200.00 | | | 128.00 | 18176.00 |
| 22. | M.S.Angle ( Red Oxide Glossy) | 75x75x6 mm | 268 mtr | 100.00 | 26800.00 | | | 127.00 | 34036.00 |
| 23. | M.S.Sheet ( Red Oxide Glossy) | -- | 5m2 | 100.00 | 500.00 | | | 128.00 | 640.00 |
| 24. | Grill Gate :- 2 No. ( Red Oxide Glossy) | 118x83 inch | | 3500.00 | 7000.00 | | | 3200.00 | 6400.00 |
| 25. | Grill Gate ( Red Oxide Glossy) | 48x83 inch | | 2500.00 | 2500.00 | | | 2100.00 | 2100.00 |
| | | | | सर्व्हिस टॅक्स 13%<br>TDS 2.30% | 1,21,529.00<br>15798.77<br>3158.53 | | 80,000.00<br>--<br>-- | | 1,55,533.00<br>--<br>-- |
| | | | एकुण दर :- | | 1,40,486.30 | | 80,000.00 | | 1,55,533.00 |

**निर्णय क्र.८६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात येऊन दरपत्रकधारकांना पुढील सभेपुढे चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय)

---

**विषय नं.१३** **नवीन शववाहिका वाहन खरेदीकामी प्राप्त झालेले फेर कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** दि.०४/०७/२०१० चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.५७६ अन्वये, नवीन शववाहीका खरेदी करणे कामी टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून ४०७ मॉडेलची चेसी खरेदी करुन नामांकित बॉडीबिल्डर यांचेकडून आपणास आवश्यक अशी शववाहीका बॉडीबांधणी करुन घेणेस व या कामी येणारे अंदाजे रु.११,००,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

वरील निर्णयानुसार, टाटा४०७ चेसी करीता टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून तसेच बॉडी बांधणी करीता बॉडीबिल्डर यांचेकडून कोटेशन बोलाविण्यात आली होती.

दि.१०/१०/२०१० चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार, नवीन शववाहीका वाहन खरेदी कामी प्राप्त कोटेशन्स उघडण्यात येवुन, टाटा कंपनीचे प्रतिनीधीशी सविस्तर चर्चा केली असता, टाटा ४०७ कंपनीचे युरो-३ हे मॉडेल बाजारात येत असुन या मध्ये अत्याधुनिक सुविधा असल्याचे

सांगण्यात आल्याने, सदरहु निविदा रद्द करण्यात येवुन टाटा४०७ कंपनीचे युरो-३ या मॉडेलचे वाहन खरेदी कामी व त्यावर बॉडीबांधणी करणे कामी फेरनिविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

वरील निर्णयानुसार टाटा४०७ चेसी करीता टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून जा.नं.एसएसएस/ वाहन/१०१९४/२०१० दि.२१/१०/२०१० ने तसेच बॉडीबांधणी करीता बॉडीबिल्डर यांचेकडून जा.नं.एसएसएस/वाहन/१०१९५/२०१० दि.२१/१०/२०१० ने फेर कोटेशन बोलाविण्यात आली होती. प्राप्त झालेली कोटेशन्स खालील प्रमाणे.

**अ) टाटा४०७ चेसी करीता प्राप्त कोटेशन्स-**

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर |
| ०२ | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक |
| ०३. | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर |

**ब) बॉडी बांधणी करीता प्राप्त कोटेशन्स-**

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१. | इन-कोच बिल्डर्स, मुंबई |
| ०२. | सॅमसन मोटर्स, वसई |
| ०३. | ॲन्थोनी गॅरेज प्रा.लि., नवी मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत येऊन कोटेशनसादरकर्त्यांना चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**अ) टाटा४०७ चेसी करीता प्राप्त कोटेशन्स (Tata ४०७/ ३१ SFC B III CAB) CHASSIS-**

| अ.नं. | पार्टीचे नांव | कोटेशनमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१. | मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर | ६,००,०००/- | ५,९५,०००/- |
| ०२ | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक | ५,९१,५१४/- | कोटेशन मागणीप्रमाणे नाही |
| ०३. | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | ६,१७,५८५/- | ६,१४,५८५/- |

**ब) बॉडी बांधणी करीता प्राप्त कोटेशन्स-**

| अ.नं. | पार्टीचे नांव | कोटेशनमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१. | इन-कोच बिल्डर्स, मुंबई | ४,६६,८७५/- | ४,५५,६२५/- |
| ०२. | सॅमसन मोटर्स, वसई | ५,३४,३७५/- | अनुपस्थित |
| ०३. | ॲन्थोनी गॅरेज प्रा.लि., नवी मुंबई | ४,८४,०००/- | ४,८२,८७५/- |

**निर्णय क्र.८६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, टाटा४०७ चेसी (Tata ४०७/ ३१ SFC B III CAB) कामी मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर व बॉडी बांधणीकामी इन-कोच बिल्डर्स, मुंबई यांचे निम्नतम दराचे कोटेशन स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१४** **पुस्तके व फोटोंचे पुनरमुद्रण करणेकामाचे दरपत्रक उघडणे व निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** दि.१८.१०.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो छपाई करणे, विक्री किंमती ठरविणे वगैरे रुटीनच्या कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संस्थान प्रकाशित खालील पुस्तके व फोटोंचे पुनर्मुद्रण करणे व दरपत्रके मागविणेकामी प्रकाशने दि.२३.०८.२०१० चे मंजूर प्रस्तावानुसार मंजूरी मिळालेली आहे.

**अ) पुस्तके छपाई कामाचे परिशिष्ट**

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | भाषा | सध्याच शिल्लक संख्या | किती महिने पुरेल | नवीन छपाई संख्या | अंदाजे छपाई दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईंचे सत्य चरित्र | मराठी | ४९८९ | ५ | २०,००० | ९०.०० | १८,००,००० |
| ०२ | श्री साईसत् चरित्र | हिंदी | ६६६१४ | ६ | १,५०,००० | ४०.०० | ६०,००,००० |
| ०३ | एक फकिर की पाठशाला | हिंदी | २४३९ | ६ | १०,००० | ४०.०० | ४,००,००० |
| ०४ | श्री साईलीलामृत | हिंदी | ६०३६ | ७ | १५,००० | १५.०० | २,२५,००० |
| ०५ | श्री सदगुरु साईनाथ सगुणोपासना आरती | तामिळ | १२३४ | ३ | १०,००० | १२.०० | १,२०,००० |
| ०६ | श्री साई स्तवन मंजरी | हिंदी | ० | ० | १५००० | ५.०० | ७५,००० |
| ०७ | श्री साई स्तवन मंजरी | गुजराथी | ३१९२ | ७ | १०,००० | ५.०० | ५०,००० |
| ०८ | श्री साईनाथ रुद्राध्याय | मराठी | २२१८ | ३ | २०,००० | ३.०० | ६०,००० |
| | | | | | **एकूण रक्कम रुपये** | | **८७,३०,०००** |

**ब) फोटो छपाई कामाचे परिशिष्ट**

| अ.नं. | फोटोचे नांव | साईज | सध्याची शिल्लक | किती महिने पुरेल | नवीन छपाई | अंदाजे दर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा मुर्ती फोटो चार रंगात | १४" X २०" | ७४६८ | १ | २००००० | ३.०० | ६,००,०००/- |
| ०२ | पालखी फोटो चार रंगात | २०" X २८" | १७४९४ | ९ | १,००,००० | ७.०० | ७,००,०००/- |
| | | | | | | **एकूण रुपये** | **१३,००,०००/-** |

पुस्तके व फोटोंचे पुनर्मुद्रण करणे कामी २७ निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/ वशी/ ९७४६ दि.०६.१०.२०१० अन्वये दरपत्रकाचे विहीत फार्म पाठविण्यात येऊन ती दि.२६.१०.२०१० अखेर जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार खालील ६ प्रेसधारकांची सीलबंद दरपत्रके मुदतीत प्राप्त झाले आहे.

| अ.नं. | प्रेसधारकांचे नांव | अ.नं. | प्रेसधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मे. निट प्रिंटर्स,अहमदनगर | ०४ | मे.शिवम ऑफसेट ,कोल्हापूर |
| ०२ | मे. अजय ऑफसेट प्रा.लि,पुणे | ०५ | मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.मुंबई |
| ०३ | मे.न्यू राधारमण प्रिटींग प्रेस,मुंबई. | ०६ | मे. साईग्रेस फाऊंडेशन,मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०६ निवडक प्रेसधारकांचे सिलबंद दरपत्रके मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यासमोर आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता प्रेसधारकांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

**(अ) पुस्तके**

| अ.नं | प्रेसधारकाचे नाव | छपाई संख्या | मे. निट प्रिंटर्स,अहमदनगर | मे. अजय ऑफसेट प्रा.लि,पुणे | मे.न्यू राधारमण प्रिटींग प्रेस,मुंबई | मे.शिवम ऑफसेट ,कोल्हापूर | मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.मुंबई | मे. साईग्रेस फाऊंडेशन,मुंबई |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईंचे सत्य चरित्र -मराठी | २०,००० | ९९.५० | ९४.८० | १३३.६० | ७४.९० | **७४.००** | १६७.०० |
| ०२ | श्री साईसत् चरित्र - हिन्दी | १,५०,००० | ३८.९५ | ४१.२३ | ७३.८७ | ३४.९० | **३४.५०** | ५४.०० |
| ०३ | एक फकिर की पाठशाला - हिन्दी | १०,००० | ३६.६० | ३७.९२ | ५१.७७ | २७.८० | **२५.००** | ५१.०० |
| ०४ | श्री साईलीलामृत- हिन्दी | १,५०,००० | --- | २३.५२ | ४४.७० | **१३.९०** | २२.२० | ३३.०० |
| ०५ | श्रीसदगुरु साईनाथ सगुणोपासना आरती - तामीळ | १०,००० | --- | २३.०१ | ११.८३ | **९.९०** | १६.०० | २०.०० |
| ०६ | श्री साई स्तवन मंजरी - हिन्दी | १५,००० | --- | **२.९८** | ६.४० | ३.८७ | ५.५० | ५.४० |
| ०७ | श्री साई स्तवन मंजरी- गुजराथी | १०,००० | -- | **२.७२** | ४.८४ | ३.६० | ४.५० | ४.७० |
| ०८ | श्री साईनाथ रुद्राध्याय- मराठी | २०,००० | -- | **२.५३** | ५.०९ | २.९० | ४.२० | ४.४५ |

**(ब) फोटो-**

| अ.नं | प्रेसधारकाचे नाव | श्रीसाईबाबा समाधी मुर्ती फोटो चार रंगात १४" x २० | पालखी फोटो चार रंगात २०" x २८ |
|---|---|---|---|
| | छपाई संख्या | २ लाख नग | १ लाख नग |
| ०१ | मे. निट प्रिंटर्स,अहमदनगर | ३.०० | ६.०० |
| ०२ | मे. अजय ऑफसेट प्रा.लि,पुणे | २.७४ | ५.४९ |
| ०२ | मे.न्यू राधारमण प्रिटींग प्रेस,मुंबई. | ४.३७ | ६.८४ |
| ०४ | मे.शिवम ऑफसेट ,कोल्हापूर | २.६९ | ५.४५ |
| ०५ | मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.मुंबई | **२.६०** | **५.२५** |
| ०६ | मे. साईग्रेस फाऊंडेशन,मुंबई | ३.८५ | ७.४५ |

**निर्णय क्र. ८६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.-**

**मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि.मुंबई यांनी नियमाप्रमाणे बयाणा रक्कम संस्थानमध्ये भरलेली नाही तथापि त्यांचे (०१) साईंचे सत्य चरित्र मराठी (०२)श्रीसाईसतचरित्र हिन्दी (०३) एक फकिर की पाठशाळा या हिन्दी पुस्तकांचे, तसेच (०१) श्रीसाईबाबा समाधी मुर्ती फोटो (०२) पालखी फोटोंचे दर निम्नतम आहेत. संस्थानचे आर्थिक हिताचा विचार करता त्यांचेकडून अनामत रक्कम घेऊन त्यांना पुस्तके व फोटो छपाईचा कार्यादेश देण्यात यावा. उर्वरित पुस्तके व फोटोंबाबत अधोरेखित केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन संबंधितांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.**

(कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने)

---

**विषय नं.१५** **श्रीसाईबाबा मल्टीमिडिया थिमपार्क प्रकल्पांतर्गत लेजर-शो उभारणीकामी प्राप्त होणाऱ्या निविदा तांत्रिक छाननीसाठी (पाकीट क्र.०१)उघडणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा .व्यवस्थापन समितीचे दि.०५ सप्टेंबर,२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६९३ अन्वये, श्री साईबाबा मल्टिमिडीया थीमपार्क प्रकल्प उभारणेसाठी आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोशिएटस्, नवी दिल्ली यांनी सादर केलेल्या साईगार्डन थीमपार्कसाठी रु. ९४.२३ कोटी मात्रचे अंदापत्रकात लेजर-शोसाठी रु. २३ कोटी मात्रचा समावेश केला आहे. त्यानूसार पहिल्या टप्प्यात लेजर शो उभारणीसाठी Request for Proposal तयार करून आंतरराष्ट्रीय स्तरावर जाहिरात प्रसिध्दी करुन प्रस्ताव आमंत्रित करणेस मान्यता मिळालेली आहे.

सदर निर्णयानुसार,आर्किटेक्ट यांनी प्रस्ताव मागविणेकामी तयार केलेल्या प्रस्तावपत्राप्रमाणे टाईम्स् ऑफ इंडिया व महाराष्ट्र टाईम्स् या वृत्तपत्रातून व संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. त्यानूसार एकुण सात संस्थांनी प्रकल्पात स्वारस्थ असलेबाबत कळविले आहे.

जाहिरातीत नमूद केलेनुसार प्रस्ताव सादर करणेची अंतिम तारीख २१/१०/२०१० होती, त्यानुसार सात संस्थांनी सहभाग घेणेस सहमती दर्शविली. प्रकल्पाचे उभारणीबाबत असलेल्या त्रुटी व शंकाबाबत दि. २० ऑक्टोबर, २०१० रोजी झालेल्या निविदापुर्व बैठकीचे इतिवृत्त व विनंती प्रस्तावातील अटी शर्ती स्पष्ट होणेकामी करारनाम्याचा प्रारुप मसुदा संबंधीत संस्थांना पाठविणेत आला. तसेच प्रस्ताव सादर करणेबाबत दि. २० नोव्हेंबर, २०१० पर्यंत अखेर मुदतवाढ देणेत आली.

उपरोक्त प्रकल्पाबाबत स्वारस्य असलेल्या / इच्छुक असलेल्या संस्थांची नांवे खालील प्रमाणे-

| | |
|---|---|
| 01. | Laservision Mega- Media Ltd., Hong Kong. |
| 02. | Baji- Rao- Pawar and Sons and Associates, Worli, Mumbai |
| 03. | Emotion Media Factory, Germany |
| 04. | Laser Events Private Limited, Bangalore |
| 05. | Premierworld Technology Ltd., Kolkata |
| 06. | Samarth Enterprises, Mumbai |
| 07. | 3P Infrastructure Pvt. Ltd., Mumbai. |

उपरोक्त पैकी ज्या संस्थांचे प्रस्ताव प्राप्त होतील, ते उघडून त्याचे तांत्रिक मुल्यांकन करणेस मान्यता मिळणेस व त्यावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८६३** **उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे अ.नं.१,४ व ५ या संस्थानी सादर केलेल्या प्रस्तावातील लिफाफा क्र.०१ (Technical Bid)आजचे सभेपुढे उघडण्यात आला. यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड कापरे,नवी दिल्ली यांचेकडून समक्ष प्रस्तावाचे मुल्यांकन करुन घेण्यात यावे व त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी, असें ठरलें.**

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१६** **श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागासाठी आर्थोपेडीक इन्स्ट्रूमेंट व शॅडोलेस लॅम्प खरेदीकामी प्राप्त झालेल्या Commercial Bid उघडणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात सन २००६ साली ऑर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभाग कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. त्या वेळेस सदर विभागात शस्त्रक्रियांसाठी लागणारे वेगवेगळया कंपनीचे इन्स्ट्रुमेंट खरेदी करण्यात आलेली होते, तीच इन्स्ट्रुमेंट सध्या वापरात आहेत. परंतु रुग्णांच्या सततच्या वाढणाऱ्या संख्येमुळे सध्या असलेली काही इन्स्ट्रुमेंट ही वापरुन खराब झालेली आहे, तर काही विशिष्ट प्रकारच्या शस्त्रक्रियासाठी विशिष्ट इन्स्ट्रुमेंटची आवश्यकता आहे. त्यामुळे ऑर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाने दि. ०८/१२/२००९ चे पत्रान्वये त्यांना लागणाऱ्या इन्स्ट्रुमेंटची तातडीने मागणी केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि. १८/०४/२०१० रोजीचे सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थोपेडीक थिएटर हया विभागासाठी लागणारे इन्स्ट्रुमेंट खरेदी कामी येणाऱ्या अंदाजे रु. १६,३९,२११/- चे खर्चास व सदरचे खरेदीकामी विहीत पद्धतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागविण्यास मान्यता मिळालेली आहे.

सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात इंडियन एक्सप्रेस - मुंबई, सकाळ - पुणे, लोकमत - नागपूर या इंग्रजी वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा टाकण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि. १०/०५/२०१० ते २२/०५/२०१० पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकरण्याची अंतिम मुदत दि. २५/०५/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण २६ उत्पादक कंपन्या/पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र. ७००५ दि. ०६/०५/२०१० अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन १७ तांत्रिक निविदा प्राप्त झालेल्या होत्या. प्राप्त तांत्रिक निविदा दि.०७/०८/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तुलनात्मक तक्ता बनविण्यात आलेला आहे. उपरोक्त तांत्रिक तुलनात्मक तक्ता श्री साईबाबा

हॉस्पिटलमधील आर्थोपेडीक सर्जन डॉ. जपे व प्रवरा हॉस्पिटल, लोणी येथील आर्थोपेडीक सर्जन प्रोफेसर डॉ. याडकीकर यांना दाखवून घेण्यात आलेला आहे. दोन्ही डॉक्टरांनी सर्व इन्स्ट्रुमेंटची शिफारस करताना इन्स्ट्रुमेंटचा प्रत्यक्ष वापर, नामांकित कंपनी, इन्स्ट्रुमेंटचा दर्जा इत्यादीचा विचार करुन खालीलप्रमाणे कंपन्याची शिफारस केलेली आहे.

| Sr.No. | Name of Item | Recommendation of Dr. Jape - Shri Saibaba Hospital | Recommendation of Dr. Yadkikar, Pravara Hospital, Loni |
|---|---|---|---|
| 1 | High Intensity Shadowless Lamp | Maquet | Shadowless lamp with CCD Camera 2 output.<br>1. UZUMCU Tibbi Cihaz-Turkey,<br>2. (A) Maquet<br>(B) Surgiris, France<br>3. TRUMPF MEDIZIN SYSTEME GMBH+ CO. KG, Germany |
| 2 | General Orthopedic Instrument | Sushrut Surgical, Medicon-Germany, Kalelkar, Indian, MDE | Sushrut Surgical, Medicon-Germany, Indian, S.H.Pitkar |
| 3 | Arthoscopy Hand Instrument | RZ Medizintechnik-Germany | Smith & Nephew |
| 4 | AMP Set | S.H.Pitkar | Sushrut Surgical |
| 5 | Spine Set | Medicon-Germany, Sushrut Surgical | Sushrut Surgical |

सदरचे खरेदीकामी प्राप्त Commercial Bid खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1 | M/s. Aarya Enterprises, Pune |
| 2 | M/s. Ashish & Company, Delhi. |
| 3 | M/s. Biomed Healthtech (P) Ltd., Mumbai |
| 4 | M/s. Biomedicon Systems (I) Pvt. Ltd., Mumbai |
| 5 | M/s. Dalvi & Sons, Mumbai |
| 6 | M/s. Eagle Medical Systems Pvt. Ltd., New Delhi |
| 7 | M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai |
| 8 | M/s. Everest Medical Technologies Pvt. Ltd., Mumbai |
| 9 | M/s. Inor Medical Products Ltd., Mumbai |
| 10 | M/s. Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai |
| 11 | M/s. Medical Development & Engg., Pune |
| 12 | M/s. Qualisurge Surgicals Pvt. Ltd., Pune |
| 13 | M/s. S.H. Pitkar Orthotools Pvt. Ltd., Pune |
| 14 | M/s. Sairam Biomedics, Mumbai |
| 15 | M/s. Spectravision Meditech, Pune |
| 16 | M/s. Zenith Surgical Company, Mumbai |
| 17 | M/s. Maruti Surgical, Mumbai |

वरीलपैकी अ.नं. १७ यांची निविदा Technical व Commercial Bid हे एकाच पाकीटात असल्यामुळे उर्वरीत अ.नं. १ ते १६ Commercial निविदा समक्ष उघडून मिळणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.८६४** **श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागासाठी आर्थोपेडीक इन्स्ट्रूमेंट व शॅडोलेस लॅम्प खरेदीकामी उपरोक्तप्रमाणे प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१७** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता मशिनरी /उपकरणे/फर्निचर खरेदीकामी प्राप्त तांत्रिक बाबींच्या (Technical Bid) निविदा उघडणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील पॅथोलॉजी विभाग, श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपडीक, जनरल व न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने खालीलप्रमाणे मशिनरी / उपकरणे / फर्नीचरची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे सध्या असलेली काही मशिनरी / उपकरणे / फर्नीचर वापरुन खराब झालेले आहेत, तर काही नविन मशिनरी / उपकरणे / फर्नीचरची त्यांना आवश्यकता आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०५/०९/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्र.७०१ अन्वये सदरची मशिनरी/उपकरणे/फर्नीचर खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.१८,७२,८०५/- चे खर्चास व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

सदरच्या खरेदीची रक्कम जास्त असल्याने जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात महाराष्ट्र टाईम्स - मुंबई या इंग्रजी वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यात आली होती, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा टाकण्यात आली होती.

निविदा विक्रीची मुदत दि.०६/१०/२०१० ते १६/१०/२०१० पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकरण्याची अंतिम मुदत दि.१८/१०/२०१० अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण २० उत्पादक कंपन्या/पुरवठा धारक यांना इकडील पत्र क्र. ३६७३ दि.०४/१०/२०१० अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन मुंबई कार्यालयात ५ निविदा तर शिर्डी येथील कार्यालयात १ निविदा अशा एकूण ६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 1 | M/s. Mitra Indstries Pvt. Ltd., Faridabad, Haryana |
| 2 | M/s. Summit Healthcare (P) Ltd., Mumbai |
| 3 | M/s. Staan Bio-Med Engineering Pvt. Ltd., Coimbatore |
| 4 | M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai. |
| 5 | M/s. Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai. |
| 6 | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०६ तांत्रिक बाबींच्या सिलबंद निविदा आजच्या सभेपुढे समक्ष उघडण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८६५** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता मशिनरी /उपकरणे/फर्निचर खरेदीकामी प्राप्त प्राप्त झालेल्या उपरोक्तप्रमाणे तांत्रिक बाबींच्या (Technical Bid) निविदा आजचे सभेत समक्ष उघउझ्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१८** **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Micro Scissor खरेदी कामी प्राप्त कोटेशन उघडणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२९/०७/२०१० रोजीचे मागणी पत्रान्वये खालील प्रमाणे Micro Scissor ची मागणी केलेली आहे. कारण सध्या असलेल्या सिझर नादुरुस्त असल्यामुळे कंपनीकडे दुरुस्तीसाठी पाठविण्यात आलेल्या आहेत, तसेच शस्त्रक्रियांची संख्यादेखील वाढलेली आहे. त्यामुळे सदरचे सिझरची ऑपरेशन थिएटर विभागात दैनंदिन शस्त्रक्रियेकरीता अत्यंत आवश्यकता आहे. त्यानुसार खालील प्रमाणे Micro Scissor खरेदीचा प्रस्ताव आहे. सदरचे खरेदीकामी Aesculap कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. इम्पेरीयल सर्जिकल, मुंबई यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांचे दि. ०९/०८/२०१० रोजीचे फॅक्स दरपत्रकानुसार सदरचे खरेदीकामी रु.२,८८,९५२/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Catalogue No. | Description | Make | Qty. | App. Rate Per in Rs. | App.Total Cost in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | FD012R | MICRO SCSRFLT-HDL/ CROSS – ERSTR120MM | Aesculap | 1 | 44669.67 | 44669.67 |
| 2 | FD013R | MICRO SCSRFLT-HDL/ CROSS – ERCVD120MM | Aesculap | 1 | 48782.41 | 48782.41 |
| 3 | FD022R | YASARGIL MICRO SCISSOR STR 185MM | Aesculap | 1 | 62485.91 | 62485.91 |
| 4 | FD023R | JACOBSON MICRO SCISSORS CVD 185MM | Aesculap | 1 | 68656.73 | 68656.73 |
| 5 | FM042R | MICRO SPRING SCISSORS STR SP/SP 180MM | Aesculap | 1 | 64357.19 | 64357.19 |
| | | | | | **Total in Rs.** | **2,88,951.90** |

वरीलप्रमाणे Micro Scissor विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. २,८८,९५२/- चे खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०५/०९/२०१० चे सभेत मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ३५७८ दि.२८/०९/२०१० अन्वये एकुण १० अधिकृत विक्रेते / पुरवठा धारकांकडून दि.१६/१०/२०१० अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे तीन कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

१. M/s. AVM Healthcare Products Pvt. Ltd., New Delhi (बंद कोटेशन प्राप्त दि.१२/१०/२०१०)

२. M/s. Zenith Surgical Co., Mumbai (बंद कोटेशन प्राप्त दि.१२/१०/२०१०)

३. M/s. Imperial Surgical Company, Mumbai (बंद कोटेशन प्राप्त दि.०६/१०/२०१०)

तसेच मे.क्रिटीकल केअर सिस्टीम,पुणे यांचे बंद कोटेशन दि.२१.१०.२०१० रोजी प्रशासन शाखेकडे तर दि.२५.१०.२०१० रोजी रुग्णालयाकडे प्राप्त झालेले आहे, ते देखील सदरचे खरेदीकामी विचारात घ्यावे असे मत आहे. कारण प्राप्त सर्व कोटेशन हे बंद स्थितीत आहे.

तरी वरीलप्रमाणे प्राप्त चार बंद कोटेशन पैकी तीन मुदतीत प्राप्त कोटेशन व एक मुदतीनंतर प्राप्त कोटेशन आजचे सभेपुढे समक्ष उघडून मिळणेबाबत पुढील आदेश होणेस विनंती.

**निर्णय क्र.८६६ श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Micro Scissor खरेदी कामी प्राप्त झालेल्या उपरोक्तप्रमाणे कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. या कोटेशन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१९ संस्थानचे निमगांव को-हाळे येथील कर्मचारी निवासस्थानाचे सबस्टेशन परिसरात ब्लॉक बसविणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १६९ मधील कर्मचारी निवासस्थान इमारत बांधणेत आलेली आहे. इमारतीकरीता विद्युतपुरवठा करणेकामी प्लॉटचे उत्तर पश्चिम कोपऱ्यात १५मी.x१४मी. साईज मधील जागेत सबस्टेशन उभारण्यात आलेले आहे. सदर सबस्टेशन आवारात झाडे झुडपे व गवत यांचा वांरवार उपद्रव होतो तसेच पावसाळ्यात चिखल होतो करीता सदर ठिकाणी ब्लाक बसविणेबाबत विद्युत विभागाने मागणी केली आहे.

करीता सदरचे भागात मुरुम फिलींग करुन ब्लॉक बसविणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr.No. | Description | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Supplying Hard Murum | 31.50 | 194 | $M^3$ | 6111.00 |
| 02 | Spreading Hard Murum | 31.50 | 10.50 | $M^3$ | 330.75 |
| 03 | Providing & fixing 60 mm thick factory made interlocking concrete paving blocks in m-10 Grade | 210.00 | 456 | $M^2$ | 95760.00 |
| | | | | | 95760.00 |
| | Add 5% Contengen | | | | 4,788.00 |
| | **Total Amount** | | | | **1,00,548.00** |

उपरोक्त तपशिलप्रमाणे निमगांव को-हाळे येथील गट नं. १६९ मधील कर्मचारी निवासस्थाने इमारतीचे सबस्टेशन आवारात कॉंक्रीट ब्लॉक बसविणेकामी येणारे रुपये १,००,५४८.०० मात्र खर्च येईल. तरी सदर खर्चास व सदरचे काम स्थानीक ठेकेदारामार्फत कोटेशन मागवून करुन घेणसे मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, निमगांव को-हाळे येथील गट नं. १६९ मधील कर्मचारी निवासस्थाने इमारतीचे सबस्टेशन आवारात एम.एस.ई.बी. चे इंजिनिअरचे सल्ल्याने खडीकरण करण्यात यावे व फक्त मधील रस्त्यास कॉंक्रीट ब्लॉक बसविण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२० नाताळ सुट्टीचे नववर्षा निमित्ताने होणारे गर्दीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी शामियाना मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणे बाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक २५ डिसेंबर, २०१० ते दि. ०२ जानेवारी, २०११ अखेर ०९ दिवस शैक्षणिक व इतर कार्यालयानां सुट्या आहेत. याकालावधीत श्रीं चे दर्शनासाठी साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने, मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरते निवास व्यवस्थेकरीता खालील ठिकाणी शामियाना मंडप कनात व बिछायतीसह, दर्शन रांगेसाठी बॅरेकेटींग, बाथरुम व्यवस्थेसाठी पार्टीशन व्यवस्था तसेच नववर्षाचे स्वागतासाठी स्वागत कमाणी व कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व इ. अनुषंगीक व्यवस्था करुन घेता येईल.

**अ) <u>नाताळ सुट्टी निमीत्ताने शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह व्यवस्था :-</u>**

**०१. <u>शामियाना मंडप, पार्टीशन :- दि. २५ डिसेंबर, २०१० ते दि. ०२ जानेवारी, २०११ अखेर ०९ दिवस-</u>**

| अ.नं. | मंडप तपशिल | साईज | एकुण चौ. फुट |
|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्तनिवासस्थान पार्किंग दक्षिण बाजूस कनात व बिछायतीसह शामियाना मंडप साईभक्तांचे निवास व्यवस्थेसाठी | ४५'x ३९०' | १७५५०.०० |
| ०२ | साईबाबा भक्तनिवासस्थान पार्किंग पश्चिम बाजूस प्रसाद भोजना करीता शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह | ३०'x ९०' | २७,००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | साईनगर मैदानावर साईभक्तांचे निवासव्यवस्थेकरीता शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह | २००'X१००' | २०,०००.०० |
| ०४ | जुने प्रसादालय पार्किंगचें ठिकाणी कनात व बिछायतीसह | १५०'X१५०' | २२५००.०० |
| ०५ | श्री साई प्रसादालय येथे कनात व बिछायतीसह शामियाना मंडप | १००'X१००' | १००००.०० |
| ०६ | जुने प्रसादालय परिसरामधील लाडू विक्री काउंटर समोर | ३०'X ३०' | ९००.०० |
| | | एकुण चौ. फुट.. | ७३६५०.०० |

**०२. पार्टीशन व्यवस्था :- दि. २५ डिसेंबर, २०१० ते दि. ०२ जानेवारी, २०११ अखेर ०९ दिवस**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | साईनगर व श्री साई प्रसादालय बाहेरील बाजूस १० फुट उंचीचे जी. आय. पत्रे वापरुन आतिल बाजूने सुशोभित कापड बांधून बाथरुम व्यवस्थे कामी ६' उंचीचे पार्टीशनची उभारणी करणे. | ३००.०० रनिंग फुट | ३००.०० |
| ०२ | दर्शन रांगच्या बाजूने शामियाना मंडपासाठी वापरण्यात येणाऱ्या कापडाची ६ फुट उंचीची कनात बांधणे. | ७५० रनिग फुट | ७५०.०० |

**०३. दर्शन रांगेसाठी बॅरेकेटींग व्यवस्था :- दि. २५ डिसेंबर,२०१० ते दि. ०२ जानेवारी,२०११ अखेर ०९ दिवस-**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | दर्शन रांगेकरीता व श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलिंग व्यवस्थेकामी व इतर आवश्यक ठिकाणी ४' उंचीचे लोखंडी पाईप / बांबू वापरुन भक्कम बांधी करुन बॅरेकेटींग करणे. | २१०० रनिग फुट | २१०० |

**ब) शिर्डी महोत्सव करीता स्वागत कमाणी उभारणी करणे.:- कालावधी दि. २९.१२.२०१० ते दि. ०१.०१.२०११ अखेर ०४ दिवस.**

**०१. स्वागत कमाणी :-**

| अ.नं. | मंडप तपशिल | साईज | परिमाण |
|---|---|---|---|
| ०१ | नगर - मनमाड रोडवर बॉक्स टाईप स्वागत कमाणी उभारणे. २०' उंचीच्या | ३० मिटर लांबी | ०२ नग |
| ०२ | स्वागत कक्षा जवळ स्वागत बॉक्स टाईप कमाण उभारणे. २०' उंचीची | १५ मिटर लांबी | ०१ नग |

**०२. साईनगर येथील मैदानावर शिर्डी महोत्सवाकरीता स्टेज उभारणे :- दि. २९.१२.२०१० ते दि. ०१.०१.२०११ अखेर ०४ दिवस.**

| **अ.नं.** | **स्टेजचा तपशिल** | **साईज** | **परिमाण** |
|---|---|---|---|
| ०१ | सदरहू स्टेजवर सुमारे ४० ते ५० कलाकारांसाठी ३'-६" उंचीचे स्टेज अँगल फ्रेममध्ये मजबूत बांधी तयार करुन, स्टेजचे वरिल बाजूने भक्कम असे प्लायवूड वापरुन व मजबूत सपोर्ट देऊन ३०' x२०' साईजचे स्टेज तयार करणे., तसेच सदरहू स्टेजचे वरिल बाजूने ताडपत्री बांधून, आतिल बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधून, स्टेज फ्रेमचे चारही बाजूने सुशोभित एकाच रंगाचे कापड बांधणे, स्टेजचे पुढील भागासाठी सुशोभित एकाच रंगांचा सुमारे ३५' लांबीचा व १५' उंचीचा पडदा बसविणे. तसेच स्टेजचे बाजूस कलाकारांचे मेकअपसाठी २०'x१५' साईजच्या ०२ ग्रीन रुम जाड कापडामध्ये तयार करणे. स्टेजवर व साईभक्तांना बसणेकामी १०,००० चौ. फुट मॅटीन, २००० नग फायबर खुर्च्या पुरविणे व कार्यक्रमाचे वेळी व्यवस्थीत मांडणी करुन देणे. तसेच स्टेजचे पुढील बाजूने ०२ ठिकाणी स्पीकर ठेवणेसाठी ६'x६' चे प्लॅटफॉर्म तयार करणे व स्टेजचे समोर ४' उंचीचे १५० रनिंग फुट बॅरेकेटींग करणे इ. सह. स्टेज व्यवस्था | ३०' x२०' | ६००.०० |

उपरोक्त अ प्रमाणे नाताळ सुट्टयांचे कालावधीत मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रु. १,८७,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच ब नूसार शिर्डी महोत्सव-२०१०-११ निमीत्ताने कलाकारांचे कार्यक्रमासाठी स्टेज व स्वागत कमाणी उभारणी करुन घेणेकामी अंदाजे रु. ७०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच वरिल **"अ"** व **"ब"** नूसार व्यवस्था करुन घेणेकामी अंदाजे एकुण रु.२,५७,०००/- मात्र इतका खर्च येईल.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६.०३.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २६६ अन्वये दोन किंवा अधिक सुट्यांचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी संस्थानचे मोकळ्या जागेत आवश्यक तेथे कापडी / शामियाना मंडप उभारणी करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे.

वरिलप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणारे अंदाजे एकुण रु. २,५७,०००/- मात्रचे खर्चास व सदरहू कामी अशा प्रकारचे काम करणारे खालील मंडप ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागविता येईल.

| अ. नं. | मंडप फर्मचे नांव | अ. नं. | मंडप फर्मचे नांव |
|---|---|---|---|
| ०१. | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ०६. | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर |
| ०२. | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | ०७. | प्रकाश मंडप डेकोरेटर्स, वैजापूर |
| ०३. | श्री. भिमराज भागुजी गाडेकर, राहाता | ०८. | स्वस्तिक मंडप वर्क्स, अहमदनगर |
| ०४. | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | ०९. | जोंधळे मंडप डेकोरेटर्स, कोकणगांव (संगमनेर) |
| ०५. | शर्मा मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, वैजापूर | | |

तरी याकामी येणारे अंदाजे रु. २,५७,०००/- मात्रचे खर्चास व उपरोक्त मंडप ठेकेदार यांचेकडून प्राप्त होणारी दरपत्रके उघडून त्यावर निर्णय होणेस विनंती.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता प्रथम ठेकेदार यांना दरपत्रकातील व्यवस्थेपैकी स्टेज व्यवस्था १ दिवस २००० नग खुर्च्याऐवजी १००० नग खुर्च्या व कमानी दोन दिवस विचारात घेऊन दर देणेबाबत सांगण्यात आले. त्यानुसार त्यांनी देऊ केलेल्या दराचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव | कामाचा तपशिल / परिमाण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ) नाताळ सुट्टी निमीत्ताने (दि. २५.१२.२०१० ते दि. ०२.०१.२०१० अखेर ०९ दिवस ) | | | | ब) शिर्डी महोत्सव करीता | | |
| | | ०१. शामियाना मंडप एकुण ७३६५० चौ. फुट | ०२. पार्टीशन व कनात व्यवस्था | | ०३. बॅरेकेटींग व्यवस्था. एकुण २१०० रनिंग फुट | ०१. स्वागत कमाणी ०३ नग (दि. ३१.१२.२०१० ते दि. ०१.०१.२०११ अखेर ०२ दिवस ) | | ०२.स्टेज व्यवस्था ६०० चौ. फुट दि. ३१.१२.१० रोजी (०१ दिवसाकरीता) |
| | | | पार्टीशन ३०० र. फुट. | कनात ७५० र. फुट | | ३० मिटर लांबी | १५ मिटर लांबी | |
| | | प्र. दि. प्र. चौ. फुट | प्र. दि. प्र. र. फुट | प्र. दि. प्र. र. फुट | प्र. दि. प्र. र. फुट | प्र. दि. प्र. नग | प्र. दि. प्र. नग | प्रति दिवस |
| | | ०१ | ०२ | | ०३ | ०४ | | ०५ |
| ०१ | **कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर** | | | | | | | |
| | कोटेशन मधील दर | २.०० | २०.०० | १.५० | ८.०० | ९००.०० | ७००.०० | २८०००.०० |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | **०.९०** | **६.००** | **१.००** | **३.००** | **९००.००** | **७००.००** | **३५,०००/-** |
| ०२ | **बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर** | | | | | | | |
| | कोटेशन मधील दर | १.४० | १०.०० | ३.०० | ९.०० | ३५०० | ३००० | ३०२५० |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | १.०० | ६.०० | १.५० | ३.४० | २५०० | २५०० | ३५००० |
| ०३ | **रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर** | | | | | | | |
| | कोटेशन मधील दर | १.०० | २५.०० | ७.०० | ५.०० | २००० | १५०० | १५००० |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | १.०० | ११.०० | २.०० | ३.०० | १५०० | १००० | उपलब्ध नाही |
| ०४ | **स्वस्तिक मंडप वर्क्स, अहमदनगर** | | | | | | | |
| | कोटेशन मधील दर | १.२५ | ८.२० | १.०० | ८.०० | ३००० | २००० | २८७५० |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | १.१० | ७.५० | १.०० | ७.०० | २५०० | १८०० | ९०००० |
| ०५ | **झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी** | | | | | | | |
| | कोटेशन मधील दर | १.१७ | १०.०० | ३.०० | १०.०० | ३००० | २५०० | २९२५० |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | ०९० | ९.०० | २.५० | ९.०० | २५०० | २००० | ४५००० |
| ०६ | **श्री. भिमराज भागुजी गाडेकर, राहाता** | | | | | | | |
| | कोटेशन मधील दर | २.०० | २५.०० | २५.०० | २०.०० | ५००० | ५००० | ३७५०० |
| | चर्चा अंती देऊ केलेले दर | १.७५ | २५.०० | २०.०० | २०.०० | ५००० | ५००० | ६०००० |

**निर्णय क्र.८६८** **उपरोक्त ठेकेदारांनी चर्चा तथा वाटाघाटी अंती देऊ केलेले दरामध्ये मे. कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे सर्व व्यवस्थेचे एकत्रित स्वरुपाचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांचेकडून सदरचे काम करुन घेणेस व याकामी येणारे रु. ७,१६,२१५ मात्रचे खर्चास तसेच दरम्यानचे काळात साईभक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढल्यास आवश्यकतेनूसार मंडप व इतर अनुशंगीक व्यवस्था उपरोक्त मंजूर दराने करुन घेणेस व याकामी येणारे सर्वसमावेशक खर्चासही मान्यता देणेत यावी,असे ठरले.**

**तसेच, यापुढे जानेवारी महिन्यात वर्षभराचे उत्सव, गर्दीचे दिवस यांचा विचार करुन भक्तांची करावयाची सोय विचारात घेऊन वार्षिक टेंडर काढावे व सर्व Item चे दर ठरवावेत, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१** **दिपावली सुट्टीचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व्यवस्था करणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१० ते दि. २१ नोव्हेंबर, २०१० अखेर १५ दिवस दिपावली सणानिमीत्त शैक्षणिक व इतर कार्यालयानां सुट्या आहेत. याकालावधीत साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्याने, याही वर्षी मागील वर्षाप्रमाणे साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरते निवास व्यवस्थेकरीता साईबाबा भक्तनिवासस्थान व लाडू काउंटरचे ठिकणी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, कनात, बिछायतीसह एकुण २०८५०.०० चौ. फुट व्यवस्था करुन घेता येईल.

**(ब)** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १६.०३.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २६६ अन्वये दोन किंवा अधिक सुट्यांचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी संस्थानचे मोकळया जागेत आवश्यक तेथे कापडी / शामियाना मंडप उभारणी करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे.

उपरोक्त परिछेद अ प्रमाणे मंडप व्यवस्था करुन घेणेकामी खालील पाच ठेकेदार यांनी सादर केलेली सिलबंद दरपत्रके मा. कार्यकारी अधिकारी व मा. उपकार्यकारी अधिकारी यांचे समक्ष दि. ०१.११.२०१० रोजी उघडण्यात आली असून, दरपत्रक सादरकर्त्यांती दिलेल्या दराबाबत त्यांचेशी चर्चा तथा वाटाघाटी करणेत आल्या असून, त्यांनी खालील प्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ. नं. | दरपत्रक सादरकर्त्यांचे नांव | कामाचा तपशिल एकुण २०,८५०.०० चौ. फुट मंडप दि. ०७.११.२०१० ते २१.११.२०१० अखेर १५ दिवस | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशन मधील दर | रक्कम | चर्चा तथा वाटाघाटी नंतरचे दर | रक्कम |
| ०१. | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | १.०० | ३१२७५०.०० | १.०० | ३१२७५०.०० |
| ०२. | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | १.७९ | ५५९८२२.५० | १.१० | ३४४०२५.०० |
| ०३. | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | ०.७९ | २४७०७२.५० | काम करु शकत नाही असे सांगीतले | |
| ०४. | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | १.०० | ३१२७५०.०० | **०.९०** | **२८१४७५.००** |
| ०५. | स्वस्तिक मंडप वर्क्स, अहमदनगर | ०.६० | १८७६५०.०० | गैरहजर | |

**(क)** वरिलपैकी अ. नं. ०५ चे स्वस्तिक मंडप वर्क्स, अ. नगर यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा करुन त्यांना त्यांचे दर निम्नतम् असलेबाबत व आपण काम करण्यास तयार आहात काय? म्हणून विचारले असता, त्यांनी सांगीतले की, कामाचा कालावधी कमी आहे व त्या दरामध्ये आता काम करणे अशक्य असल्याने मी Lowest जरी असलो तरी या वेळेस काम करता येणार नाही असे सर्वा समक्ष कळविले. तसेच अ. नं. ०३ चे व्दितीय निम्नतम दरपत्रक सादरकर्ते बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर यांनीही काम करुन शकत नसल्याचे चर्चा तथा वाटाघाटी अंती सांगीतले. करीता उपरोक्त अ. नं. ०१, ०२ व ०४ चे दरपत्रक सादरकर्त्यांनी देऊ केलेले दरामध्ये अ. नं. ०४ चे (रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर) यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना त्वरीत काम सुरु करणेबाबत सूचना करणेत आली आहे.

तरी सदरचे काम ठेकेदार मे. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणारे रु. २,८१,४७५/- मात्रचे खर्चास मंजूरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८६९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त खर्चास व प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२ नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, अहमदनगर यांना कार्यालयीन कामकाजासाठी एक संगणक संच (प्रिंटरसह) उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव- (अ) विषयांची पूर्वपीठीका :**

**०१.** यापूर्वी मा.सहाय्यक संचालक, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, अहमदनगर शाखा यांनी मा. अध्यक्षसाो. यांना अग्रेषित केलेल्या त्यांचेकडील पत्र क्रमांक आस्था/संगणक मागणी/ससंअ/ १०५६, दिनांक २५ जुलै, २००७ अन्वये असे कळविले होते की, या कार्यालयाची कार्यकक्षा पूर्ण अहमदनगर जिल्हा अशी आहे. शासनाच्या धोरणानुसार शासकीय कामकाज जलदगतीने होण्यासाठी कार्यालयाचे संगणकीकरण होणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाकडून शिर्डी विकास योजना तसेच आपल्या संस्थानाकडून विकसित होणाऱ्या प्रकल्पासाठीचे कामकाज, आवश्यक ते मार्गदर्शन व सहकार्य करुन केले जाते. सबब आपल्या संस्थानकडून या कार्यालयास एक संगणक व दोन प्रिंटर उपलब्ध करुन देणेत यावेत.

**०२.** उपरोक्त विनंती वजा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ११ ऑगष्ट, २००७ रोजीचे सभेत प्रस्ताव विचारार्थ सादर करणेत आला असतां, त्यावर निर्णय क्रमांक ६७० अन्वये सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली असा निर्णय झालेला आहे.

**(ब)** आता, मा. सहाय्यक संचालक, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक संकीर्ण/संगणक संच मागणी/ससं अ/३५८९, दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१० अन्वये, श्री साईबाबा विश्वस्तव्यवस्था शिर्डीच्या निधीतून एक संगणक संच (प्रिंटरसह) उपलब्ध करुन देणेबाबत पुनःश्च विनंती केली आहे. सदर पत्रावर, मा. विश्वस्त डॉ.गोंदकर साो. यांनी सदर कार्यालयाची मागणी ही व्यवस्थापन मंडळसमोर ठेवावी, असा अभिप्राय दिलेला आहे.

**(क)** मा. सहाय्यक संचालक, नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग,अहमदनगर शाखा यांचे कार्यालयाकडे, संस्थानच्या विविध विकास प्रकल्पाचे बांधकाम आराखडे, नकाशे मंजूर करणेसाठी, विकास प्रकल्पांच्या बांधकामाबाबत मार्गदर्शन घेणे तसेच खरेदी करण्यात येणाऱ्या / भूसंपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीचे मूल्यांकन करणेसाठी वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात येतो. बहुतेकदा समक्ष संपर्क साधून संस्थानचे महत्वाच्या प्रकल्पांच्या विकासासंबंधी, बांधकामासंबंधी मंजुरी आणणेत येते.

तसेच शिर्डी विकास योजनेतील महत्वाच्या आरक्षणांबाबत व इतर कार्यालयीन कामकाजाच्या अनुषंगाने विविध कागदपत्रांच्या, नकाशांच्या नक्कला मिळविणेसाठी सदर कार्यालयाशी वेळोवेळी संपर्क साधावा लागतो. त्यामुळे नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, अहमदनगर यांनी मागणी केल्याप्रमाणे एक संगणक संच (प्रिंटरसह) उपलब्ध करुन देणेबाबत विचार होणेस हरकत नाही. याकामी एक संगणक संच (प्रिंटरसह) उपलब्ध करुन द्यावयाचा झाल्यास अंदाजित रक्कम रुपये ०१ लाख मात्र पर्यन्त खर्च येईल. तथापि, संगणक संच (प्रिंटर) सह नगर रचना कार्यालयास उपलब्ध करुन द्यावयाचा झाल्यास अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाची मान्यता घ्यावी लागेल, असे मत आहे.

**निर्णय क्र.८७० यावर सविस्तर चर्चा होऊन, नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, अहमदनगर यांना कार्यालयीन कामकाजासाठी एक संगणक संच (प्रिंटरसह) उपलब्ध करुन देणेकामी प्रथम छाननी समितीची मान्यता घेण्यात यावी. मा.छाननी समितीचे मान्यतेनंतरच अधिनियमातील तरतूदीनुसार मा.शासनाकडे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात यावा,असें ठरलें.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.२३ श्री. मच्छिंद्र सुरेश वदक यांची मौजे निमगांव को-हाळे येथील गट नंबर २३९ मधील ०० हे १८ आर जमीन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव- (अ) विषयाची पूर्वपीठीका :**

**०१.** श्री. मच्छिंद्र सुरेश वदक यांनी त्यांचे मालकीची मौजे निमगांव को-हाळे येथील येथील गट नंबर २३९ मधील क्षेत्र ०० हे १८ आर जमीन संस्थानने खरेदी करावी, म्हणून दिनांक १२ एप्रिल, २०१० रोजी दिलेला प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ एप्रिल, २०१० रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेत आला होता.

सदर प्रस्तावावर निर्णय क्रमांक ४१९ खालील प्रमाणे झालेला आहे :

आजचे सभेत जमीनमालक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांना सभेने रुपये १.७५ लाख प्रति आर हा दर देऊ केला. तथापि जमीनमालक यांनी याबाबत नंतर निर्णय कळवू, असे सांगितले.

**०२.** तसेच सभेपुढे सादर करणेत आलेल्या प्रस्तावात जमीनमालक श्री. मच्छिंद्र सुरेश वदक हे अज्ञान असल्याने, मालमत्ता विकण्यासाठी मा. दिवाणी न्यायाधीश यांची परवानगी आणणे आवश्यक आहे, असे नमूद केले होते. तथापि, तद्नंतर अर्जदार यांनी दिनांक १८ ऑगष्ट, २०१० रोजी जमिनीचा ७/१२ उतारा सादर केलेला आहे, त्यामध्ये अज्ञान पालक कर्ता सुवर्णा सुरेश यांचे नांव कमी करणेत येऊन, अर्जदार श्री. मच्छिंद्र सुरेश वदक यांचे नांव मालकी हक्काने लागलेले आहे. त्यामुळे आता मा. दिवाणी न्यायाधीश यांचे परवानगीची आवश्यकता राहिलेली नाही.

**०३.** दरम्यानचे कालावधीत, मा. दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून इकडील दिनांक ०७ सप्टेंबर, २०१० रोजीचे पत्राने, विषयांकित गट नंबर २३९ चे ७/१२ उता-यात श्री.मच्छिंद्र सुरेश वदक यांचे क्षेत्र ०० हे १८ आर आणि श्री.बबन जयवंता वदक व इतर ०६ यांचे क्षेत्र ०० हे ६० आर असे एकूण क्षेत्र ०० हे ७८ आर नमूद केलेले आहे. अर्जदार श्री. मच्छिंद्र सुरेश वदक यांचे क्षेत्र तुकडे जोड तुकडे बंदी कायद्यानुसार प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असल्याने ते खरेदी करता येईल किंवा कसे याबाबत अभिप्राय मागविणेत आला होता.

त्या अनुषंगाने, मा. दुय्यम निबंधक, राहाता यांनी दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१० रोजीचे पत्राने, श्री. मच्छिंद्र सुरेश वदक यांचे ०० हे १८ आर क्षेत्राचा खरेदीखताचा दस्त नोंदणी करता येईल, असा अभिप्राय दिलेला आहे.

**०४.** तसेच, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ एप्रिल, २०१० रोजीचे सभेतील निर्णयानुसार, अर्जदार श्री. मच्छिंद्र सुरेश वदक यांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०१० रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झालेल्या पत्रानुसार, विषयांकित जमीन रुपये १,७५,०००/- मात्र प्रति गुंठा / आर या दराने खरेदी देणेस तयार असलेबाबत संमती कळविलेली आहे.

**(ब)** तरी आता, अर्जदार श्री. मच्छिंद्र सुरेश वदक यांचे मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नंबर २३९ मधील क्षेत्र ०० हे १८ आर हे रक्कम रुपये १,७५,०००/- मात्र प्रति आर (अक्षरी रुपये एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र प्रति आर ) या दराने खरेदी करणेस, तसेच मान्य दरानुसार विषयांकित जमिनीच्या एकूण किंमतीच्या ८० टक्के रक्कम खरेदीखत नोंदणीचे वेळेस आदा करणे व उर्वरित २० टक्के रक्कम जमिनीस संस्थानचे नांव लागलेनंतर, संस्थानमार्फत जमिनीची सरकारी मोजणी झालेनंतर प्रत्यक्ष ताब्यात मिळणारे जमिनीच्या प्रमाणात आदा करणेस, जमीन खरेदी करणेपुर्वी संस्थान वकिलांमार्फत सर्च रिपोर्ट घेणे, अभिप्राय घेणे, त्या अनुषंगाने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करणे, खरेदीखत नोंदविणेसाठी मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, वकील फी आदा करणे आदि व इतर अनुषंगिक कामांसाठी येणा-या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८७१ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील परिच्छेद "ब" मध्ये नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४ सौ. गिताबाई जयराम चौधरी व सौ. शैला भारत चौधरी, राहणार नांदुर्खी बुद्रूक यांनी त्यांची मालकीची मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नंबर ९७ पैकी मधील जमीन संस्थानने खरेदी करावी म्हणून दिलेल्या प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** सौ. गिताबाई जयराम चौधरी व सौ. शैला भारत चौधरी, राहणार नांदुर्खी बुद्रूक यांनी दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१० रोजीचे विनंती अर्जाव्दारे असा प्रस्ताव दिला आहे की, मौजे कोऱ्हाळे शिवारातील ८.५ एकर क्षेत्र रस्त्यालगत असून त्यापैकी ४ एकर क्षेत्र संस्थानला योग्य मोबदल्यात देण्यास इच्छुक आहोत. त्यानंतर दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१० रोजीचे अर्जाव्दारे, गट नंबर ९७ मधील जमिनींपैकी सौ. गिताबाई जयराम चौधरी यांचे हिश्श्याची ०१ हे ४१ आर जमीन विहीरीसह व त्या लगत सौ. शैला भारत चौधरी यांचे ०१ हे ९९ आर हिश्श्यापैकी ०० हे २१ आर अशी एकूण ०१ हे ६२ आर जमीन देणेस तयार आहोत, असा प्रस्ताव दिला आहे.

सदर विनंती अर्जासोबत त्यांनी मौजे कोऱ्हाळे येथील गट नंबर ९७ चा ७/१२ चा उतारा जोडला असून, त्याचे अवलोकन केले असतां, खालीलप्रमाणे वस्तु:स्थिती दिसून येत आहे :

| अ.नं. | भोगवटादाराचे नांव | गावाचे नांव व गट नंबर | गटामधील क्षेत्र | इतर हक्कातील नोंदी |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रयागाबाई अर्जुन चौधरी | **मौजे कोऱ्हाळे,** | ०१ हे १९ आर | ०१. उमा पुंजा ८४ क चा सवलतीचा दाखला मिळविला. |
| ०२ | गिताबाई जयराम चौधरी | तालुका राहाता | ०१ हे ४१ आर | ०२. [ पुनर्वसन कायदा लागु ] |
| ०३ | शैला भारत चौधरी | **गट नंबर ९७** | ०१ हे ९९ आर | ०३. [ युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा राहाता ता.ग.ख.क.घे.] ०४. नांदुर्खी वि. का. से. स. सो. प्र. प. क. घे. |
| | | | ०४ हे ५९ आर<br>०० हे ०५आर पोख | |
| | | **एकुण** | **०४ हे ६४ आर** | |

७/१२ उताऱ्यात, जमीन धारणा प्रकार भोगवटदार वर्ग १ ची असून, पीकपहाणीस गिताबाई जयराम चौधरी डाळींब १.४१, शैला भारत चौधरी डाळींब १.७९, न.सु.ऊस ०.२० अशी नोंद आहे. यावरुन जमीन बागायती आहे. सौ. गिताबाई जयराम चौधरी यांच्या जमिनीत विहीर आहे. परंतु ७/१२ला त्याची नोंद नाही. संबंधित अर्जदार यांना कामगार तलाठी, मौजे कोऱ्हाळे यांचेशी संपर्क साधून उचित नोंद करुन घेणेबाबत सांगणेत आलेले आहे. याशिवाय इतर हक्कांत, उमा पुंजा ८४ चा सवलतीचा दाखला मिळविला अशी नोंद आहे, त्याबाबत सदर नोंदीचे फेरफार तपासून, कायदेशीर अभिप्राय घेता येईल.

तसेच उपरोक्त जमिनी कविता विजय आहेर यांचेकडून सौ. गिताबाई जयराम चौधरी यांनी तसेच लक्ष्मीबाई गुलाब आहेर यांचेकडून सौ. शैला भारत चौधरी यांनी खरेदी केलेल्या आहेत. त्याबाबत दोन्ही खरेदीखताच्या प्रती मागवून, सदर जमिनी पोटखराबासह खरेदी केल्या आहेत किंवा कसे याबाबत खात्री करणेत येत आहे.

**(ब) जमिनीची भौगोलिक वस्तु:स्थिती व उपयुक्तता :**

मौजे नांदुर्खी बुद्रुक येथील गट नंबर ३३१ व ४४६ मधील अंदाजे ३७ एकर जमीन संस्थानला अद्यायवत व सुसज्ज रुग्णालय (हॉस्पीटल) उभारणी विनामुल्य उपलब्ध व्हावे म्हणून मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस मागणी केलेली आहे. या नियोजित रुग्णालयाच्या जमिनीपासून अर्जदार यांची जमीन अंदाजे ०३ किलोमीटर अंतरावर उत्तरेस आहे.

सदर जमीन सध्या हरीत पट्टयात आहे, तेथे बांधकाम अनुज्ञेय नाही. परंतु हरीत पट्टयातून सदर क्षेत्र वगळून रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करावा लागेल. सदर जमिनी निवासी क्षेत्रात समाविष्ट झालेनंतरच त्याठिकाणी बांधकाम करता येईल. सदरची जमीन नियोजित रुग्णालयाच्या नजीक असल्याने त्याठिकाणी रुग्णालयासंबंधीत कर्मचारी अथवा त्या अनुषंगाने एखादा विकास प्रकल्प राबविणेस उपयुक्त आहे.

**(क) किंमतीबाबत :**

अर्जदार यांनी जमिनीची अपेक्षित किंमत किती मिळावी, याबाबत मागणी केलेली नाही. फक्त योग्य मोबदल्यात देण्यास तयार आहोत तसेच चर्चेसाठी बोलविण्यांत यावे, असे नमुद केलेले आहे.

सन २०१० च्या शासकीय मुल्यांकन दरसुचीनुसार, मौजे कोऱ्हाळे हे गांव ग्रामीण क्षेत्रात नमूद केलेले असून, ते विभाग सहा मध्ये समाविष्ट केलेले आहे. सदर जमिनीचे लागवडीलायक क्षेत्र०४ हे ५९ आर असून, आकार रुपये १०.६५ मात्र आहे, म्हणजेच प्रति हेक्टर आकार रुपये २.३२ मात्र येत

आहे, त्यानुसार सदर जमिनीचा दर रुपये ७,५०,०००/- मात्र प्रति हेक्टर म्हणजेच रुपये ७,५००/- मात्र प्रति आर येत आहे. जमीन बागायत असल्याने, जिरायत जमिनीचे दुप्पट दर गृहीत धरणेत येतो, त्यानुसार रुपये १५,०००/- मात्र प्रति आर हा दर येत आहे.

**(ड)** अर्जदार यांनी अर्जासोबत, ॲड.व्ही.जी.आसने यांचा सदर जमिनीबाबत सर्च रिपोर्ट जोडलेला आहे. त्यात असे नमुद केले आहे की, सदर जमिनी खातेदारांचे नांवे मालकी हक्काने कायेदशीररित्या आहे, तथापि बँक व सोसायटी यांचेकडून कर्जबोजा नसलेबाबत दाखला घेणेत यावा.

तसेच, अर्जदार यांनी त्यांचे मालकीचे एकूण जमिनीपैकी फक्त ४ एकर जमीन देऊ केली आहे, त्याबाबत मा. दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून अशा प्रकारे जमिनीचे खरेदीखत नोंदविता येईल किंवा कसे याबाबत अभिप्राय घेता येईल.

उपरोक्त विवेचनास अनुसरुन, खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती :

०१. मौजे कोऱ्हाळे, तालुका राहाता येथील गट नंबर ९७ पैकी मधील सौ. गिताबाई जयराम चौधरी यांची ०१ हे ४१ आर व सौ. शैला भारत चौधरी यांची ०० हे २१ आर अशी एकूण ०१ हे ६२ आर जमीन खरेदी करणेत यावी किंवा कसे.

०२. अर्जदार यांनी त्यांचे एकूण क्षेत्र ०३ हे ४० आर जमिनीपैकी प्रत्येकी देऊ केलेले ०१ हे ६२ आर क्षेत्र तुकडे जोड तुकडे बंदी कायद्याचा विचार करता, खरेदी करता येईल किंवा कसे याबाबत मा. दुय्यम निबंधक, राहाता व संस्थान वकिलांचा अभिप्राय घेऊन कार्यवाही करणेस मान्यता असावी.

०३. जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमिनीचे किंमतीबाबत अर्जदार यांचेशी चर्चा-तथा-वाटाघाटी करुन जमिनीचा प्रती आर दर ठरविणे.

०४. जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, खरेदीखत नोंदविणे, जमिनीची सरकारी मोजणी करणे, मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे आदि अनुषंगिक खर्चास मान्यता असावी.

उपरोक्त जमिन मालक व त्यांचे प्रतिनिधी जमिनीचे किंमतीबाबत व इतर बाबींबाबत चर्चा/वाटाघाटी करण्यासाठी आजचे सभेत समक्ष उपस्थीत होते. जमिन मालाकांनी जमीनीची किंमत रुपये ५५ लाख मात्र प्रति एकर मिळावी अशी विनंती केली.

**निर्णय क्र.८७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन जमिन मालकांशी सविस्तर चर्चेअंती रुपये ५० लाख मात्र प्रति एकर म्हणजेच रुपये १,२५,०००/-मात्र प्रति आर हा दर मान्य केला.**

**त्यास अनुसरुन मौजे कोऱ्हाळे,ता.राहाता,येथील गट ९७ पैकी मधील सौ.गिताबाई जयराम चौधरी यांची ०१ हे.४१ आर व सौ.शैला भारत चौधरी यांची ०० हे २१ आर अशी एकुण १ हे ६२ आर जमिन रक्कम रुपये १,२५,०००/- मात्र प्रति आर या दराने खरेदी करणेस मान्यता देण्यात आली. तथापि, तत्पूर्वी जमिन मालक यांनी गट नं.९७ आर इतर हक्कात असलेली "उमा पुंजा ८४ क चा दाखला मिळविला" ही नोंद कमी करुन आणावी. अशी नोंद कमी केलेबाबतचा फेरफार उतारा जमिन मालक यांनी सादर केल्यानंतर विषयांकित जमिन खरेदीकामी विहित पद्धतीने संस्थान वकिलामार्फत सर्च रिपोर्टसह कायदेशीर अभिप्राय घेऊन खरेदीखत नोंदणीचे वेळेस जमीनीचे एकूण किंमतीच्या ८० % रक्कम आदा करणेस व उर्वरित २०% रक्कम जमीनीस संस्थानचे नाव लागलेनंतर संस्थानमार्फत रितसर शासकीय मोजणी करुन ताब्यात मिळणारे जमीनीचे प्रमाणात रक्कम आदा करणेस तसेच जमिन खरेदीकामी मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, सरकारी मोजणी शुल्क, वकिल फी आदी व इतर अनुषंगिक कामांसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५** **श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिम बाजूस असलेल्या वॉल कंम्पाऊंडची उंची वाढविणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय विभागाने त्यांचे दि.१६/१०/२०१० रोजीचे टिपणीनुसार श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील कंपाउंड भिंतीची उंची वाढविणेस कळविले आहे. सध्या पश्चिमेकडील व उत्तरेकडील कंपाउंड भिंत ६' उंच असून त्यावर ४' उंच काटेरी तार लावलेली आहे. तसेच दक्षिणेकडील कंपाउंड भिंत कॉंक्रीट ब्लॉक मध्ये ४' उंचीची बांधलेली असून त्यावर ३' उंच चेनलींक फेन्सींग केलेली आहे. परंतू रुग्णालय विभागाने उपरोक्त टिपणी नमूद केलेप्रमाणे रुग्णालय परिसराच्या पश्चिमेकडील भागात राहणारे लोक सदर वॉल कंपांउड वरुन ये-जो करतात. यापुर्वी इकडील विभागामार्फत जादा काटेरी तार लावून त्यांचे ये-जा करणेचा मार्ग बंद केला होता. परंतू काही दिवसात तेथील रहीवाशांनी कोटरी तार तोडून दुसऱ्या ठिकाणाहून पुन्हा ये-जा सुरु केली.

तरी याकरीता रुग्णालय विभागाचे मागणी प्रमाणे पश्चिम व उत्तर बाजुच्या कंपाउंड भिंतीची उंची दोन फुटाने वाढवून त्यावर तिन फुटाची चेनलींक फेन्सींग करावी लागेल. तसेच दक्षिण बाजुकडील सध्या ब्लॉक मध्ये केलेली कंपाउंड भिंत काढून त्याठिकाणी ७' उंचीची भिंत बांधावी लागेल तसेच त्यावर ३' उंचीची चेनलींक फेन्सींग करावी लागेल. याकरीता अंदाजे रु.३.२५ लक्ष मात्र खर्च अपेक्षीत आहे.सदरचे काम तातडीचे असल्याने ठेकेदार संजय गणपत गायकवाड यांचेकडून साईबाबा

भक्तनिवासस्थान इमारतीचे पश्चिमेकडील कंपाउंड भिंत बांधणेचे मागिल मंजूर दरात सदरचे काम करुन घेता येईल.

तरी श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील कंपाउंड भिंतीची उंची वाढविणेस व त्यासाठी येणारे रु.३.२५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस व सदरचे काम ठेकेदार संजय गणपत गायकवाड यांचे मागिल मंजूर दरात सदरचे काम करुन घेणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील कंपाउंड भिंतीची उंची वाढविणेस व त्यासाठी येणारे रु.३.२५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. सदरचे काम ठेकेदार संजय गणपत गायकवाड यांचे मागिल मंजूर दरात (साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे पश्चिमेकडील कम्पाऊंड भिंत बांधणेचे दरात) करुन घेण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६ समाधी मंदिराचे उत्तरेकडील बाजूस व गुरुस्थान मंदिरासमोर एम.एस.स्ट्रक्चर वापरुन पॉलिकॉर्बोनेट शीटस्‌चे शेड उभारणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. श्री. बाळासाहेब विखे पा., माजी खासदार व केंद्रिय मंत्री, भारत सरकार यांनी त्यांचेकडील दिनांक २६ मे, २०१० रोजीचे पत्राने, समाधी मंदिराचे उत्तरेकडील बाजूस व गुरुस्थान मंदिरासमोर आवश्यक त्या उंचीचे प्लास्टीक कोटेड मंडप कायमस्वरुपी उभारल्यास भाविकांना उन्हाळयात व पावसाळयात त्याचा उपयोग होईल. तसेच उत्तरेकडील मंडपात भजन व इतर सांस्कृतिक कार्यक्रम करणेही शक्य होईल. पिंपळवाडी रस्त्याचे कडेने सध्या जो कायमस्वरुपी मंडप उभारला आहे, त्याचा भाविकांना फार उपयोग होत आहे, तशाच प्रकारचा मंडप उभारण्याची गरज आहे, असे कळविले आहे.

यापूर्वी, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ जानेवारी, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३१ अन्वये, समाधी मंदिर परिसरात विविध ठिकाणी, विविध १२ आकाराचे एम.एस.स्ट्रक्चर वापरुन पॉलीकार्बोनेटचे मागे-पुढे घेता येईल असे छत उभारणेबाबत व त्याकामी आर्किटेक्ट अमृता पवार, नाशिक यांची नेमणूक करणेबाबत निर्णय घेणेत आलेला होता. याकामी अशा प्रकारचे कामे करणाऱ्या एका संस्थेने आपल्या प्राथमिक अहवालात, अशा मंडप उभारणीसाठी अंदाजे ८ कोटी मात्र खर्च येईल, असे कळविले होते.

उपरोक्त निर्णयानुसार, आर्किटेक्ट अमृता पवार, नाशिक यांनी दिनांक २१ एप्रिल, २००७ रोजीचे पत्राने, सदर प्रकल्पाचा अभ्यास करुन तसेच मंदिर परिसराचे आर्किटेक्ट मे.माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली यांच्या प्रतिनिधी श्रीमती सोनिया काप्रे यांचेशी चर्चा करुन, अशा प्रकारे मंडप उभारणी केल्यास मंदिराच्या पुरातन वास्तूच्या देखणेपणास बाधा येईल, अशा मंडपाच्या दैनंदिन साफ-सफाई व देखभालीचे काम मोठे राहील, मोठया प्रमाणात गर्दी झाल्यास कोंदटपणा निर्माण होऊन भाविकांना त्रास होईल व या प्रकल्पाचा खर्च ही मोठा म्हणजेच अंदाजे रुपये ८ कोटी मात्र असल्याने अशा प्रकारची मंडप उभारणी करु नये. त्याऐवजी कमी खर्चाचे व लावता-काढता येतील अशा प्रकारच्या इतर पर्यायांचा विचार व्हावा, असे कळविले. त्यामुळे सदर प्रस्तावावरील कार्यवाही प्रलंबित ठेवणेत आली होती.

**(ब)** संस्थानने नुकतीच जुन्या पिंपळवाडी रस्त्यावर तसेच नगर-मनमाड रस्त्याचे पूर्व बाजूचे पदपाथवर एम.एस. स्ट्रक्चर उभारणी करुन त्यावर पॉलिकार्बोनेट शीटस् असलेल्या कायमस्वरुपी छताची उभारणी केलेली आहे. त्याच धर्तीवर, समाधी मंदिराचे उत्तर बाजूस व गुरुस्थान मंदिरासमोरील मोकळया जागेत आवश्यक त्या ठिकाणी एम. एस. स्ट्रक्चर असलेले पॉलीकार्बोनेट शीटस् वापरुन छत उभारणी करणे शक्य आहे अथवा पी.व्ही.सी. फॅब्रिक वापरुन ही छत उभारणी ही करता येईल. यासाठी मंदिर परिसराचे आर्किटेक्ट मे. माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली यांचेकडून प्राथमिक आराखडे तयार करुन घेता येतील.

तरी उपरोक्त प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.८७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानने नुकतीच जुन्या पिंपळवाडी रस्त्यावर तसेच नगर-मनमाड रस्त्याचे पूर्व बाजूचे पदपाथवर एम.एस. स्ट्रक्चर उभारणी करुन त्यावर पॉलिकार्बोनेट शीटस् असलेल्या कायमस्वरुपी छताची उभारणी केलेली आहे. त्याच धर्तीवर, समाधी मंदिराचे उत्तर बाजूस व गुरुस्थान मंदिरासमोरील मोकळया जागेत आवश्यक त्या ठिकाणी एम. एस. स्ट्रक्चर असलेले पॉलीकार्बोनेट शीटस् वापरुन छत उभारणी करणेस अथवा पी.व्ही.सी. फॅब्रिक वापरुन ही छत उभारणी करण्यात यावी. यासाठी मंदिर परिसराचे आर्किटेक्ट मे. माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली यांचेकडून प्राथमिक आराखडे तयार करुन घेण्यास व याकामी येणार सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७ रुग्णवाहिकेकरीता पार्किंग शेड करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालय विभागाने नविन कार्डीयाक ॲम्ब्युलन्स करीता पार्किंग शेड करणेस दिनांक ०८/१०/२०१० रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार रुग्णालय परिसरात पार्किंग शेड करणेसाठी सोबत जोडलेल्या नकाशानुसार अतिदक्षता विभागाचे लिफ्ट जवळ कलर कोटेड पत्रे वापरुन चारही बाजुने बंदीस्त असे शेड तयार करणेसाठी रु.१,४५,०००.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयाकरीता नविन कार्डीयाक ॲम्बुलन्स करीता पार्किंग शेड तयार करणेसाठी स्थानिक ठेकेदारांकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागवून काम करुन घेणेस व याकामी येणारे रु.१,४५,०००.०० मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णवाहिकेकरीता पार्किंग शेड अतिदक्षता विभागाचे लिफ्टजवळ करण्यात यावे. सदरचे पार्किंग शेड तयार करणेसाठी स्थानिक ठेकेदारांकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागवून काम करुन घेणेस व याकामी येणारे रु.१,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२८ श्री साई प्रसादालय येथील बस थांब्याकरीता शेड उभारणीबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांचे सोयीसाठी साईबाबा भक्तनिवासस्थान ते श्री साई प्रसादालय अशी संस्थानमार्फत विनामुल्य बस सेवा सुरु आहे. सदर बसमधून साई भक्त साईबाबा भक्त निवासस्थान येथून श्रींचे दर्शनासाठी येतात. दर्शन झाल्यावर श्री साई प्रसादालय येथे प्रसादभोजन घेतात. सदर बससेवेमुळे प्रसाद भोजनासाठी साईभक्तांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांना थांबणेसाठी प्रसादालयाचे कंपाउडचे बाहेर दक्षिण बाजूस ७२'x१५' या साईजमध्ये ताडपत्रीसह मंडप उभारण्यात आला होता. परंतू सदर मंडप वादळ व पावसामुळे वेळोवळी दुरुस्त करावा लागत असल्याने सध्या काढून घेण्यात आला आहे. त्यासाठी दि.१९/१०/२०१० चे पत्रान्वये प्रशासकीय अधिकारी यांनी ताडपत्री कापडाचा मंडपाची वारंवार दुरुस्ती करावी लागणार असल्याने तसेच साईभक्तांसाठी सदर शेडची नेहमीकरीता गरज लागणार असल्याने सुशोभित कायमस्वरुपी शेडची उभारणी करणेकामी कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

श्री साई प्रसादालय परिसरात सदरहू शेडचे उभारणीकरीता जागा उपलब्ध नाही. सदरचे शेड यापुर्वी उभारणेत आलेल्या ताडपत्री मंडपाचे जागेवर श्री साई प्रसादालयाचे दक्षिण कम्पाऊंड लगत मुख्य प्रवेशव्दाराचे पश्चिम बाजूस ६४'x१०' या साईजमध्ये पूर्व पश्चिम ऑनिंग शेड उभारता येईल. याकामी सोबत जोडलेल्या एस्टीमेटप्रमाणे सिव्हील काम करणेसाठी अंदाजे रु.१,५८,२८५/- व ऑनिंग शेड उभारणीकामी अंदाजे रु.९३,६००/- असे एकूण अंदाजे रक्कम रु.२,५१,८८५/- मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी श्री साईप्रसादालय येथे साईभक्तांचे सोयीसाठी बसथांब्यासाठी शेड उभारणी करीता येणारे रक्कम रु.२,५१,८८५.०० मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय येथे साईभक्तांचे सोयीसाठी बसथांब्यासाठी शेड उभारणी कामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणारे रक्कम रु.२,५१,८८५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल विद्यार्थ्यांसाठी वर्ग खोल्यांचे बांधकाम करणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे ज्यु. केजी ते इ. १० वी पर्यंतचे वर्ग असुन जवळजवळ १५६३ विद्यार्थी / विद्यार्थीनी शाळेत शिक्षण घेत आहे. दिवसेदिवस शाळेकडील विद्यार्थी संख्येत वाढ होत असून, वर्ग / खोल्यांची कमतरता भासत आहे. सन २००९-१० मध्ये एकुण तुकडी संख्या २६ होती व ३१ वर्ग / खोल्या उपलब्ध होत्या. चालू वर्षी विद्यार्थी संख्या वाढल्याने मागील वर्षाच्या तुलनेत तुकडी संख्या ३० व वर्ग / खोल्या ३१ आहेत. त्यामुळे वर्ग / खोल्यांचा अभाव असल्याने तात्पुरत्या स्वरुपात कन्या विद्या मंदीर कडील हॉल घेऊन तेथे पार्टीशन करुन चालु वर्षी २ वर्ग चालवित आहोत.

दि. ०१ सप्टेंबर, २०१० रोजी मा. अध्यक्ष सो व विश्वस्त, मा. श्री. डॉ. गोंदकर यांनी शाळेला भेट दिली असता, पुढील शैक्षणिक वर्ष २०११-२०१२ मध्ये वर्ग / खोल्यांचे नियोजनाबाबत चर्चा झाली असता, चालू वर्षाच्या नियोजनाप्रमाणे वर्ग / खोल्याच पुढील वर्षाकरीता वापरल्या तर ज्यु. केजी या वर्गासाठी फक्त १ तुकडी करावी लागेल. गेल्या २ ते ३ वर्षाचा विचार केला असता ज्यु. केजी प्रवेशासाठी वाढती मागणी असल्याने पुढील ज्यु. केजीचे जादा वर्ग चालविणे शक्य होणार नाही." अशी अडचण मा. अध्यक्ष व विश्वस्त यांचेपुढे प्राचार्या, इं. मि. स्कुल यांनी मांडली असता, त्यांनी बालउद्यान मध्ये ४ ते ५ वर्ग / खोल्या बांधकाम विभागामार्फत तात्पुरत्या स्वरुपात तयार करणेसंबंधी सूचविले असल्याचे श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांनी त्यांचेकडील दि. ०३.०९.२०१० रोजीचे टिपणी अन्वये कळविले आहे.

**(ब)** उपरोक्त प्रमाणे प्राचार्या, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल यांनी कळविलेप्रमाणे शैक्षणिक संकुल परिसरात (सर्व्हे नं. १०७ व १०९ मध्ये) नव्याने बांधकाम करणेसाठी F.S.I. ची पडताळणी करुन शिर्डी नगरपंचायतची बांधकामास मान्यता घेणे प्रस्तावीत करण्यात येत आहे. सदर ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात विट बांधकामात व छतासाठी कलर टाटा ब्ल्यु स्कोप सीट वापरुन, ले-आऊट प्लॅन प्रमाणे पाच वर्ग / खोल्या बांधून घेता येईल. याकामी इकडील विभागामार्फत तयार केलेले अंदाजपत्रकानूसार रु. १५,८६,६२१/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी याकामी येणारे अंदाजे रु. १५,८६,६२१/- मात्रचे खर्चास व सदरहू कामी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन स्पर्धात्मक निविदा मागविणेस मंजूरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल विद्यार्थ्यांसाठी वर्ग खोल्यांचे बांधकाम करणेकामी येणारे अंदाजे रु. १५,८६,६२१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन स्पर्धात्मक निविदा मागविणेत याव्यात असे ठरले.**

(कार्यवाही-बाधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.३०** **"श्रीं"ना अर्पण करणेत येणाऱ्या श्रीफळांची (नारळांची) विक्री करणे बाबत.**

**प्रस्ताव-** 'श्रीं' च्या दर्शनासाठी येणारे भक्त 'श्रीं ' चे समाधी मंदिर, व्दारकामाई, अदी ठिकाणी श्रध्देने श्रीफळ (नारळ) अर्पण करतात. सध्या 'श्रीं 'ना अर्पण करणेत येणारे नारळ बगीचा विभागामार्फत एकत्रित करुन सरंजामे बागेतील नारळ कक्षात साठवुन ठेवणेत येतात. व हे साठवलेले नारळ मंदिर, प्रसादालय विभाग यांना त्यांचे मागणी प्रमाणे व आवश्यकतेनुसार वेळो-वेळी पुरविण्यात येतात.

पूर्वी नारळ फोडण्याचे जागी भक्ताने नारळ जमा केलेनंतर ती फोडुन त्याचे दोन भाग करुन त्यापैकी एक भाग भक्तांना प्रसाद रुपाने देणेत येत होता.व दुसरा भाग आपल्याकडे ठेवण्यात येत होता. सध्या या ठिकाणी भक्ताकडून संपुर्ण नारळ जमा करुन घेणेत येतात, त्यामुळे नारळ जमा होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. नारळ फळांचा साठा मोठया प्रमाणात होत आहे.

सध्या दरमहा अंदाजे ३०० ते ५०० पोते नारळ जमा होतात. त्या पैकी दरमहा १५० ते २०० पोते नारळ वापरले जातात. थोडक्यात जमा होणाऱ्या नारळांच्या प्रमाणात दररोज वापरण्यात येणाऱ्या नारळांचे प्रमाण फारच कमी आहे.उत्सवात व सुट्टीच्या कालावधीत जमा होणाऱ्या नारळ फळांचे प्रमाणे जास्त असते. नारळ फळे जास्त दिवस टिकत नसल्याने ते लवकर खराब होतात.

यापुर्वी साठवलेले व जमा होणारे मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक.०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक - ८८४ अन्वये दि.०७/११/२००९ ते दि.०६/११/२०१०अखेर कालावधीसाठी १२ महिन्यांचे रु.१.९० प्रति नारळ या दराने नारळ घेवुन जाणेचा ठेका देण्यात आलेला होता.त्यापासुन लेखाशाखेत रु.७,८०,०००/-मात्र भरणा करण्यात आलेला आहे.

त्या प्रमाणेच याही वर्षी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन उच्चोत्तम दराने नारळांची विक्री करणेसाठी सिलबंद दरपत्रके मागविण्यास मान्यता असावी .

**निर्णय क्र.८७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, "श्रीं"ना अर्पण करणेत येणाऱ्या श्रीफळांची (नारळांची) विक्री करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सिलबंद दरपत्रके मागविण्यात यावेत असे ठरले.**

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३१** **श्री दत्तजयंती २०१० निमित्त फुलांची सजावट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री राजेंद्र डंग,दिल्ली. हे श्री. दत्त जयंती -२०१०. या निमित्ताने दिनांक २०/१२/२०१० रोजी श्री दत्त मंदिर, समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन देण्यास तयार आहे.यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे. मागील दोन वर्षापासून श्री दत्त जयंती निमित्त त्यांनी सजावट केलेली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी म्हणुन सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते. श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१०. मध्ये बंगलोर येथील साईभक्त श्री.के.सी. सुब्रामनी राजु व दिपावली साठी श्री राजेंद्र तलवार यांनी देणगी दाखल सजावट केलेली होती.

तरी श्री राजेंद्र डंग, दिल्ली. यांना श्री दत्त जयंती निमित्त फुलांची सजावट करणेस व दर्शनासाठी पास, जेवणासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी हॉल व रुम देता येईल.

**निर्णय क्र.८७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री राजेंद्र डंग,दिल्ली यांचेकडून श्री. दत्त जयंती -२०१० या निमित्ताने दिनांक २०/१२/२०१० रोजी श्री दत्त मंदिर, समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन घेण्यात यावे . याकामी त्यांना दर्शन,**

**जेवणासाठी पास व सजावटीचे सामान ठेवणेसाठी हॉल व रुम विनामुल्य देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३२ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Solid Linen Trolley खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व वॉर्ड / ऑपरेशन थिएटरचे लिनन ठेवण्यासाठी श्री साईनाथ रुग्णालयाने दि. ०२/१०/२०१० रोजीचे डी. पी. क्र. १२६९५ अन्वये Solid Linen Trolley - १३ नगांची मागणी केलेली आहे. सदरचे खरेदीकामी एका नगासाठी अंदाजे रु. ४,३००/- याप्रमाणे एकुण रक्कम रु.५५,९००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सध्या नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागासाठी मशिनरी / उपकरणे / फर्नीचर खरेदीकामी प्राप्त निविदा उघडून पुढील खरेदीची कार्यवाही चालु आहे व त्यामध्ये ०३ नग Solid Linen Trolley खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. सदर खरेदीमध्ये उपरोक्त १३ नग वाढवून चर्चा / वाटाघाटी करुन खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त १३ नगांची संख्या वाढवून घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु. ५५,९००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८८० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३३ श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडिक ऑपरेशन थिएटर विभागासाठी Arthoscopy Shaver Blade खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाने दि. ०७/०८/२०१० रोजीचे मागणी पत्रान्वये Arthoscopy Shaver Blade - १० नगांची मागणी केलेली आहे. सदरचे ब्लेड आर्थोपेडीक शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असतात. सध्या त्यांचेकडे असलेले ब्लेड हे २ ते ३ वर्षापुर्वी खरेदी करुन देण्यात आलेले असून ते वापरुन पुर्णपणे खराब झालेले आहेत, त्यामुळे त्यांना नविन ब्लेडची तातडीने आवश्यकता आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Qty. |
|---|---|---|
| 01. | Reusable Shaver Blade No. 10.1610 Big Size | 10 |

श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता दि. १०/०१/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ३७ अन्वये विहित पध्दतीने कोटेशन मागवून मे. स्पेक्ट्राव्हीजन मेडीटेक, मुंबई यांचेकडून इकडील पत्र क्र. ४४०० दि. ०९/०३/२०१० अन्वये प्रती नग रु.१४,१००/- याप्रमाणे ०४ नग खरेदी करण्यात आलेले आहे. उपरोक्त दरानुसार सदरचे खरेदीकामी अंदाजे रु. १,४१,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे Arthoscopy Shaver Blade विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १,४१,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८८१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडिक ऑपरेशन थिएटर विभागासाठी Arthoscopy Shaver Bladeविहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. १,४१,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३४ Pacemaker चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात डॉ. बजाज हे पुर्ण वेळ कार्डीओलॉजिस्ट आहेत. त्यांनी श्रीमती नर्मदाबाई मंडलिक या पेशंटला दि.२०/०७/२०१० रोजी पेसमेकर बसविलेला आहे.

सदरचे शस्त्रक्रियेकरीता त्यांनी St. Jude Medical Co. चा Pacemaker VVIR हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग वापरलेला आहे. सदर पेसमेकर करीता वार्षीक खरेदीमध्ये पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अवये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

डॉ. बजाज यांनी उपरोक्त पेसमेकरची मागणी केली होती. त्यानुसार M/s. Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून बील क्र. १०२८ दि.२२/०७/२०१० (डिलेव्हरी चलन - नं. २२०७ दि.२०/०७/२०१०) अन्वये एक नग रु.६३,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.२०/०७/२०१० रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर पेसमेकर बसविणेकामी एकूण रु. ८५,९३०/- इतका खर्च आलेला असून त्यास जीवनदायी योजनेअंतर्गत रक्कम रु. ८५,०००/- इतके मंजूर झाले होते व उर्वरीत रक्कम रु. ९३०/- त्यांनी हॉस्पिटलचे वित्त विभागात पावती नं. ३११७७ अन्वये जमा केलेली असून ती माहितीस्तव सोबत सादर केलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे M/s. Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त पेसमेकरचे बीलाची रक्कम रु.६३,०००/- M/s. Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांना अदा करण्यात आलेली आहे.

**(ब)** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात डॉ. बजाज हे पुर्ण वेळ कार्डीओलॉजिस्ट आहेत. त्यांनी श्री. पटेल फत्तू बाबू या पेशंटला दि.३०/०७/२०१० रोजी पेसमेकर बसविलेला आहे.

सदरचे शस्त्रक्रियेकरीता त्यांनी St. Jude Medical Co. चा Verity ADx XL SR Pacemaker हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग वापरलेला आहे. सदर पेसमेकर करीता वार्षीक खरेदीमध्ये पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

डॉ. बजाज यांनी उपरोक्त पेसमेकरची मागणी केली होती. त्यानुसार M/s.Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून बील क्र.११०८ दि.३१/०७/२०१० (डिलेव्हरी चलन नं. २३४१ दि.३०/०७/२०१०) अन्वये एक नग रु.६३,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.३०/०७/२०१० रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर पेसमेकर बसविणसाठी रु.८५४३५/- इतका खर्च आलेला असून जीवनदायी योजनेअंतर्गत रक्कम रु.८५,०००/- इतके मंजूर झालेले होते तर उर्वरीत रक्कम रु.४३५/- हॉस्पिटल पावती नं. २१०२९९७७ दि.२८/०६/२०१० अन्वये भरलेली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे M/s. Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त पेसमेकरचे बीलाची रक्कम रु.६३,०००/- M/s. Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांना अदा करण्यात आलेली आहे.

**(क)** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात डॉ. बजाज हे पुर्ण वेळ कार्डीओलॉजिस्ट आहेत. त्यांनी श्री. रमेश झांबरे या पेशंटला दि.०६/०९/२०१० रोजी पेसमेकर बसविलेला आहे.

सदरचे शस्त्रक्रियेकरीता त्यांनी St. Jude Medical Co. चा Pacemaker VVIR हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग वापरलेला आहे. सदर पेसमेकर करीता वार्षीक खरेदीमध्ये पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

डॉ. बजाज यांनी उपरोक्त पेसमेकरची मागणी केली होती. त्यानुसार M/s. Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून बील क्र. १४६५ दि.०७/०९/२०१० (डिलेव्हरी चलन नं. ३०१५ दि.०६/०९/२०१०) अन्वये एक नग रु.६३,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.०६/०९/२०१० रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर पेसमेकर बसविणेकामी एकूण रु. ८८,५२२/- इतका खर्च आलेला असून त्यांना महाराष्ट्र शासन जीवनदायी योजने अंतर्गत पत्र क्र. २९६३२ - ३३ दि. २८/०७/२०१० अन्वये रक्कम रु. ८५,०००/- इतके मंजूर झालेले आहेत व उर्वरीत रक्कम रु. ३५२२/- त्यांनी हॉस्पिटलचे वित्त विभागात पावती नं. २१०३१२३२ अन्वये जमा केलेली असून ती माहितीस्तव सोबत सादर केलेली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे M/s. Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त पेसमेकरचे बीलाची रक्कम रु.६३,०००/- M/s. Sinocare Surgicals Pvt. Ltd., Mumbai यांना अदा करण्यात आलेली आहे.

**निर्णय क्र.८८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ,ब व क अन्वये Pacemaker चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चाची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३५** **Inj Gastrovideo १००ml चे पुरवठा आदेशाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील रेडीओलॉजी विभागाकरीता सन २०१०-११ या वर्षाकरीता लागणाऱ्या उपरोक्त Inj.Gastrovideo १००ml करीता वार्षीक औषधे खरेदीमध्ये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यात आल्या होत्या. सदर इंजेक्शनकरीता एकुण २ निविदाधारकांचे दर प्राप्त झाले होते. त्यामध्ये निम्न्तम दर असलेले मे. स्पंदन बायोटेक, औरंगाबाद यांचे Genetek नामांकित कंपनीची निवड करुन त्यांचे निविदेमधील दर प्रती नग रु.३००/- प्रमाणे ५०० नगाचा इकडील पत्र क्र.१८५१ दि.२०/०७/२०१० अन्वये रु.१,५०,०००/- इतक्या रक्कमेच पुरवठा आदेश देण्यात आला होता.

मे. स्पंदन बायोटेक, औरंगाबाद यांनी नमूना म्हणून दिलेले १० नग Inj.Gastropaque ३०ml हे रेडीओलॉजी विभागात वापरण्याकरीता देण्यात आले होते. वापरल्यानंतर रेडीओलॉजी विभागाने Inj. Gastropaque ३०ml चे रिपोर्ट समाधान कारक नाही, असे कळविले आहे. त्यामुळे Genetek कंपनी ऐवजी क्रमांक २ चे दर असलेले निविदाधारक मे. इमॅजनिंग प्रोडक्टस् इं.लि., मुंबई यांनी H. Jules या कंपनीचे दर प्रती नग ३५७.०६३० असे दिलेले आहेत. सदर कंपनीचे Inj.Gastrovideo १०० ml आपण यापूर्वी रुग्णालयात वापरले असून त्याचे रिपोर्ट समाधान कारक आहे.

तेंव्हा सदर Inj.Gastrovideo १०० ml मे. इमॅजनिंग प्रोडक्टस् इं.लि., मुंबई यांचेकडून प्रती नग रु.३५७.०६३० या दराने खरेदी केल्यास रु.१,७८,५३१.५० इतका खर्च येणार आहे. म्हणजेच सदरचे खरेदीकामी रु. २८,५३१/- (१७८५३१- १५०००० = २८,५३१/-) इतका जादा खर्च येईल.

तरी उपरोक्त Inj.Gastrovideo १०० ml चा मे. स्पंदन बायोटेक, औरंगाबाद यांचा पुरवठा आदेश रद्द करुन तो मे. इमॅजनिंग प्रोडक्टस् इं.लि., मुंबई यांना देण्यास व याकामी येणाऱ्या रु.२८,५३१/- चे जादा खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, Inj.Gastrovideo १०० ml चा मे. स्पंदन बायोटेक, औरंगाबाद यांचा पुरवठा आदेश रद्द करुन तो मे. इमॅजनिंग प्रोडक्टस् इं.लि., मुंबई यांना देण्यास व याकामी येणाऱ्या रु.२८,५३१/- चे जादा खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३६ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ओ.पी.डी फाईल छपाई करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयात सध्याचे प्रचलीत पध्दतीनुसार रुग्णांचे ओ.पी.डी. केसपेपर ओपीडी उपचार झाल्यानंतर रुग्णालयात जमा होत असतात. मा. व्यवस्थापन समिती दि. ०४.०७.२०१० चे निर्णय क्रमांक ५५९ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील केसपेपरची रक्कम १ रु. ऐवजी १० रु. दि. १५.०८.२०१० पासुन करण्यात आलेली आहे. सध्या रुग्णांचे केसपेपर रुग्णालयात जमा न करता ते श्री साईबाबा रुग्णालयाप्रमाणे ओपीडी मध्ये उपचार झाल्यानंतर देण्याचा प्रस्ताव आहे. जेणे करुन रुग्णालयात पेपर सांभाळण्याची गरज पडणर नाही व वेळेवर डॉक्टरांना मागील सर्व रेकॉर्ड मिळू शकेल. तेव्हा श्री साईबाबा रुग्णालयाप्रमाणेच श्री साईनाथ रुग्णालयाकरिता रुग्णा सोबत केसपेपर व्यवस्थीत राहणेसाठी सोबतच्या नमुन्याप्रमाणे फाईल छपाई करुन घ्यावयाच्या आहे. श्री साईनाथ रुग्णालयास साधारणतः एका दिवसाला अंदाजे ५०० नवीन ओपीडी असते. त्यानुसार दररोज ५०० फाईल्स लागतील व एक वर्षा करिता १,५०,००० नग ओ.पी.डी. फाईल्स छपाई कराव्या लागतील.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | फाईल्सचा प्रकार | रंग | साईज | शिल्लक साठा | छपाई नग |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ओ.पी.डी. फाईल | हिरवा | ११ १/२" x २० " साईज असलेल्या (कार्डशीट ९.२ वजन) चार रिबीट व लेससह | Nill | १,५०,००० नग |

उपरोक्तप्रमाणे एक फाईल छपाई करणेकामी रु. ३ /- खर्च अपेक्षीत आहे. एकूण १,५०,००० फाईल्स करिता अंदाजे रु. ४,५०,००० /- (अक्षरी रु. चार लाख पंन्नास हजार ) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. सदर छपाई ही विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे १,५०,००० फाईल्स छपाई करुन घेण्यास व तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये ४,५०,००० /- (अक्षरी रु. चार लाख पंन्नास हजार ) चे खर्चास व विहीत पध्दतीने छपाई करुन घेणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.८८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यक असणाऱ्या १,५०,००० नग ओ.पी.डी फाईल विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून छपाई करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षक)

---

**विषय नं.३७ श्री अनिल गणपत पंधरकर, रा.पिंपळगांव पिसा यांचे वैद्यकीय अर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.अनिल गणपत पंधरकर, रा.पिंपळगांव पिसा यांनी त्यांचे वैद्यकिय उपचारासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत संस्थानकडे अर्ज केलेला असून सदरचा अर्ज दि.२१.०८.२०१० रोजी इकडील कार्यालयास मिळालेला आहे.

श्री.पंधरकर हे किडणीचे विकाराने आजारी असून त्यांचेवर आनंद ऋषीजी हॉस्पिटल, अहमदनगर या रुग्णालयात डायलेसीस चालू आहेत. त्याकरीता दरमहा रु.१५,०००/- ते रु.२०,०००/- खर्च अपेक्षित असल्याचे प्रमाणपत्र संबंधीत रुग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार श्री.पंधरपर यांचे आजाराकरीता अनुदान देण्यात येत नाही. तसे त्यांना इकडील पत्रान्वये दिलगीरी पुर्वक कळविण्यात आलेले आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांनी श्री.पंधरकर यांना एक विशेष बाब म्हणून अनुदान मंजूर करणेकामी सदरचा अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवावा असे दि.१५.१०.२०१० रोजी दुरध्वनीद्वारे कळविलेले आहे.

**निर्णय क्र.८८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री अनिल गणपत पंधरकर, रा.पिंपळगांव पिसा यांनी त्यांचे वैद्यकिय उपचारासाठी आर्थिक मदत मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षक)

---

**विषय नं.३८ श्री साईनाथ रुग्णालयातील ऑप्थल्मीक ऑपरेशन थिएटर विभागासाठी Alcon कंपनीच्या Phacco cassette खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर विभागाने दि. १४/०९/२०१० रोजीचे डी. पी. क्र. ४८०२ अन्वये Alcon कंपनीच्या Phacco Cassette १०० नगांची मागणी केलेली आहे. सदरचे कॅसेट Phacco Emulsification या मशिनसाठी आवश्यक असतात. सदरचे मशिन सन २००६ साली Alcon या कंपनीकडून रु.२३,००,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले आहे.

सन २००७-०८ या वर्षातील वार्षिक औषधे खरेदीमध्ये उपरोक्त कॅसेट खरेदीकामी मे. ओमनी लेन्स प्रा. लि., अहमदाबाद यांचेकडून इकडील पुरवठा आदेश क्र. १६०७८ दि. ०९/१०/२००७ अन्वये प्रती नग रु. २८१२.५० या दराने १०० नगांचा पुरवठा आदेश देण्यात आला होता. परंतु सदर मशिनकरीता Alcon व्यतिरीक्त दुसऱ्या कंपनीच्या कॅसेट वापरल्यानंतर मशिन नादुरुस्त होईल असे कंपनीचे सर्व्हीस इंजिनीअर यांनी दि. ०८/१२/२००९ रोजीचे रिपोर्टन्वये कळविलेले आहे, त्यामुळे Alcon कंपनीच्याच कॅसेट खरेदी करावे लागणार आहे.

त्यामुळे सदरचे कॅसेट खरेदीकामी दि. २०/०९/२०१० रोजी दुरध्वनीवरुन M/s. Alcon Laboratories (India) Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून ई-मेल व्दारे कोटेशन मागविले असून त्यांनी प्रती नग रु. १९००/- (सर्व करासह) इतके दर कळविलेले आहे.

सध्या ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर विभागास ४८ नग खरेदी करुन देता येईल, M/s. Alcon Laboratories (India) Pvt. Ltd., Mumbai यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. ९१,२००/- इतका खर्च येईल.

तरी M/s. Alcon Laboratories (India) Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून ४८ नग Phacco Cassette प्रती नग रु. १९००/- याप्रमाणे खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. ९१,२००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, M/s. Alcon Laboratories (India) Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून ४८ नग Phacco Cassette प्रती नग रु. १९००/- याप्रमाणे खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. ९१,२००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३९ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Shadowless Lamp 7+4 Dome खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर विभागाने दि.२५/०९/२०१० रोजीचे मागणी पत्रकान्वये तीन नग Shadowless Lamp ७+४ Dome मागणी केलेली आहे. कारण सध्या असलेले लॅम्प हे सन १९९८ साली रु.७,५०,०००/- इतक्या रक्कमेत तीन नग खरेदी केलेले असून त्याचे सर्व आटे (Thread) हे वापरुन खराब झालेले आहे त्यामुळे सदरचा लॅम्प शस्त्रक्रिया करतांनी किंवा इतर वेळेस कधीही गळून पडू शकतो त्यामुळे ते तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. वैद्यकिय संचालक यांनी बायोमेडीकल इंजिनिअर यांचेशी चर्चा करुन सध्या तातडीने दोन नग लॅम्प घेणेबाबत सुचविलेले आहे. सदर लॅम्प खरेदीकामी एका नगासाठी अंदाजे रु. २०००००/- याप्रमाणे दोन नग लॅम्प खरेदीकामी एकूण रक्कम रु. ४०००००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सध्या श्री साईनाथ रुग्णलयातील नविन ई.एन.टी. व ऑप्थलमिक ऑपरेशन थिएटर व पेडीयाट्रीक आय.सी.सी.यु. करीता मशिनरी/उपकरणे/ फर्निचर /इन्स्ट्रुमेंट /किरकोळ साहित्य खरेदीची

कार्यवाही सद्य परिस्थितीत चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेणे आहे. त्यामध्ये १ नग Shadowless Lamp ७+४ Dome खरेदी करण्याचे प्रस्तावीत आहे. Shadowless Lamp ७+४ Dome तातडीने खरेदी करावयाचे असल्यामुळे व वेळेचा विलंब टाळण्याच्या दृष्टीने सदर खरेदीमध्येच उपरोक्त दोन नग वाढवून चर्चा / वाटाघाटी करुन खरेदी करता येईल असे मत आहे.

तरी उपरोक्त दोन नग Shadowless Lamp 7+4 Dome ची संख्या वाढवून घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,००,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४० श्री भाऊसाहेब कारभारी सुरसे-वर्ग-४ कर्मचारी यांना वैद्यकीय उपचाराकरीता आगाऊ रक्कम मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री. भाऊसाहेब कारभारी सुरसे (वर्ग-४- श्री साईनाथ हॉस्पिटल) यांना स्वतःला अन्न नलिकेचा कर्करोग झालेला असून पुढील उपचारासाठी टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई येथे पाठविले होते. तेथील डॉक्टरांनी तपासणी करुन त्यांना प्रवरा हॉस्पिटल, लोणी येथे रेडीओथेरपी घेण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे श्री सुरसे यांनी प्रवरा हॉस्पिटल, लोणी येथे गेले तेथे विविध प्रकारच्या तपासण्या करुन डॉक्टरांनी रेडीओथेरपी घेण्यास सांगितले. सदर उपचारासाठी प्रवरा हॉस्पिटल, लोणी यांनी एका रेडीओथेरपीसाठी रु.१५,०००/- इतका खर्च कळविला आहे.

श्री.भाऊसाहेब कारभारी सुरसे हे वर्ग ४ चे कर्मचारी असून त्यांची आर्थीक परिस्थिती ही अत्यंत हालाखीची असून इतका खर्च करण्याची त्यांची ऐपत नाही, असे त्यांनी त्यांचे दि.०५/१०/२०१० चे विनंती अर्जात म्हटले आहे. प्रवरा हॉस्पिटल, लोणी हे संस्थानचे मान्य यादीत असून वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ क्र.१४ अन्वये सदर आजार/ उपचारासाठी रु.७५,०००/- (अक्षरी पंच्याहत्तर हजार मात्र) आगाऊ रक्कम देण्याची तरतुद आहे. त्यानूसार श्री सुरसे यांना रेडीओथेरपीसाठी रु.१५,०००/- इतकी रोख देण्याऐवजी प्रवरा हॉस्पिटल, लोणी यांचे नावाने डि.डि. द्वारे आगाऊ देता येईल.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१०/१०/२०१० चे सभेत संस्थान कर्मचाऱ्यांना वैद्यकिय उपचारासाठी आगाऊ रक्कम ही मा. व्यवस्थापन समिती सभेच्या पूर्व परवानगीनेच देण्यात यावी असे ठरले आहे. त्यानुसार श्री. भाऊसाहेब कारभारी सुरसे यांना आगाऊ रक्कम देण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

**निर्णय क्र.८८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री भाऊसाहेब कारभारी सुरसे-वर्ग-४ कर्मचारी यांना वैद्यकीय उपचाराकरीता आगाऊ रक्कम देणेबाबत शासन नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४१ श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागासाठी Blood Collection Monitor & Shaker मशिन खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाने दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी दि.२८/०९/२०१० रोजीचे मागणी पत्रकान्वये एक नग Blood Collection Monitor & Shaker मशिनची मागणी केलेली आहे.

सदरचे मशिन कार्डीयाक शस्त्रक्रिया करताना रुग्णाचे Blood Transfusion करण्यासाठी आवश्यक असते. उपरोक्त मशिन खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी मे. एन.पी. एजन्सी, मुंबई यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी त्यांचे फॅक्स पत्र क्र.PSS/NPA/२१/०७२/१०-११ दि.०६/१०/२०१० अन्वये प्रती नग रु.१,३७,२५०/- इतके दर कळविले आहे. त्यांचे दरपत्रकानुसार एका नगासाठी अंदाजे रक्कम रु. १,३७,२५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता ०१ नग Blood Collection Monitor & Shaker हे मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. १,३७,२५०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता ०१ नग Blood Collection Monitor & Shaker हे मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. १,३७,२५०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४२ श्री साईनाथ रुग्णालयातील ई.एन.टी. ऑपरेशन थिएटर विभागासाठी ऑपरेटींग मायक्रोस्कोप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाचे ई.एन.टी. शल्य चिकित्सक डॉ.आर.के. कुलकर्णी यांनी त्यांना दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी लागणाऱ्या एक नग ऑपरेटींग मायक्रोस्कोपची दि.२४/०३/२०१० चे मागणी पत्रान्वये खरेदी विभागाकडे प्राप्त दि.०६/०९/२०१० चे पत्रान्वये मागणी केलेली आहे. कारण सध्याचा ऑपरेटींग मायक्रोस्कोप हा तेरा वर्षापूर्वी खरेदी केलेला असल्यामुळे त्याची इमेज (Illumination) हि फार खराब येते. तेंव्हा अजून एक नविन ऑपरेटींग मायक्रोस्कोप खरेदी करुन तो शस्त्रक्रियेसाठी वापरता येईल तर जुना (सध्याचा) ऑपरेटींग मायक्रोस्कोप हा त्यांना ओ.पी.डी. मध्ये किरकोळ (Minor) तपासण्या / शस्त्रक्रिया करणेसाठी वापरता येईल असे त्यांचे म्हणणे आहे.

सध्या त्यांच्याकडे Carl Zeiss या कंपनीचा ऑपरेटींग मायक्रोस्कोप असून तो चांगल्या प्रकारचा आहे. तसेच Carl Zeiss यांची विक्री नंतरची सेवा देखील चांगली आहे त्यामुळे याकामी कंपनीकडून तांत्रिक बाबी व अंदाजे किंमतीसाठी दरपत्रक व कलर ब्रॉशर इत्यादी मागविण्यात आले होते. त्यांनी दिलेल्या विविध प्रकारचे मॉडेल पैकी डॉ. कुलकर्णी यांनी कंपनीचे प्रतिनीधी सोबत सविस्तर तांत्रिक माहिती जाणून घेऊन मॉडेल OPMI Sensera /S७ हा ऑपरेटींग मायक्रोस्कोप घेण्याची शिफारस केलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

| Sr. No. | Description | Qty | Rate Per in Euro | Total Amt. in Euro |
|---|---|---|---|---|
| **1** | **Zeiss OPMI Sensera Surgical Operating Microscope For ENT Surgery** | **1** | **37200** | **37200** |
| | Consisting of : | | | |
| | OPMI Sensera | 1 | | |
| | Dust cover for OPMI blue | 1 | | |
| | S-light guide, 2.0 m | 1 | | |
| | S7 floor stand, basic equipment | 1 | | |
| | Standard set of panels — floor stand | 1 | | |
| | Xenon illumination Superlux 180 for S7 stands | 1 | | |
| | Tiltable binocular tube f=l70mm, 180 degrees | 1 | | |
| | Widefield push-in eyepiece 12.5x | 2 | | |
| | Sensera | 1 | | |
| | Cover for OPMI without video | 1 | | |
| | Electrical components kit for S7 for OPMI Sensera | 1 | | |
| | Pack of 6 asepsis cap 27mm | 2 | | |
| | Pack of 6 asepsis cap 22mm | 2 | | |
| | Pack of 6 asespsis caps. for PD adjustment for 180 degree tiltable tube | 1 | | |
| | Transport package S7 floor fragmented | 1 | | |
| | **OPTIONAL ACCESSORIES** | | | |
| | Beam Splitter | | 1960 | 1960 |
| | Video objective lens f=105mm, c-mount | | 1770 | 1770 |
| | **CO-OBSERVATION EQUIPMENT** | | **6700** | **6700** |
| | consisting of: | | | |
| | Stereo co-observation tube with two joints | | | |
| | Straight binocular tube f=170 mm | | | |
| | Widefield push-in eyepiece 12.5x | | | |
| | Sleeves for tube with crew thread | | | |
| | **Total Amt. in Euro** | | | **47630** |
| | **1 Euro=App. 64.00Rs.** | | | **3048320.00** |
| | **Customs Duty (App.) 10%=** | | | **304832.00** |
| | **Clearing Charges & Transportation to Hospital Site 1.25% =** | | | **38104.00** |
| | **Total Landed App. Cost in Rs.=** | | | **3391256.00** |

उपरोक्त मायक्रोस्कोप खरेदीकामी अंदाजे रु.३३,९१,२५६/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदर मायक्रोस्कोप खरेदीकामी विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यास तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३३,९१,२५६/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईनाथ रुग्णालयातील ई.एन.टी. ऑपरेशन थिएटर विभागासाठी आवश्यक असणारा ऑपरेटींग मायक्रोस्कोप मा.विश्वस्त श्री शैलेश श्रीहरी कूटे यांनी सूचीत केलेला** Carl Zesis **कंपनीचा डॉ.आर.के.कुलकर्णी यांना दाखवून अद्यावत मॉडेल असलेला विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३३,९१,२५६/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सध्या वापरात असलेल्या ऑपरेटींग मायक्रोस्कोपच्या लेन्सेस बदलण्यात याव्यात याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४३** **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी एस ऑपरेशन थिएटर विभागासाठी Flexible Fibreoptic Bronchoscope खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ऑपरेशन थिएटर विभागाने दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी लागणारे Flexible Fibreoptic Bronchoscope ह्या नविन इन्स्ट्रुमेंटची दि.२८/०९/२०१० चे पत्रान्वये ०१ नगाची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे अशा प्रकारचा ब्रोन्कोस्कोप सध्या उपलब्ध नाही. सदर ब्रोन्कोस्कोपचा उपयोग हा वेगवेगळ्या प्रकारच्या गंभीर रुग्णांसाठी घशात टाकावयाच्या एंडोट्रॅकीयल ट्युबसाठी अत्यंत उपयोगी असतो.

सदरचे Flexible Fibreoptic Bronchoscope खरेदीकामी अंदाजे दरांसाठी मे.कार्ल स्टोअर्ज एन्डोस्कोपी इंडिया प्रा. लि., दिल्ली यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरानुसार सदर Flexible Fibreoptic Bronchoscope खरेदीकामी अंदाजे रु.५,३६,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी Flexible Fibreoptic Bronchoscope विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,३६,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी एस ऑपरेशन थिएटर विभागासाठी Flexible Fibreoptic Bronchoscope विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,३६,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४४** **ऑपरेटींग मायक्रोस्कोपचे दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभागात कान, नाक, घसा शस्त्रक्रीया विभागाकरीता मे. कार्ल झैस, जर्मनी या कंपनीचा एक ऑपरेटींग मायक्रोस्कोप खरेदी करणेत आला असुन नियमीत वापरात आहे. सदर मायक्रोस्कोपची दुरूस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतू दुरूस्ती करीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट तसेच कॅलीब्रेशन सर्व्हिसींगची आवश्यकता असल्यास सदर बाबींची पुर्तता संबधीत पुरवठा धारक कंपनीकडुन करुन घेतली जाते.

सध्या मशिन नादुरुस्त झाल्यामुळे व दुरुस्तीकरीता स्पेअर पार्टची आवश्यकता असल्यामुळे मे. कार्ल झैस इंडीया प्रा. लि. मुंबई यांचे इंजिनीअर कडुन मायक्रोस्कोपची तपासणी करुन घेणेत आली. त्यानुसार कंपनीचे इंजिनीअरने त्यांचे सर्व्हिस रिपोर्ट क्र.३९२१ दि. १६/१०/२०१० अन्वये मायक्रोस्कोपचा S - Light Guide हा पार्ट खराब झाल्याचे व बदलणेची आवश्यकता असल्याचे सांगीतले आहे. सदरकामी कंपनीने सर्व करांसहीत एकुण रू. ६६,०६८/- (अक्षरी रु. सहासष्ठ हजार आडुसष्ठ मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन सदर रकमेची कंपनीने आगाउ मागणी केली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीशी झालेल्या चर्चेअंती सदर रक्कम उपरोक्त पार्ट बदललेनंतर अदा होणेस कंपनीने स्वीकृती दर्शविली आहे. सदर ऑपरेटींग मायक्रोस्कोपचे स्पेअर पार्ट फक्त मे. कार्ल झैस इंडीया प्रा. लि. मुंबई यांचेकडेच मिळतात.

तरी मे. कार्ल झैस इंडीया प्रा. लि. मुंबई यांचेकडुन ऑपरेटींग मायक्रोस्कोपचा S - Light Guide हा पार्ट बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या रु. ६६,०६८/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.८९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. कार्ल झैस इंडीया प्रा. लि. मुंबई यांचेकडुन ऑपरेटींग मायक्रोस्कोपचा S - Light Guide हा पार्ट बदलुन घेणेस व त्यासाठी येणाऱ्या रु. ६६,०६८/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४५** **ऑटोप्रोसेसर मशिनचे यु.पी.एस.च्या बॅटरीज बदलणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागातील एक्स-रे ऑटोप्रोसेसर मशिनकरीता मे. तेजस इलेक्ट्रॉनीक्स, अहमदनगर यांचेकडुन ५ के. व्ही. ए. क्षमतेचा ०१ नग यु. पी. एस. सन २००९ साली खरेदी करुन कार्यान्वीत करणेत आला आहे. सदर यु. पी. एस. करीता दिलेला एक वर्षांचा वॉरंटी कालावधी दि. ३१/०३/२०१० रोजी संपला आहे. सध्या यु. पी. एस. ची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात असुन दुरुस्तीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट संबंधीत पुरवठाधारक कंपनीकडुन खरेदी केले जातात.

सध्या उपरोक्त यु. पी. एस. नादुरुस्त झाला असुन मे. तेजस इलेक्ट्रॉनीक्स, अहमदनगर यांचे इंजिनीअरने यु. पी. एस. ची तपासणी करुन यु. पी. एस. मशिनच्या सर्व १६ नग बॅटरीज खराब झाल्याचे व बदलणेची आवश्यकता असल्याचे सांगीतले आहे. श्री साईनाथ रुग्णालयाचे अंतर्गत रचनेत बदल झ ााल्यामुळे जागा नसल्याने सदरचा यु. पी. एस. ऑटोप्रोसेसर रुमचे बाहेर ठेवणेत आला आहे. त्यामुळे

सध्याच्या वातावरणात यु. पी. एस. करीता सध्याच्या १२ व्होल्ट/७ ए. एच क्षमतेच्या एस. एम. एफ. बॅटरीजऐवजी १२ व्होल्ट/२० ए. एच. क्षमतेच्या टयुबलर बॅटरीज वापरणे अधीक योग्य राहील असे कळविले आहे. सदरकामी त्यांचे दि.२६/१०/२०१० चे पत्रान्वये सर्व करांसहीत एकुण रु.५५,२००/- इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले असुन जुन्या १६ नग बॅटरीजकरीता एकुण रु. ४८०/- इतकी अल्प किंमत देउ केली आहे. त्यामुळे १२ व्होल्ट/२० ए. एच. क्षमतेच्या टयुबलर बॅटरीज अशा प्रकारच्या बॅटरीजचा पुरवठा करु शकणाऱ्या विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने खरेदी करता येतील व जुन्या बॅटरीजची संस्थानचे रेकॉर्ड विभागाकडुन उच्चतम दराने विक्री करता येतील असे नम्र मत आहे.

तरी एक्स-रे ऑटोप्रोसेसर मशिनचे यु. पी. एस. करीता १२ व्होल्ट / २० ए. एच. क्षमतेच्या १६ नग टयुबलर बॅटरीज खरेदीकामी विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने बॅटरीज खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. ५५,२००/- चे खर्चास तसेच जुन्या बॅटरीजची संस्थानचे रेकॉर्ड विभागामार्फत उच्चतम दराने विक्री करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.८९३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे एक्स-रे ऑटोप्रोसेसर मशिनचे यु. पी. एस. करीता १२ व्होल्ट / २० ए. एच. क्षमतेच्या १६ नग टयुबलर बॅटरीज खरेदीकामी विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने बॅटरीज खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. ५५,२००/- चे खर्चास तसेच जुन्या बॅटरीजची संस्थानचे रेकॉर्ड विभागामार्फत उच्चतम दराने विक्री करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४६ कॅथलॅब मशिनचे यु.पी.एस.च्या बॅटरीज बदलणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता मा. व्य. समितीचे दि. १८/०७/२००५ सभेतील निर्णयान्वये मे. सिमेन्स लि. मुंबई यांचेकडुन ०१ नग कॅथलॅब सिस्टीम (Model - Axiom Artis dFC) एकुण रु. २,९५,००,०००/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. कॅथलॅब सिस्टीमसोबत कंपनीने मशिनचे संगणकीय प्रणालीकरीता मे. कन्सुल कन्सॉलीडेटेड प्रा. लि. मुंबई या कंपनीचा ०१ नग १० के. व्ही. ए. क्षमतेचा यु. पी. एस मोफत दिलेला आहे. सदर यु. पी. एस. दि. १८/०२/२००६ रोजी कार्यान्वीत करणेत आला असुन यु. पी. एस. करीता कंपनीने दिलेला ०१ वर्षांचा वॉरंटी दि. १७/०२/२००७ रोजी संपला आहे. सदर यु. पी. एस. ची दुरुस्ती व देखभाल मे. सिमेन्स लि. मुंबई यांचेमार्फत मे. कन्सुल कन्सॉलीडेटेड प्रा. लि. मुंबई यांचेकडुन केली जात आहे. परंतु दुरुस्तीकरीता आवश्यक असणारे कंझ्युमेबल स्पेअर पार्ट (उद. बॅटरी) संस्थानला स्वखर्चाने बदलावयाचे आहेत.

सध्या उपरोक्त यु. पी. एस. नादुरुस्त झाला असुन मे. कन्सुल कन्सॉलीडेटेड प्रा. लि. मुंबई यांचे इंजिनीअरने यु. पी. एस. ची तपासणी करुन यु. पी. एस. मशिनच्या सर्व १० नग बॅटरीज खराब झाल्याचे व बदलणेची आवश्यकता असल्याचे सांगीतले आहे. तसेच १० नग जुन्या बॅटरीजकरीता मे. कन्सुल कन्सॉलीडेटेड प्रा. लि. मुंबई यांनी एकुण रु.१,५००/- इतकी अल्प किंमत देउ केली असुन जुन्या बॅटरीज कंपनीस परत देउन (Buy Back) नवीन १० नग बॅटरीज खरेदी करणेकामी सर्व करांसहीत एकुण रु. २९,१९५/- (अक्षरी रु. एकोणतीस हजार एकशे पंच्यान्नव मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर १२ व्होल्ट / २६ ए. एच. क्षमतेच्या बॅटरीज, अशा प्रकारच्या बॅटरीजचा पुरवठा करु शकणाऱ्या विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने खरेदी करता येतील व जुन्या बॅटरीज संस्थानचे रेकॉर्ड विभागाकडुन उच्चतम दराने विक्री करता येतील असे मत आहे.

तरी कन्सुल यु. पी. एस. करीता १२ व्होल्ट / २६ ए. एच. क्षमतेच्या १० नग बॅटरीज खरेदीकामी विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने बॅटरीज खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. २९,१९५/- चे खर्चास तसेच जुन्या बॅटरीजची संस्थानचे रेकॉर्ड विभागामार्फत उच्चतम दराने विक्री करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.८९४ यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅथलॅब मशिनचे यु.पी.एस. करीता १२ व्होल्ट / २६ ए. एच. क्षमतेच्या १० नग बॅटरीज खरेदीकामी विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. २९,१९५/- चे खर्चास तसेच जुन्या बॅटरीजची संस्थानचे रेकॉर्ड विभागामार्फत उच्चतम दराने विक्री करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच यापुढे सगळया विभागांची मागणी घेऊन वार्षिक टेंडर काढणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४७ माहे जुलै-२०१० मध्ये तातडीने केलेल्या औषधांचे खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व कार्डीयाक रिकव्हरी वॉर्ड नं. १ मध्ये VEIN-O-LINE १०CM ची तातडीने आवश्यक होती, कारण सन २००९-१० या वर्षातील वार्षिक औषधे खरेदीकामी महाराष्ट्र शासनाने दि.०१ एप्रिल २०१० पासून १% व्हॅट टॅक्स वाढविल्यामुळे तसेच

दि. ०५/०५/२०१० अखेर पुरवठा आदेशाची मुदत संपलेली होती. त्यामुळे काही पुरवठा धारक मागील वर्षातील दराने पुरवठा करत नव्हते, तसेच सन २०१०-११ या वर्षातील वार्षिक औषधे खरेदीची प्रक्रीया देखील चालु होती, त्यामुळे VEIN-O-LINE १०CM तातडीने मे.चेतना एन्टरप्राईजेस, अहमदनगर यांचेकडून बील नं. ५८४ दि.०२/०७/२०१० अन्वये रु. २३११/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेले होते.

सदरची खरेदी ही माहे - जुलैमध्ये केलेली आहे. मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०३/०६/२००६ निर्णय क्र. ३४८ नुसार वैद्यकिय संचालक यांना दरमहा रु. १,००,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत, तसेच मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१०/२००८ निर्णय क्र. ७५९(२८-८) अन्वये वैद्यकिय संचालक यांनी त्यांचे अधिकारात तातडीची खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे. सदरची खरेदी ही रु.१,००,०००/- चे तरतुदीव्यतिरीक्त केलेली आहे. माहे जुलै - २०१० मध्ये वैद्यकिय संचालक यांना असलेल्या रु.१,००,०००/- चे अधिकारा व्यतिरिक्त रु.५८,००६/- इतक्या रक्कमेची औषधे खरेदी करण्यात आलेली असून त्याची बीले अदा करण्यात आलेली आहे. सदर बील अनावधानाने बाजूला राहील्यामुळे सदर बीलाची मंजुरी घेण्यास विलंब झालेला आहे.

तरी वरीलप्रमाणे मे.चेतना एन्टरप्राईजेस, अहमदनगर यांचेकडून VEIN-O-LINE १०CM तातडीने खरेदीस व याकामी आलेल्या पुर्णांकित रक्कम रु.२३११/- चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.८९५ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.चेतना एन्टरप्राईजेस, अहमदनगर यांचेकडून VEIN-O-LINE 10CM तातडीने खरेदीस व याकामी आलेल्या पुर्णांकित रक्कम रु.२३११/- चे तातडीने केलेल्या खरेदी व खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४८ श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागासाठी Turp Loop खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने युरोलॉजीच्या Turp हया शस्त्रक्रिया करणेसाठी लागणाऱ्या Turp Loop - ४२ नगांची दि.१२/०८/२०१० रोजीचे मागणी पत्रकान्वये मागणी केलेली आहे. सदर लुप खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी मे. कार्ल स्टोअर्ज लि., नवी दिल्ली यांचेकडून इकडील पत्र क्र. २८६८ दि. ३१/०८/२०१० अन्वये दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी दि.२५/१०/२०१० रोजीचे ई-मेल अन्वये प्रती नग दर कळविले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Description | Make | Qty. | Rate Per in Rs. | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | TURP Loops (24F) / Double Stem / Cutting Cat.No. 27040 G | Karl Storz | 36 | 2719.50 | 97902.00 |
| 2. | Ball Point Loop Cat. No. 27040N | | 02 | 2719.50 | 5439.00 |
| 3. | Rollar Loop Big Cat.No. 27040NW24PH | | 02 | 2719.50 | 5439.00 |
| 4. | Rollar Loop Small Cat. No. 27040 NX24PH | | 02 | 2719.50 | 5439.00 |
| | | | | **Total in Rs.** | **114219.00** |

मे. कार्ल स्टोअर्ज लि., नवी दिल्ली यांचे दरपत्रकानुसार सदरचे खरेदीकामी रु. १,१४,२१९/- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागात युरोलॉजीच्या शस्त्रक्रिया करणेसाठी लागणारे Turp Loop विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. १,१४,२१९/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८९६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागात युरोलॉजीच्या शस्त्रक्रिया करणेसाठी लागणारे Turp Loop विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. १,१४,२१९/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४९ श्री साईनाथ रक्तपेढीकरीता Apheresiss मशिन व Fully Automatic Elisa System मशिन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.८९७ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. ५० श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर करीता वॉशिंग मशिन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.८९८ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५१ गुंतवणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** माहे नोव्हेंबर, २०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ०८/११/२०१० | ७,९२,२८,९४०.०० |
| २) | युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १०/११/२०१० | ७,५२,५१,५९५.९६ |
| ३ ) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १७/११/२०१० | ३,३९,५५,२६०.०० |
| ४) | युनायटेड बँक ऑफ इंडीया,शिर्डी | २३/११/२०१० | ५,३२,१३,६२८.५८ |
| ५) | युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी | २४/११/२०१० | ४,०८,५०,८६६.३८ |
| ६) | युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी | ३०/११/२०१० | २,६८,७५,५६९.९८ |
| ७) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे नोव्हेंबर २०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ५,००,००,०००.०० |
| | | **एकूण रक्कम -** | ३५,९३,७५,८६०.९० |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. ३५.९३ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल, असे नम्र मत आहे :-

१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
३) आंध्र बँक, शिर्डी
४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
६) बँक ऑफ बरोडा, नासिक
७) बॅक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
८) विजया बँक, शिर्डी
९) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
११) कॅनरा बँक, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते ११ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.३५.९३ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.८९९ यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं. ०१ ते ११ या बँकांकडून जसजशी गुंतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते ११ बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम दैनंदिन खर्च वजा जाता टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.५२ आयकर कायदा १९६१ कलम ३५AC च्या अंतर्गत देणगीवर १००% सूट असलेल्या प्रकल्पाचे नुतनीकरण व त्याचे मानधन आदा करण्याच्या प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला आयकर कायदा १९६१ कलम ३५AC च्या अंतर्गत देणगी प्राप्त होण्यासाठी संस्थानने केद्र सरकारकडे प्रस्ताव सादर केला होता. प्रस्ताव सादर करणेपासून ते त्यासंबधीत पुढील संपूर्ण कामकाज पहाणेसाठी मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ५ नोव्हेंबर २००५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय क्र. ७२५ नुसार घ्शास्त्री पुरोहीत ॲण्ड असोसीएट, पुणेङ यांची रुपये १,५०,०००/- मानधनावर नेमणूक करण्यात आली होती. केद्र सरकारने सदर प्रकल्पाअंतर्गत रुपये ७५ कोटी देणगी आर्थिक वर्ष २००५-०६, २००६-०७ आणि २००७-०८ या तीन वर्षासाठी नोटीफिकेशन SO/१३५(E) दिनांक ३ फेब्रुवारी, २००६ नुसार मंजूरी देण्यात आली. याकामी घ्शास्त्री पुरोहीत ॲण्ड असोसीएट, पुणेङ यांना या कामकाजाचे संपूर्ण मानधन रुपये १,५०,०००/- अदा करण्यात आले.

मुदत संपल्यानंतर सदर प्रकल्पास सन २००८-०९ पासून पुढे ३ आर्थिक वर्षासाठी नुतनीकरण करणेस मा. व्यवस्थापन समितीच्या ३ जानेवारी २००९ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र. १७ प्रमाणे मान्यता देवून अभय शास्त्री अॅन्ड असोसिएटेड, पुणे यांना रुपये २,००,०००/- मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात आली. सदर प्रस्ताव केद्र सरकारने नोटीफिकेशन SO/१४७३(E) दिनांक १७ जून, २००८ प्रमाणे पुढील तीन आर्थिक वर्ष म्हणजेच सन २००८-२००९, २००९-१० व २०१०-११ साठी मान्यता दिली आहे. आक्टोबर २०१० पर्यत या प्रकल्पाअंतर्गत रुपये ३.६२ कोटी देणगी जमा झाली आहे.

प्रकल्पाची मुदत ३१ मार्च २०११ रोजी संपत असल्याने सदर प्रकल्पाचा कालावधी यापुढील तीन वर्षासाठी वाढविणे आवश्यक आहे. हा कालावधी वाढविण्यासाठी ঘअभय ए. शास्त्री अॅण्ड असोशिएटस्, पुणेঙ यांनी केद्र सरकारकडे मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करण्यास उपरोक्त संदर्भाचे दिनांक १० नोव्हेंबर २०१० चे पत्र संस्थानला दिले आहे. या पत्राप्रमाणे त्यांनी सदर प्रस्ताव नुतनीकरणासाठी केद्र शासनाला सादर करणे तत्संबंधीत कामे करणे पुढील तीन वर्षाचे ऑडीट करणे इ. कामांसाठी एकूण रुपये ३,५०,०००/- ची मागणी पुढीलप्रमाणे केली आहे :

(१) प्रस्ताव नुतनीकरणाचे काम स्विकारतांना : रुपये ५०,०००/-
(२) रिपोर्ट तयार करुन केद्र शासनाला सादर केल्यावर : रुपये ५०,०००/-
(३) प्रकल्पास मंजुरी मिळाल्यानंतर : रुपये २,५०,०००/-

उपरोक्त विवेचनाप्रमाणे अभय ए. शास्त्री अॅण्ड असोशिएटस्, पुणे यांना ३५AC अंतर्गत देणगी प्रकल्पाची मुदतवाढ घेणेसाठी व इतर संबंधीत अनुषंगीक कामकाजासाठी त्यांनी मागणी केलेल्या मानधन रुपये ३,५०,०००/- च्या ऐवजी त्यांना रुपये २,५०,०००/- मानधन पुढीलप्रमाणे अदा करावे असे मत आहे :

(१) प्रस्ताव नुतनीकरणाचे काम स्विकारतांना : रुपये ५०,०००/-
(२) रिपोर्ट तयार करुन केद्र शासनाला सादर केल्यावर : रुपये ५०,०००/-
(३) प्रकल्पास मंजुरी मिळाल्यानंतर त्याचे वार्षिक विवरण केंद्र सरकारला सादर केल्यानंतर प्रत्येक वर्षी रुपये ५०,०००/- प्रमाणे : रुपये १५०,०००/-

वरीलप्रमाणे ३५AC च्या अंतर्गत स्विकारण्यात येणाऱ्या देणगी प्रकल्पास पुढील तीन आर्थिक वर्षासाठी (सन २०११-२०१२, २०१२-१३ व २०१३-१४) केद्र शासनाकडून नुतनीकरण करण्यास व त्याचे संपूर्ण कामकाज पहाण्यास अभय ए. शास्त्री अॅन्ड असोशिएटस्, पुणे यांना त्याबाबतचा आदेश व रुपये २,५०,०००/- च्या मानधनास मान्यता मिळणेसाठी सादर.

**निर्णय क्र.९००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ३५AC च्या अंतर्गत स्विकारण्यात येणाऱ्या देणगी प्रकल्पास पुढील तीन आर्थिक वर्षासाठी (सन २०११-२०१२, २०१२-१३ व २०१३-१४) केद्र शासनाकडून नुतनीकरण करण्यास व त्याचे संपूर्ण कामकाज पहाण्यास अभय ए. शास्त्री अॅन्ड असोशिएटस्, पुणे यांना त्याबाबतचा आदेश व रुपये २,५०,०००/- च्या मानधनास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.५३** **पर्यावरणपूरक (Eco Friendly) प्लॅस्टिक पिशवी खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** प्रसादालयासाठी सध्या खालीलप्रमाणे प्लॅस्टिक बॅग वापरात आहेत.

| अ.नं. | मालाचा तपशिल | परिमाण क्विंटल | दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|
| ०१. | **प्लॅस्टीक पिशवी**<br>व्हर्जीन फुड ग्रेड, १०० ोज एलडी<br>साईज : ४" x ६" | ३५ | ९,८००/-<br>+ ५% व्हॅट |
| ०२. | **प्लॅस्टीक पिशवी- लाडू प्रसाद**<br>व्हर्जीन फुड ग्रेड, २०० ोज पीपी<br>४ रंगात, छपाईसह, साईज : ५" x ६.५" | ४२० | १०,३००/-<br>+ ५% व्हॅट |
| ०३. | **प्लॅस्टीक पिशवी- नाष्टा पाकिटे**<br>व्हर्जीन फुड ग्रेड, १०० ोज एलडी<br>१ रंगात, छपाईसह, साईज : ८" x १०" | १५० | १०,२००/-<br>+ ५% व्हॅट |

सन २०१०-११ मध्ये दि.०१.०४.१० ते ३१.०३.२०११ अखेर कालावधीमध्ये वार्षिक मंजुर टेंडर दराने मागणी चलनाप्रमाणे माल पुरवठा करणेकामी मे.सरस प्लॅस्टिक अहमदनगर यांना इकडील जा.क्र.६०६७/१६.०७.२०१० अन्वये पुरवठा आदेश देणेत आलेला असून पुरवठा कालावधी अखेर मंजुर दराने माल पुरविणे व स्विकारणेबाबत उभयंतात करारनामा झालेला आहे.

मे.श्री.ऑर्थो टुल्स, नाशिक यांनी त्यांचे दि.०६.०९.१० चे पत्रान्वये कळविले आहे की, त्यांची कंपनी मे.बालसन इंडस्ट्रीज, पुणे या कंपनीची वितरक कंपनी असून बालसन कंपनीने पर्यावरणपुरक प्लॅस्टिक पिशवीचे उत्पादन सुरु केले असून सदरचे मटेरियल कॉर्न फ्लॉवर पासून तयार करणेत येते. सदर मालाची डोन्सीटी प्लॅस्टिक पिशवीपेक्षा ३०% जादा असते. निरुपयोगी प्लॅस्टिक पिशवी मातीमध्ये

पुर्णपणे नष्ट होतात. त्यामुळे प्रदुषण होत नाही. सदर पिशव्यांवर छपाई करता येते तसेच १० से.मी. पासून ३०० से.मी. पर्यंत पिशव्या तयार होतात. सध्या यासाठी कच्चा माल आयात केला जात असून कच्च्या मालाचा दर्जा युरोपियन नॉर्म्स नुसार EN३४३२ असून ASTM D-६४०० युरोपियन नॉर्म्सप्रमाणे आहे, असे त्यांचे पत्रात नमुद केले आहे. त्यांनी दिलेला दरांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | दर प्रती किलो | प्रति किलोमध्ये पिशव्यांची संख्या | दर प्रती पिशवी रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१. | ८" x १०" | ४२३/- | २५० पिशवी | १.६९ |
| ०२. | ४" x ६" | ४२३/- | ११९० पिशवी | ०.३६ |
| ०३. | ५" x ६.५" | ४३३/-<br>+ ५% व्हॅट | ६६६ पिशवी | ०.६५ |

मे.सरस प्लॅस्टिक, अहमदनगर यांचेकडील दरांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | दर प्रती किलो | प्रति किलोमध्ये पिशव्यांची संख्या | दर प्रती पिशवी रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ०१. | ८" x १०" | १०२.९० | २६० पिशवी | ०.४० |
| ०२. | ४" x ६" | १०७.१० | ९४० पिशवी | ०.११ |
| ०३. | ५" x ६.५" | १०८.१५ | ४६० पिशवी | ०.२४ |

उपरोक्त प्रमाणे मे.श्री ऑर्थो टुल्स, पुणे व मे.सरस प्लॅस्टिक, अहमदनगर यांचे दरांमध्ये तुलना करता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | तपशिल | श्री ऑर्थो टुल्स दर प्रती किलो | मे.सरस प्लॅस्टिक दर प्रती किलो | फरक दर प्रती किलो | फरक दर प्रती पिशवी |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ८" x १०" | ४२३/- | १०२.९० | ३२०.१० | १.२९ |
| ०२. | ४" x ६" | ४२३/- | १०७.१० | ३१५.९० | ०.२५ |
| ०३. | ५" x ६.५" | ४३३/-<br>+ ५% व्हॅट | १०८.१५ | ३२४.८५ | ०.४१ |

**१)** पर्यावरणाचे संरक्षणाचे दृष्टीने भविष्यात Eco-friendly Bags वापराव्यात किंवा कसे?

**२)** वापरावयाचा निर्णय झाल्यास प्रथम प्रायोगिक तत्वावरती वापरकरुन त्याचा निष्कर्ष तपासून पुढील वर्षीच्या निविदा प्रक्रियेचे वेळी निविदा मागवता येतील.

**३)** लाडू प्रसाद पाकिटाची सरासरी विक्री दररोज ४०००० व अन्नपाकिटे विक्री दररोज ५००० पॅकेट (पिशव्या ८"x१०" व ४"x६" अशा दोन साईज ) आहे. यामध्ये प्रथम दोन महिन्यासाठी २५% पिशवी (तीनही प्रकारच्या) प्रायोगिक तत्त्वावरती वापरणे कामी घेणेस परवानगी मिळावी.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री आर्थो टुल्स यांचेकडून उपरोक्त नमुद दराने प्रायोगीक तत्त्वावर खरेदी करणेस परवानगी मिळावी .

**निर्णय क्र.९०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पर्यावरणपूरक (Eco Friendly) प्लॅस्टिक पिशवी खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेत याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी)

---

**विषय नं.५४** **Aluminium Folding शिड्या खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परीसर, भक्तनिवासस्थान परीसर, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साई प्रसादालय, श्री साईनाथ हॉस्पीटल, व्दारावती इमारत तसेच स्टाफ क्वॉर्टर परीसर या ७ ठिकाणच्या झोनमधील सर्व ठिकाणी वीजपुरवठयासाठी सबस्टेशनची उभारणी केलेली असून या ठिकाणाहून तेथील विद्युत तक्रार निवारण व ए.सी.संबंधीचे तक्रार उंचीवरील कामाकरीता विविध उंचीच्या फोल्डींग शिडयांचा वापर केला जातो. तसेच नविन निघणा-या कामांकरीताही Aluminium Folding शिडयांचा वापर केला जातो. विद्युत विभागाकडे वापरात असलेल्या ०६ नग शिडया ह्या साधारण १२ वर्षापूर्वी खरेदी केलेल्या असून या शिडया सततच्या वापरामुळे वापरास निरुपयोगी झालेल्या आहेत. शिवाय पुर्वीपेक्षा सध्या कामाचे झोन वाढलेले असल्यामुळे जुन्या शिडयांची संख्या कमी पडते. याकरीता विद्युत विभागाकडील दैनंदिन तक्रार निवारण कामाकरीता व इतर नियोजित कराव्या लागणा-या कामांकरीता खरेदी कराव्या लागणा-या Folding शिडयांचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | DESCRIPTION | Qty. | Rate. | Amount. |
|---|---|---|---|---|
| 01) | Aluminium Folding Ladder Height :- 6 feet | 10 Nos. | Rs. 6,000.00 | Rs. 0,60,000.00 |
| 02) | Aluminium Folding Ladder Height :- 8 feet | 10 Nos. | Rs. 7,500.00 | Rs. 0,75,000.00 |
| 03) | Aluminium Folding Ladder Height :- 12 feet | 10 Nos. | Rs. 11,000.00 | Rs. 1,10,000.00 |
| 04) | Aluminium Folding Ladder Height :- 16 feet | 01 Nos. | Rs. 15,500.00 | Rs. 0,15,500.00 |
| | | | **Total Amount :-** | **Rs. 2,60,500.00** |

उपरोक्तप्रमाणे Aluminium शिडया कोटेशन मागवून खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये २,६०,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरचे Aluminium शिडया कोटेशन मागवून खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९०२ यावर सविस्तर चर्चा होऊन, विद्युत विभागासाठी आवश्यक असणाऱ्या Aluminium Folding शिड्या विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. २,६०,५००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५५ श्री साई प्रसादालयामधील स्वच्छता / हाऊसकिपींगकामी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि.पुणे याना आऊट सोर्सिंग पध्दतीने दिलेल्या कामास मुदतवाढ देणे अथवा निविदा मागविणे बाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१०-२०११ या कालावधीकरीता श्री साई प्रसादालयामधील स्वच्छता / हाऊसकिपींगचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेसाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. मा.व्यवस्थापन समिती दि.०३/०१/२०१० चे सभेमधील निर्णय क्र.१०६ अन्वये उपरोक्तकामी निवीदा सादरकर्त्याकडून वापरणेत येणारी मशिनरी, मनुष्यबळाची संख्या, कामाचा दर्जा, काम करण्याची पध्दती व कामाचा अनुभव या सर्व बाबींचा विचार होऊन दि.०७/०१/२०१० ते ०६/०१/२०११ या कालावधीसाठी मे. बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांचे दरमहा रु.७,५०,०००/- दर मान्य करुन काम देण्यात आले होते. मा.व्यवस्थापन समिती दि.०३/०१/१० चे सभेतील निर्णय क्रं.१०६ व जा.नं.एसएसएस/ वशि/प्रसादा/ २१७१/१० दि.०१/०२/२०१० चे कार्यादेशानूसार मे.बी.व्ही.जी. इंडीया लि. पुणे यांना दरमहा रु.७,५०,०००/- दराने देण्यात आलेल्या कामाची मुदत दि.०६/०१/२०११ रोजी संपणार आहे.

बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांनी निवीदेमध्ये नमूद केल्याप्रमाणे मशिनरी व मनुष्यबळाचा वापर करुन दि.०७/०१/२०१० पासून श्री साई प्रसादालयामधील हाऊसकिपींग / स्वच्छतेचे काम समाधानकारक केलेले आहे. तसेच उत्सव काळात जादा कर्मचारी लावून चांगल्या प्रकारे स्वच्छता करुन दिलेली आहे. त्याकामी वेगळे चार्जेस मागितलेले नाहीत.

बी.व्ही.जी. इंडिया लि.पुणे यांनी दि.१४/१०/२०१० चे विनंती अर्जाव्दारे सध्याचेच दरात (रु.७,५०,०००/- दरमहा) यापुढील ०२ वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

टेंडर कालावधीमध्ये बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे हे श्री साई प्रसादालयामधील स्वच्छता / हाऊसकिपींगचे काम चांगल्या प्रकारे करुन देत असल्यामुळे साईभक्तांनी समाधान व्यक्त करीत असून त्याबाबत अभिप्राय रजिस्टरमध्ये स्वच्छतेबाबत चांगले अभिप्राय नोंदविलेले आहेत. त्यामुळे यापुढील कालावधीसाठी स्वच्छता / हाऊसकिपींगचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणे संस्थानचे दृष्टीने हितावह आहे.

बी.व्ही.जी. इंडिया लि. पुणे यांचे दि.१४/१०/२०१० चे विनंती अर्जानूसार विषयांकित कामासाठी मुदतवाढ देणे अथवा वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निवीदा मागविणे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९०३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामधील स्वच्छता / हाऊसकिपींगकामी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि.पुणे यांना त्यांना दिलेल्या कामास पुर्वीचेच अटी/ शर्तीवर व दरावर एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय)

---

**विषय नं.५६ फायबर सॅकपॅलेटस खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य, तांदूळ, आटा वगैरे किराणा मालाचे साहित्य ठेवणेसाठी सध्या खालीलप्रमाणे सॅकपॅलेटस् आहेत.

| अ.नं. | तपशील | नग | खरेदीची तारीख | किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१. | लोखंडी स्टॅण्ड (सॅकपॅलेट) | ७५ | विद्युत विभागाकडून तयार करुन घेतलेले | २७,८५५/- |
| ०२. | फायबर सॅकपॅलेटस् | ७५ | २९/०९/२००७ | १,६७,४२३/- |

सदरचे सॅकपॅलेटस् कमी पडतात त्यामुळे किराणा साहित्य जमिनीवर ठेवावे लागते. अशाप्रकारे थेट जमिनीवर किराणा साहित्य ठेवणे अन्न व औषध प्रशासन व अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचे नियमानुसार चुकीचे आहे. त्यामुळे प्रसादालयास आणखी ५० नग सॅकपॅलेटची गरज आहे. त्याकामी अंदाजे रु.१,२५,०००/- खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तकामी प्रसादालय अंदाजपत्रकात रक्कम रु.३४,१५,०००/- शिल्लक आहे. खालील वर्णनाप्रमाणे ५० सॅकपॅलेट खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदी करता येतील.

RP 1210 A9L,1200mm(L)x1000mm(w)x125-130mm(H), Colour Green, Injection molded Food grade HDPE 4way, Flat Deck Non-revercible,9 leg pallet suitable to handle with hydrolic pallet truck & fork cliped only load bearing Static load 2000 kg. , Dinamic load 1000 kg. Racking load not applicable

तरी उपरोक्तप्रमाणे ५० फायबर सॅकपॅलेटस् खरेदी व रु.१,२५,०००/- चे खर्चाबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील धान्य, कडधान्य, तांदूळ, आटा वगैरे किराणा मालाचे साहित्य ठेवणेसाठी ५० फायबर सॅकपॅलेटस् कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.१,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय/ अधिक्षक, खरेदी)

---

**विषय नं.५७** **जुना सोलर स्टिम कुकींग प्रकल्पाची विहीत पध्दतीने स्क्रप विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००१ मध्ये जुन्या प्रसादालयात अन्न शिजविताना इंधन बचत व्हावी या उद्देशाने तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने सोलर स्टिम कुकींग प्रकल्पाची उभारणी करणेत आलेली आहे. सदरचा प्रकल्प मे. गढीया सोलर एनर्जी सिस्टीम प्रा. लि. वलसाड यांचे द्वारे कार्यान्वित करणेत आलेला असुन प्रतिदिनी प्रकल्पाच्या स्टिमवर सरासरी ३ हजार व्यक्तींचे अन्न शिजविण्यात येत होते.

**जुन्या सोलर स्टिम कुकींग प्रकल्पाची माहीती खालीलप्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| १. | प्रकल्पाचा कालावधी | :- सन २००१ ते २००८ |
| २. | प्रकल्पाची उभारणीचा एकूण खर्च | :- रु. ३३.७० लाख |
| ३. | केंद्रीय अपारंपारीक उर्जा मंत्रालय यांचेकडुन मिळालेले अनुदान | :- रु. १५.५० लाख |
| ४. | अनुदान रक्कम वजा केल्यास प्रत्यक्षात झालेला खर्च | :- रु. १८.२० लाख |
| ५. | संपुर्ण कालावधीमध्ये प्रकल्पाच्या स्टिमवर एकुण शिजविलेले अन्न | :- रु. ६,९०,००० किलो |
| ६. | बचत झालेले इंधन (एल. पी. गॅस) | :- ७६,६६६ किलो |
| ७. | खर्चात झालेली बचत रक्कम | :- रु. २३ लाख |
| ८. | घसारा वजा करता प्रकल्पाची किमंत | :- रु.१,७३,०९५.२३ |

नविन श्री साई प्रसादालय जानेवारी २००९ पासून नवीन इमारतीमध्ये सुरु झालेने प्रसादालय विभागाच्या सर्व प्रक्रिया नविन प्रसादालयात होतात. त्यामुळे जुन्या साईप्रसादालयाच्या इमारत व रिकाम्या जागेचा भविष्यात इतर कामासाठी तातडीने वापर करावयाचा असल्याने जुन्या साईप्रसादालयातील सोलर स्टिम कुकींग प्रकल्प स्थंलातरीत करावा लागणार आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भिय अ. नं. १ नुसार सदरचा प्रकल्प स्थलांतर करणेसाठी व सोलरच्या इतर प्रकल्पाकरीता मा. व्यवस्थापन समितीच्या दि. १९.९.२००९ चे सभेतील निर्णय क्र. ७३१(१३) नुसार तज्ञ सल्लागार म्हणुन मा. डॉ. एम. जी. ताकवले सर (माजी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर) यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. त्यानुसार सल्लागार डॉ. ताकवले सर यांनी सदर प्रकल्पाची पाहणी करुन उपरोक्त संदर्भिय अ. नं.२ नुसार दि. २७.१०.२०१० च्या ई- मेल पत्राद्वारे अभिप्राय दिलेला आहे. सदरच्या पत्रामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे आपला अभिप्राय दिलेला आहे.

- जुन्या प्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्प दिनांक ७.१.२००९ पासुन बंद असल्याने पुर्वीच्या क्षमतेने कार्य करणार नाही .
- प्रस्तुत प्रकल्प नविन श्री साई आश्रम प्रकल्पाकडे स्थलांतर करुन त्याचे गरम पाणी तयार करणाऱ्या प्रकल्पामध्ये पुर्न उभारणी करावयाचे झालेस त्यासाठी अंदाजे रु. १६ लाख खर्च येईल. केंद्र सरकारकडून एकदा अनुदान मिळालेले असल्याने पुर्न उभारणी केलेस पुन्हा अनुदान मिळणार नाही.
- श्री साई आश्रम येथे नविन FPC सोलर हॉट वॉटर प्रकल्पाची उभारणी केलेस त्यासाठी अंदाजे रु १८ लाख खर्च येईल व सदरचे प्राजेक्टसाठी भारत सरकारच्या अपारंपारीक उर्जा मंत्रालया मार्फत अनुदानही मिळेल.
- प्रस्तुत प्रकल्प स्कॅ्रप करुन विकणे योग्य राहील.

प्रस्तुत प्रकल्प स्क्रॅप करुन विक्री करावयाची झालेस प्रकल्पाचे एकुण स्ट्रक्चरचे अंदाजे वजन २० मे. टन ग्राहय धरलेस सध्याच्या स्क्रॅपच्या दरानुसार फक्त स्ट्रक्चरची किमंत रु. ४ लाख होईल. सदरची प्रकल्पाची विहीत पद्धतीने विक्री करणेबाबत मा. व्यवस्थान समितीच्या मान्यतेने शासनाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविणेत येईल.

तरी तज्ञ सल्लागार मा. डॉ. एम.जी. ताकवले सर यांच्या अभिप्राय नुसार जुना सोलर स्टिम कुकींग प्रकल्प निरोपयोगी असलेने विहीत पद्धतीने विक्री करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान अधिनियमाचे अधिन राहून शासनाचे परवानगीने जुना सोलर स्टिम कुकींग प्रकल्प निरोपयोगी असलेने विहीत पद्धतीने विक्री करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५८ दिक्षीतवाडा व व्दारकामाई सभामंडप व श्रीरामनवमी शताब्दी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे हयातीत बांधलेला दीक्षीतवाडा व द्वारकामाई सभामंडप तसेच श्री रामनवमी उत्सवाला सन २०११ अखेर १०० वर्ष पूर्ण होत आहेत. याबाबतचा संस्थान प्रकाशित श्री. दाभोळकर लिखीत श्री साई सतचरित्रात खालीलप्रमाणे दाखला आहे.

१) **दीक्षीत वाडा:-** नउ डिसेंबर १९०९ रोजी बाबांची संमती घेवून दीक्षीत वाडयाच्या पाया बांधणीस सुरुवात केली व पुढे १९११ मध्ये श्री रामनवमीचा चांगला मुहूर्त साधून गृहप्रवेशाचे कार्य विधीपूर्वक उरकुन घेतले. (अध्याय क्र.४ ओवी क्र. १५७-१६६).

२) **द्वारकामाई सभामंडप:-** श्री साईबाबांचे भक्त गोपाळ गुंडांना जशी यात्रे बद्दल किंवा ऊरुसाबद्दल स्फ़ुर्ती झाली तशीच त्या जीर्ण मशिदीला गोंडस रुप आणावे अशीही त्यांना इच्छा झाली. आधी आज्ञा मागता थकले. मग म्हाळसापतींना मध्यस्थी घातले तेव्हा बाबांनी अनुमोदन दिले. जेव्हामशिदीत एका रात्रीत फ़रशी झाली, तेथुन मग दुस-याच दिवशी बाबा गादीवर बसले. सन १९११ साली सभामंडप तयार झाला. ( आध्याय क्र.६ ओवी क्र.१२०-१२७)

३) **श्रीरामनवमी ऊत्सव :-** श्री साईबाबांचा भक्त गोपाळ गुंड हे कोपरगांवी मोजणी खात्यात सर्व्हेअर होते. त्यांना तीन स्त्रीया असून सुद्धा पुत्ररत्न झाले. त्यांचे मन प्रसन्न झाले. त्यांचे मनात आले की, शिरडी गांवी दरवर्षी एक यात्रा (ऊरुस) भरावा, म्हणून त्यांनी तात्या कोते पाटील, रामचंद्र कोते पाटील, माधवराव देशपांडे वगैरे सर्व प्रमुख मंडळीचे कानावर घातले. हा विचार सर्वांना आवडला व त्यांनी प्रयत्न सुरु केले. बाबांच्या संमतीने शके १८३३ इ.स.१९११ साली रामनवमीचे दिवशी यात्रा ठरविली. (अध्याय क्रं.६ ओवी क्रं. ५८-१२०)

इ.स.१९११ ला श्री बाबांचे समोर सुरु झालेला श्री रामनवमी ऊत्सव आजतागायत संस्थान मार्फ़त चालू आहे. यापुर्वी श्रींचे ५० वी पुण्यतिथीचे वेळी नऊ दिवस अखंड साईनामाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तसेच दररोज विविध कार्यक्रम राबविण्यात आले होते. याच धर्तीवर सध्या असलेल्या सन २०१० मधील ०५ ते ०६ महिन्याचे कालावधीत शताब्दी महोत्सवाचे आता येणा-या श्रींचे पुण्यतिथी ऊत्सव-२०१० चे औचित्य साधुन प्रत्येक महिन्याचे नवमीस श्रींचे द्वारकामाईत अखंड साईनाम २४ तासासाठी आयोजित करण्यात यावा असे चैत्र महिना २०११ सुरुवातीपर्यंत व त्यापुढे चैत्र शुध्द १ ते ९ अखेर साईनाम जप व अखंड विणा, भजन कीर्तन, धार्मिक नाटके, आदी द्वारकामाई मंदिरात अथवा द्वारकामाई मंदिराचे दक्षिणेस असलेले खुले नाटयगृह समोरील मोकळया जागेत केल्यास दीक्षीतवाडा, द्वारकामाई सभामंडप व श्री रामनवमी उत्सव शताब्दी वर्ष संस्थानमार्फत साजरे करण्यात आले असे वाटेल. श्री साईबाबांनी अनेक भक्तांना श्रीरामाचे रूपात दर्शन दिलेले आहे. याबाबत श्री साईचरित्रात उल्लेखही आहे. (अध्याय क्रं. २९ ओवी क्रं. ३१-३५) तरी या प्रसंगी सप्ताहाचे शेवटचे दोन दिवस "रामयाग" यज्ञ ही करता येईल. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, दिक्षीतवाडा व व्दारकामाई सभामंडप व श्रीरामनवमी उत्सव शताब्दी वर्षानिमित्त प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे निरनिराळे धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन संस्थानमार्फत करण्यात यावे. तसेच मोरारीबापू यांच्या कार्यक्रमाचे साईनगर प्रांगणात आयोजन करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.५९ श्री साईबाबांच्या समाधी मंदिराचा कळस व घुमट सोन्याचा करणे बाबत.**

**प्रस्ताव-** समाधी मंदिरामध्ये सुवर्ण सिंहासन, छत्री, सोन्याचे दिवे व समाधी मंदिरातील भिंतीवरील सोन्याचे पत्रे हे श्री. ए.एन.रेड्डी , हैद्राबाद यांनी देणगी दाखल करुन दिलेले आहे. तसेच समाधी चौथ-याचे समोरील असलेले व जमिनीपासून ६|| फुट उंचीचे असलेले चांदीचे खांबाचे वरील भागावर कमान व आर्च देणगी दाखल सोन्याचे काम करुन दिलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०४/२००७ चे सभेतील विषय नं.०२, निर्णय क्रं.३४० अन्वये साईभक्त श्री. बी. विजयकुमार,हैद्राबाद यांना समाधी मंदिराचे वरील मुख्य कळस व त्या सभोवताली असलेल्या चार गोपूराला सोन्याचा मुलामा देण्याचे काम माहे जुलै, सन २००७ अखेर करण्यात आलेले आहे. परंतू, त्यावेळी पावसामुळे गोपूराचे उर्वरीत खालच्या साधारणत: १ फुट उंचीचे गोलाकार भागाला मुलामा देण्याचे काम बाकी राहीलेले होते. उर्वरीत राहीलेले सोने मुलामा काम श्री.बी.विजयकुमार यांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१० अखेर पूर्ण केलेले आहे. सदरचे सोने मुलामा व त्यावर वज्रलेप देण्याचे काम श्री गढवी सर, स्वामी नारायण आर्ट क्रिएशन,नाशिक यांचेकडून करुन घेण्यात आलेले आहे. निर्सगातील वातावरणाचा या सोने मुलाम्यावर कमीत कमी १५ वर्ष कोणताही परिणाम होणार नाही, याबाबत श्री गढवी यांनी लेखी हमी पत्र दिलेले आहे.

याच समाधी कळसावर (शिखर) व मंदिराचे आतील घुमटास सोन्याच्या पत्र्याचा कव्हर देणगी दाखल बसवून देणेबाबात साइर्भक्त ए.महेश रेड्डी यांनी दि.३०/०९/२०१० रोजीचे पत्राने इच्छा प्रदर्शित केलेली असून सदरचे सोने काम करणेस संस्थानकडे परवानगी मागीतलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे सोनेकाम करणेस परवानगी देणेस हरकत नाही मात्र परवानगी देतांना खालील बार्बीचा विचार होणे आवश्यक आहे असे वाटते.

तरी यापुढे जर सोनेकामासाठी परवानगी दयावयाची असेल तर सदरचे सर्व सोन्याचे पत्र्याचे व इतर काम हे शिरडी येथे प्रत्यक्ष मुख्य लेखाधिकारी, मंदिर अधिक्षक व संस्थानचे अधिकृत सोनार यांचे देखरेखेखली शिर्डी येथेच व्हावे असे नम्र मत आहे. जेणेकरुन किती सोने वापरले व किती इतर धातू वापरले याबाबत पक्की माहिती समक्ष मिळून येईल व त्यानुसार देणगी पावती करणे व स्टॉक रजीष्टरला नोंद घेणेस सोयीस्कर होईल असे वाटते म्हणजे कालांतराने काही वाद होणार नाही. अडचण होणार नाही असे वाटते. पुर्वी चांदीचे सिंहासन, प्रभावळ, बैठक इ. काम हे संस्थानच्या लेखाशाखेच्या बिल्डींगमध्ये (भक्तनिवास बिल्डींग) संस्थानचे देखरेखीने केले होते. त्याचप्रमाणे कळसाचे व घुमटाचे सोनेकाम शिर्डी येथे संस्थानचे देखरेखीखाली करणे उचीत राहील. याप्रमाणे सोनेकाम व परवानगी देणेस हरकत नाही.

**निर्णय क्र.९०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या समाधी मंदिराचा कळस व घुमट सोन्याचा करणेचे कामास तत्वतः मान्यता देणेत आली. याकामी डिझाईन तयार करुन मा.विश्वतांना दाखविण्यात यावी. तसेच किती सोने वापरणार व सदर काम कशावर करणार याबाबत सविस्तर अहवाल करुन तो व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करावा असे ठरले. सदरहू निर्णयास मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी आपला विरोध दर्शविला.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**विषय नं.६०** **वाहनांसाठी नवीन टायर्स खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील वाहनांचे सध्याचे टायर खराब झालेने त्यांना नवीन टायर्स (टयुब, प्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | वाहन क्रं. | वाहन प्रकार/ वापर | सध्याचे टायर्स एकूण वापर | आवश्यक टायर साईज | कंपनी | टायर्स नग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एमएच-०३/ एएच-८९१० | मारुती / रूग्णवाहीका | ८२,२०३ | १४५/७०R१२ | अपोलो (अमर डिलक्स) | ०५ |
| २. | एमएच-१७/ टी-७१४१ | टाटा४०७ / रूग्णवाहीका | ६२,१०४ | ७-५०-१६ | अपोलो (अमर डिलक्स) | ०५ |
| ३. | एमएच-१७/ टी-६८०१ | टाटा४०७/ कचरावातुक | ४०,२०१ | ८-२५-१६ आडवी नक्षी | अपोलो (माईल स्टार ) | ०२ |
| ४. | एमएच-१७/ टी-७१३१ | टाटा४०७ / शववाहीका | ५२,२०५ | ८-२५-१६ | अपोलो (अमर डिलक्स) | ०५ |
| | **एकुण टायर्स** | | | | | **१७** |

वरील प्रमाणे चार वाहनांकरीता १७ टायर्स (टयुब, प्लॅपसह) खरेदी कामी रू.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रू.एक लाख) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्त वाहनांकरीता नवीन टायर्स अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन बोलावुन खरेदी करण्यात येतील.

तरी वरील प्रमाणे चार वाहनांकरीता नवीन १७ टायर्स (टयुब, प्लॅपसह) खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रू.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रू. एक लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.९०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे उपरोक्त चार वाहनांसाठी आवश्यक असणारे नवीन १७ टायर्स (टयुब, प्लॅपसह) अपोलो कंपनीचे अधिकृत डिलरकडून कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी रू.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६१** **शिरडी (साईनगर) रेल्वेस्टेशन येथे संस्थानची बससेवा सुरु केलेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२४/०९/२०१० रोजी मा.अध्यक्ष साहेब शिरडी येथे आले असता समक्ष झालेल्या चर्चेत, श्री साईंचे दर्शनासाठी रेल्वेने शिरडी येथे येणाऱ्या भक्तांच्या सोईसाठी शिरडी (साईनगर) रेल्वेस्टेशनवरुन भक्तांना आणणेसाठी संस्थानची विनामुल्य बससेवा सुरु करणेबाबत त्यांनी सुचना केलेली आहे.

नगरसुल रेल्वेस्टेशन येथुन साईभक्तांना शिरडी येथे ने-आण करण्यासाठी संस्थानच्या दोन बसेसची सेवा चालु आहे. सदरच्या दोन्ही बसेस सायंकाळी १७.३० वाजता नगरसुल येथे जातात व रात्री नगरसुल येथेच थांबुन सकाळी सुमारे ०७.३० वाजता शिरडी येथे भक्तांना घेवुन येतात.

सदरच्या दोन बसेस नगरसुल येथुन आल्यानंतर शिरडी (साईनगर) रेल्वेस्टेशन येथे येणाऱ्या रेल्वेचे वेळापत्रकाचा विचार करुन सकाळी ०८.३० वाजता व त्यानंतर सकाळी ११.०० वाजता असे दोन वेळेस शिरडी (साईनगर) रेल्वेस्टेशनवर भक्तांना आणणेसाठी वापरण्यात येत आहेत.

शिरडी (साईनगर) रेल्वेस्टेशनवर भक्तांना आणणेसाठी सदरची बससेवा दि.०३/१०/२०१० पासुन विनामुल्य सुरु करण्यात आलेली आहे.

सदरचे कार्यवाहीस मान्यता मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.९०९ उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेणेत येऊन, केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणेत आली.**

**याचवेळी श्री साईबाबांचे दर्शनासाठी गोवा व कर्नाटक एक्सप्रेस मधून येणारे साईभक्त कोपरगाव येथे उतरतात. या भक्तांना ने-आण करणेसाठी गोवा व कर्नाटक एक्सप्रेस या गाडयांच्या वेळेनुसार कोपरगाव-शिर्डी व शिर्डी-कोपरगाव अशी बससेवा संस्थानमार्फत सुरु करणेत यावी, याकामी जरुरीनुसार आवश्यक असणाऱ्या बसेस खरेदी करणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६२ देणगी टाटा नॅनो वाहनाबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०२/११/२०१० रोजी टाटा कंपनीचे अधिकृत डिलर, सतिष मोटर्स (अकोला) प्रा.लि. यांनी श्री.साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता एक नवीन TATA NANO CX हे वाहन देणगी दिलेले आहे. सदर वाहनाच्या विमा पॉलीसीचा खर्च कंपनीने केलेला आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम (रू.) |
|---|---|---|
| ०१. | वाहनाची टॅक्स इनव्हाईस किंमत | १,४६,६५९.०० |
| ०२. | विमा रक्कम | ४,४७३.०० |
| **एकुण रक्कम रू.** | | **१,५१,१३२.००** |

वरील प्रमाणे टाटा कंपनीचे अधिकृत डिलर सतिष मोटर्स (अकोला) प्रा. लि. यांचे नांवे देणगी स्विकारण्यात आलेल्या एक नवीन TATA NANO CX (कार्यालयीन) वाहनाची एकुण किंमत रू.१,५१,१३२/- (अक्षरी रक्कम रू.एक लाख एकावन्न हजार एकशे बत्तीस) मात्र आहे.

तरी टाटा कंपनीचे अधिकृत डिलर सतिष मोटर्स (अकोला) प्रा. लि. यांचेकडून एक नवीन TATA NANO CX (कार्यालयीन) हे वाहन देणगी स्विकारले बाबतचा प्रस्ताव माहिती करीता मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.९१० उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेणेत येऊन मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वाहन विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६३ शिल्लक कापूस, गादीपाठ कापड व गादीखोळ (कव्हर) कापड यामधून कापूसगाद्या उशीसह, गादीपाट खोळ व गादीखोळ (कव्हर) तयार करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, धर्मशाळा व चौकशी व निवासस्थान विभागातील साईभक्तांचे निवासव्यवस्थेकरीता ९५०० नग नविन कापुसगादया उशीसह तयार करणेकामी व १९००० नग गादीखोळ (कव्हर) तयार करणेकामी कापुस व कापड खालीलप्रमाणे पुरवठाधारकाकडुन खरेदी करण्यात आलेले होते.

**अ) उशीसह कापुस गादी, गादीखोळ (कव्हर) याकामी खरेदी करण्यात आलेले कापुस व कापड.**

| अ.नं. | पार्टीचे नांव | तपशील | दर रुपये पैसे | एकुण रक्कम रु.पै |
|---|---|---|---|---|
| ०१ | तुलसी एम्पोरियम, सोनई | जिंनिंग कापुस ६६६९५ कि. | ९१.५० प्रति कि. | ६१,०२,५९२.५० |
| ०२ | बांठिया इंन्टरप्राईजेस, पुणे | गादीपाट कापड २३७५० मि. | ५७.२३ प्रति मि . | १३,५९,२१२.५० |
| ०३ | बांठिया इंन्टप्राईजेस, पुणे | गादीखोळ (कव्हर )<br>कापड ४७३३३.२० मिटर | ६९.३५ प्रति मि. | ३२८२५५७.४२ |
| | | | एकुण :- | १,०७,४४,३६२.४२ |

**ब) कापुसगादया उशीसह तयार करणे संख्या - ९,५०० :- (कामाचे स्वरुप** - नविन कापुस गाठी फोडुन सुकविणे, कापुस पिंजणे, कापड कटींग करुन गादी पाट शिवणे, गादी भराई, ५५ टाके टाकणे इ. प्रती गादीस ७ किलो कापुस व गादीपाट कापड २.४० से.मी. मजुरी दर प्रति नग रु. ३०.००)

**क) गादीखोळ (कव्हर) तयार करणे संख्या :- १९,००० (कामाचे स्वरुप -** कापड कटिंग करुन गादीखोळ (कव्हर) शिवणे, गादीखोळ कापड २.४९ सें.मी. मजुरी दर प्रति नग रु. ३.५०)

उपरोक्त ब व क चे कामाचे संदर्भात, १) श्री नजीर गंभीर पिंजारी, श्रीरामपुर यांना जा.नं.एसएसएस/वशी-साभनि/१५४७/२००९, दि. ०४/०२/२००९ अन्वये कापुसगादया उशीसह नग ३१६६ तयार करण्याचे कामाचा आदेश देण्यात आलेला होता. २) श्री लक्ष्मणदास चिमणदास वैष्णव, श्रीरामपुर यांना जा.नं.एसएसएस/वशी-साभनि/१५४६/२००९, दि. ०४/०२/२००९ अन्वये कापुसगादया उशीसह नग ३१६६ तयार करण्याचे कामाचा आदेश देण्यात आलेला होता. ३) सलिम गादी मर्चंट, लासलगाव यांना जा.नं.एसएसएस/वशी-साभनि/१५४५/२००९, दि. ०४/०२/२००९ अन्वये कापुसगादया उशीसह नग ३१६८ व गादीखोळ (कव्हर) नग-१९,००० तयार करण्याचे कामाचा आदेश देण्यात आलेला होता. याप्रमाणे त्यांचेकडुन कामे करुन घेवुन संबंधीत विभागाने त्याची डेडस्टॉकला नोंद घेतलेली आहे.

| अ.नं. | विभाग | कापुसगादी उशीसह संख्या | प्रति नग खर्च रु./पैसे | एकुण रक्कम रु./पैसे | गादीखोळ (कव्हर) संख्या | प्रति नग खर्च रु./पैसे | एकुण रक्कम रु./पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | साईबाबा भक्तनिवासस्थान | ३००० | ७७५.३७ | २३२६११०.०० | ६००० | १७६.१८ | १०५७०८०.०० |
| ०२. | चौकशी व निवासस्थान | ३००० | ७७५.३७ | २३२६११०.०० | ६००० | १७६.१८ | १०५७०८०.०० |
| ०३. | धर्मशाळा | ३५०० | ७७५.३७ | २७१३७९५.०० | ७००० | १७६.१८ | १२३३२६०.०० |
| | एकुण | ९५०० | ---- | ७३६६०१५.०० | १९००० | ---- | ३३४७४२०.०० |

उपरोक्तप्रमाणे कापुसगादया उशीसह नग-९५०० व गादीखोळ (कव्हर) नग-१९००० तयार केलेनंतर

**ड) शिल्लक कापुस, गादीपाट कापड, गादीखोळ (कव्हर) कापड खालीलप्रमाणे -**

| अ.नं. | तपशील | गादीपाट कापड | गादीखोळ (कव्हर) कापड | कापुस |
|---|---|---|---|---|
| ०१. | जमा | २३,७५० मीटर | ४७,३३३.२० मीटर | ६६,६९५ किलो |
| ०२. | खर्च | २२,४४२ मीटर | ४७,२५६.१५ मीटर | ६३,३२९ किलो |
| ०३. | जादा २१ खोळी (१९००० व्यतिरिक्त) | --- | ५२.०० मीटर | --- |
| ०३. | शिल्लक | १,३०८ मीटर | २५.०५ मीटर | ३,३६६ किलो (कापुस ३२०८+कचरा १५८) |

उपरोक्त १) शिल्लक कापुस ३२०८ किलोमधुन अंदाजे ४५० कापुसगादया उशीसह तयार होतील.

२) शिल्लक गादीपाट कापड १३०८ मिटरमधुन ४५० गादीपाटखोळ व १८३ मिटर कापड शिल्लक राहील.

३) शिल्लक गादीखोळ (कव्हर) कापड २५ मिटरमधुन १० गादीखोळ (कव्हर) तयार होतील व उर्वरित ४४० गादीखोळ (कव्हर) कामी ११०० मिटर कापड खरेदी करावे लागेल.

तरी ४५० गादया तयार करणेकामी पुर्वीचे तीन ठेकेदारापैकी एकाने आहेत्याच अटी शर्तीस अधीन राहुन आहेत्याच दराने काम करुन देण्यास तयार असल्यास त्यांचेकडुन काम करुन घेता येईल. मात्र गादीखोळ (कव्हर) कामी ११०० मिटर कापड कमी पडत असल्याने खरेदी करावे लागेल. त्यासाठी पुर्वीचेच पुरवठादाराने आहेत्याच दरामध्ये देणे आवश्यक आहे. सदरच्या नविन तयार करण्यात येणा-या कापुसगादया उशीसह नग-४५० नव्याने बांधकाम होत असलेली बिल्डींग साईआश्रम भक्तनिवास यांचेसाठी उपयोगात येतील.

११०० मिटर गादीखोळ (कव्हर) कापड खरेदीकामी अंदाजे रु. १,००,०००/- व ७ किलो कापुसगादी उशीसह तयार करणे, गादीपाट कापड कापुन खोळ तयार करणे व गादीखोळ (कव्हर) तयार करणे याचे मजुरीकामी अंदाजे रु. २०,०००/- असा एकुण रु. १,२०,०००/- खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.९११ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.६४ प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या जागेच्या मासिक परवाना फी मध्ये वाढ करणे व पूढील एक वर्षाचा करारनामा करणेस मान्यता देणे बाबत.**

**प्रस्ताव-** प्रसार भारती ( भारतीय प्रसार निगम ) आकाशवाणी तथा दुरदर्शन मुंबई यांनी CEW/TVP/२६१९ दि. २१/०४/२००३ अन्वये शिर्डी येथे दुरदर्शन लघु प्रसारण केंद्र उभारणेसाठी संस्थानकडे मासिक भाडे तत्वावर ४९०० स्क्वे.फुट जागा मिळणेस विनंती केली होती. त्याबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचा दि. ११/०५/२००३ रोजीचा ठराव क्र. २०७ ने मा.धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांची पुर्व मान्यता घेवून सदर जागा भाड्याने देणेचे ठरले. त्यानंतर ठरावास अनुसरुन संस्थानने दि. ९/६/२००३ रोजी मा.धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे प्रसार भारती यांना संस्थानची जागा भाडयाने देणेबाबत प्रस्ताव सादर केला. प्रकरणी परवानगी देणे संस्थानचे हिताचे आहे. असा विचार करुन मा. धर्मादाय आयुक्त यांनी दि. १०/०७/२००३ रोजीचे आदेशाने प्रसार भारती आकाशवाणी दुरदर्शन मुंबई यांना Low power T.V. Center शिरडी येथे उभारणेसाठी संस्थानचे अर्जात नमुद केले प्रमाणे जागा भाडयाने देणेबाबत परवानगी दिली आहे. त्याबाबत प्रसार भारती यांनी दि. ०६/०८/२००३ चे पत्राने ०१) पी.डब्ल्यु.डी. यांचेकडून निश्चित झालेले भाडे देण्यात येईल, ०२) कमीत कमी १५ वर्षासाठी जागा द्यावी लागेल, ०३) करारनामा ३ वर्ष किंवा ५ वर्षासाठी करण्यात यावा त्यानंतर नुतनीकरण करण्यात यावा असा राहील, असे इकडेस कळविण्यात आले होते. दि. २२/०८/२००३ पासून प्रसार भरती यांना संस्थानची जागा + रुम वापरांस दिलेली आहे.

प्रसार भारती यांचे उपरोक्त पत्राबाबत मा. व्यवस्थापन मंडळाचा दि. ५/१०/२००३ रोजीचा ठराव क्र.४७३ झालेला आहे. (अॅडव्होकेट श्री डी.डी.कुलकर्णी, कोपरगांव यांचेकडून प्रसार भारती यांचे सोबत करावयाचे लिज डीड ड्राफ्ट तयार करुन घेतलेला आहे.) प्रसार भारती यांना १५ वर्षासाठी जागा भाड्याने देणेबाबतचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे.

मात्र संस्थानला आता नविन अधिनियम लागू झाला आहे. त्यामध्ये भाडे पट्ट्याबाबत नविन तरतुद आहे. पुर्वीच्या ठरावा प्रमाणे १५ वर्षासाठी लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर जागा दिली असली तरी आताच्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियमातील कलम १७ (३) च्या तरतुदी प्रमाणे फक्त १ वर्ष कालावधीसाठी संस्थान मिळकत Lease वर देता येते. दि.३०/०७/२०१० रोजी सब रजिष्टार, राहाता यांचेसमोर प्रसार भारती दुरदर्शन व श्री साईबाबा संस्थान यांचे समवेत प्रस्तुत मिळकतीचा (दि. २१/०८/२००९ ते दि. २०/०८/२०१०) अखेर १ वर्ष कालावधीचा Lease deed करारनामा करण्यात आलेला आहे.

प्रसार भारती दुरदर्शन केंद्र यांनी संस्थानकडे जागा मागणी बाबतचा प्रस्ताव सादर केला त्यावेळी खालील बाबींवर चर्चा झाली.

१) श्री साईबाबांचे शिकवण व प्रचार करण्याचे प्रभावी माध्यम संस्थानला शिर्डी मध्ये उपलब्ध होऊ शकेल.
२) संस्थान उत्सव व विशेष कार्यक्रमाबाबत आगावू सुचना दिलेस दुरदर्शनवर प्रक्षेपित केले जातील सदर कार्यक्रम इतर वाहिन्यांवरही प्रसिध्द केले जातील.
३) दुरदर्शनचे कार्यक्रम अधिक सुस्पष्टपणे दिसतील.
४) संस्थानची भांडवली गुंतवणूक राहाणार नाही.
५) सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्रानुसार संस्थानला भाडे मिळेल.

वरिल बाबी विचारांत घेऊन प्रस्तावास मान्यता दिली. मा.धर्मादाय आयुक्त यांचे पुर्व मान्यता प्राप्त झाल्यावरच संस्थानने जागा भाड्याने देणेचे व व्यवहार पुर्ण केलेचे ठरले उपरोक्त ठरावांस मा.धर्मादाय आयुक्त यांचेकडे संस्थानने प्रस्ताव पाठवला व त्यांस मा.धर्मादाय आयुक्त यांची दि. १०/०७/२००३ रोजी परवानगी प्राप्त झाली. जागेचा ताबा घेणे व Lease deed बाबत प्रसार भारतीस सुचीत केले नंतर दि. ०६/०८/२००३ चे पत्राने दुरदर्शन कडून ज्या बाबी सुचित केल्या त्याबाबत दि. ०५/१०/२००३ चा ठराव झाला त्यामध्ये खालील आशायाचे Lease deed करुन घेऊन जागा १५ वर्षासाठी भाड्याने देणेचे ठरले.

०१) प्रसार भारती ब्रॉड कास्टींग कार्पो.ऑफ इंडिया, मुंबई यांना १५ वर्षासाठी संस्थानचे सर्व्हे नं. १४८ मधील जागा भाड्याने देणेबाबत मान्यता असावी.

०२) लिज डिड करार संपूर्ण १५ वर्षासाठी किंवा १५ वर्षासाठी एकाच वेळा करण्याऐवजी प्रत्येकी ३ / ३ वर्षाचे टप्या-टप्याने मुदतीसाठी करुन घेण्यात यावा.

०३) सार्वजनिक बांधकम विभागाचे प्रमाणपत्रानुसार ठरवून दिलेल्या भाड्यामध्ये प्रत्येक तीन वर्षांनी वाढ करण्यात यावी.

०४) अशाप्रकारे जागा १५ वर्षे लिजवर देणेसाठी मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची पूर्व मान्यता घेण्यात यावी. कारण मा.धर्मादाय आयुक्त यांचे दिनांक १०/०७/२००३ रोजीचे आदेशातील १५ वर्षे मुदतीबाबत स्पष्ट उल्लेख आलेला नाही.

०५) लाईट बील व नगरपंचायत टॅक्सेस प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पो.ऑफ इंडिया, मुंबई यांनी सोसावयाचे आहे.

०६) लिज डिड करार खर्च प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पो. ऑफ इंडिया मुंबई यांनी सोसावयाचा आहे.

प्रसार भारती यांना जागा भाडेपट्ट्याने देतांना उपरोक्त अटी शर्ती ठरलेल्या आहेत. परंतू १५ वर्षासाठी जागा देणेबाबत मा.धर्मादाय आयुक्त यांचेकडे प्रस्तावाबाबतचे कामकाज चालू असतांनाच संस्थानसाठी नविन अधिनियम २००४ लागू झाला आहे. सदर अधिनियमा प्रमाणे १ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी जागा भाड्याने देता येत नाही. करीता दि. २१/०८/२००९ ते दि. २०/०८/२०१० पावेतोचा भाडेपट्टा दि.३०/०७/२०१० रोजी केलेला आहे.

मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ चे व दि.०५/१०/२००३ चे ठरावाप्रमाणे प्रस्तुतची मिळकत प्रसारभारतीस वापरास दिलेली आहे. जागेचे मासिक भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी रु. ३,३२५/- मात्र निश्चित केले आहे.

प्रसारभारती ब्रॉडकास्टींग कार्पो.ऑफ इंडिया, दुरदर्शन रिले सेंटर, शिर्डी, यांनी आता त्यांचे दि. १८/०८/२०१० रोजीचे पत्राने लिज डीड दि.२१/०८/२०१० ते दि. २०/०८/२०११ अखेर पुढील मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

एक्झीक्युटीव्ह ऑफीसर, पी.डब्ल्यु.डी. संगमनेर यांचेकडून बिल्डींग रेंटचे सर्टीफीकेट मिळणेसाठी

" Schedule B " चा फॉर्म भरुन देणेसाठी त्यांनी पाठवला आहे.

मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. ११/०५/२००३ चे व दि. ०५/१०/२००३ चे ठरावाप्रमाणे प्रस्तुत मिळकत प्रसार भारतीस वांपरास दिलेली आहे. १) जागेचे मासिक भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्रानुसार घेणेचे ठरलेले आहे. २) प्रत्येक ३ वर्षाने त्यामध्ये वाढ करण्यात यावी असे उभयतांमध्ये ठरलेले आहे. त्यानुसार १) रुपये ३३२५/- ( अक्षरी रु. तीन हजार तीनशे पंचविस मात्र ) मासिक भाडे दि. २१/०८/२००३ ते २०/०८/२००६ अखेर प्रसार भारतीने संस्थानला दिलेले आहे. २) दुसऱ्या टप्प्याचे तीन वर्षाचेही दि. २१/०८/२००६ ते दि. २०/०८/२००९ पावेतोचे रु. ३३२५/- ( अक्षरी रु. तीन हजार तीनशे पंचविस मात्र ) प्रमाणे रक्कम त्यांनी जमा केलेली आहे. मात्र मा.व्यवस्थापन मंडळाचे ठरावाप्रमाणे रेट मध्ये दर ३ वर्षाने वाढ करणे आहे. संस्थानने इतर व्यवसायासाठी दिलेले जागेसाठी १०% वाढ करुन मुदतवाढ दिलेल्या आहे.याबाबतचा विचार करता खालील बार्बीवर निर्णय होणेसाठी सादर

१) सन दि. २१/०८/२००६ ते दि. २०/०८/२००९ या कालावधी साठी मुळ रेट रु. ३३२५/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजे रु. ३६५७-५० निश्चीत करुन त्याप्रमाणे फरकाची रक्कम प्रसार भारती यांचेकडून वसुल करणेस. ( प्रसार भारतीस दि. २२/०८/२००३ पासून जागा वापरांस दिलेली आहे. त्या तारखे पासून दि. २०/०८/२००९ पावेतो रक्कम रु. ३,३२५/- मासिक रेंट जमा आहे. )

२) पुढील टप्प्यासाठी दि. २१/०८/२००९ पासून पुढे रुपये ३६५७-५० मध्ये १०% वाढ करणेत येईल या अटीवर दि. २१/०८/२०१० ते २०/०८/२०११ पावेतो करार नुतनीकरणेसाठीचे मान्यतेसाठी सादर.

३) मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०५/१०/२००३ चे ठरावानुसार प्रसारभारती यांना प्रस्तुत मिळकत १५ वर्षासाठी लिज डिडवर देणेस मान्यता आहे. मात्र संस्थानच्या सन २००४ च्या अधिनियमाचे तरतुदीस आधीन राहून प्रसारभारती यांना १ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी संस्थान मिळकत लिज डिडवर देता येणार नाही. करीता यापूर्वीचा करार दि.२१/०८/२००९-२०/०८/२०१० पावेतोचा केला आहे. करीता प्रसारभारती यांना दि.२१/०८/२०१० ते दि.२०/०८/२०११ पावेतो करारनामा मुदतवाढ देणेकरीता लिज डिड करणेबाबत मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसार भारती ब्रॉडकॉस्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांचे अधिकाऱ्यांना पुढील सभेपुढे समक्ष चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.६५ स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील जागेस मुदतवाढी बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०/०१/२०१० रोजीच्या ठरावानुसार विषय नं. ९० निर्णय ९० ने " भारतीय स्टेट बँक ऑफ इंडीया यांना साईनाथ छाया इमारतीत वापरांस दिलेल्या जागेबाबत २० टक्के भाडेवाढ (म्हणजे रुपये २५०००/- अधिक रुपये ५,०००/- ) एकंदरीत रुपये ३०,०००/- मात्र लिव्ह ॲन्ड लायसन्स फी व विदयुत बील वेगळे आकारण्यात येऊन ATM संस्थान परिसराबाहेर हलविणेचे अटीवर दि.११/११/२००९ ते १०/११/२०१० या १२ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, " असे ठरले. त्यानुसार जा.क्र.एसएसएस/वशी-०२/५४५३/१०, दि.०१/०४/२०१० अन्वये बँकेचे ए.टी.एम. समाधी मंदिर परिसराबाहेर हलविणेचे अटीवर लिव्ह अँड लायसन्स तत्वावर दि.११/११/२००९ ते

दि.१०/११/२०१० अखेर १२ महिने कालावधीसाठी मासिक परवाना फी रु. ३०,०००/- (अक्षरी रु. तीस हजार मात्र) इतकी रक्कम आकारुन साईनाथ छाया इमारतीमधील पहिला मजला वापरणेस पुर्वीच्याच अटी/शर्तीवर बँकेस मुदतवाढ देणेत येत आहे. असा आदेश पारीत करण्यात आला आहे. त्यानुसार इमारतीमधील पहिला मजला स्टेट बँकेने वापरणेस घेतलेला आहे. परंतू अद्यापपावेतो त्यांनी समाधी मंदिर परिसरातील ए.टी.एम. हलविलेले नाही; करारनामा करुन दिला नाही, त्याबाबत त्यांचेकडे पाठपुरावा केलेला आहे. सदर जागेची लिव्ह अँड लायसन्स वापराची मुदत दि. १०/११/२०१० रोजी संपत आहे.

लेखाशाखेने पत्र क्र.एसएसएस/लेखा/३७७७/०९, दि.०२/०४/२००९ अन्वये मा. व्यवस्थापन समितीचे दि.६/९/२००८ रोजी झालेल्या सभेतील निर्णयास अनुसरुन बॅकेच्या ए.टी.एम.ची जागा खाली करुन घेण्याचे ठरविले आहे. तसे बँकेस लेखाशाखेमार्फत- (१) वशी-लेखा/१३२४२/२००८ दि.१०/०९/२००८ २)वशी-लेखा/१६२८८/ २००८ दि.०७/११/२००८ (३) वशी-लेखा/१७७३५/२००८ दि.०२/१२/२००८ (४)वशी-लेखा/१७६१/ २००८ दि.०९/०२/२००९ इ. पत्रान्वये वेळोवेळी कळविले आहे.

दि. १०/०१/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील ठरावास अनुसरुन इकडील विभागाचे (१) जा.क्र. ८३०५/२०१० दि. १२/०७/२०१० (२) जा.नं. ८७७३/२०१० दि. ०२/०८/२०१० व (३) जा.क्र.९०७६/१०, दि.२६/०८/२०१० रोजीचे पत्राने मंदिर परिसरातील त्यांचे ATM मंदीर परिसराचे बाहेर हलविणेबाबत कळविले आहे. परंतू अद्यापपावेतो त्यांनी ए.टी.एम. समाधी मंदिराबाहेर हलविलेले नाही. ए.टी.एम.साठी त्यांना पर्यायी जागा मिळावी, अशी त्यांची विनंती आहे.

स्टेट बँकेच्या ए.टी.एम.साठी साईनाथ छाया इमारती मध्ये स्थलांतर करावे, यासाठी लेखाशाखेमार्फत बँकेस पूर्वी सन एप्रिल २००९ मध्ये कळविणेत आले होते. परंतू स्टेट बँक ऑफ इंडियानी मध्यंतरीचे काळात ए.टी.एम. स्थलांतरीत केलेले नाही.

आता स्टेट बँकेचे दि.१७/०९/२०१० रोजीचे पत्रान्वये ए.टी.एम.साठी पर्यायी जागा साईनाथ छाया इमारतीमध्ये उपलब्ध करुन द्यावी, असे कळविले आहे. यापुर्वी लेखाशाखेच्या दि.२/४/२००९ रोजीचे पत्राने स्टेट बँक ऑफ इंडियास मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार साईनाथ छाया इमारतीतील गाळा ए.टी.एम.साठी स्थलांतरीत करणेबाबत पत्र पाठविले होते, परंतू त्यावेळी स्टेट बँकेने स्थलांतरीत केला नाही. (स्टेट बँकेचे ए.टी.एम. स्थलांतर, मुदतवाढ, मासिक परवाना फी निश्‍चिती इ. बाबतची कार्यवाही लेखाशाखेमार्फत चालू आहे. तर स्टेट बँक ऑफ इंडिया यांचा बँकेचे वापराबाबत पुढील मुदतवाढीसाठीचा प्रस्ताव आलेला असून त्यात दर तीन वर्षांनी मासिक परवाना फी मध्ये २० % वाढ देण्यास तयार आहे, त्यानुसार नोव्हेंबर २००८ नंतर नोव्हेंबर २०११ मध्ये मासिक परवाना फी मध्ये वाढ करावी लागणार आहे, विधी विभागामार्फत त्याबाबतची कार्यवाही चालू आहे.)

करीता, ०१) स्टेट बँक ऑफ इंडिया यांना त्यांचे प्रस्तावानुसार साईनाथ छाया इमारतीतील पहिला मजला लिव्ह अँड लायसन्स तत्वावर वापरणेस दि.११/११/२०१० ते दि. १०/१०/२०११ अखेर मासिक परवाना फी रक्कम रु.३०,०००/- आकारुन मुदतवाढ देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयास्तव सादर.

०२) स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे मागणीस अनुसरुन साईनाथ छाया इमारतीतील सध्या उपलब्ध असलेल्या दोन गाळ्यांपैकी एक गाळा स्टेट बँक ऑफ इंडिया यांना ए.टी.एम.साठी लिव्ह अँड लायसन्स तत्वावर देणेसाठी तसेच ९ स्क्वे.मी. जागेसाठी रु. ७,५००/- मासिक परवानामध्ये १० % वाढ म्हणजे रु. ८,२५०/- (लेखाशाखेचे हिशोबाप्रमाणे) आकारुन ए.टी.एम. हलविलेपासून ११ महिनेसाठी व अटी/ शर्तीनुसार देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.९१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे अधिकाऱ्यांना पुढील सभेपुढे समक्ष चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.६६** **श्री मधुकर पंढरीनाथ बारसे, मदतनीस (सध्या निलंबीत) यांना पुर्ववत कामावर हजर करुन घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे, मदतनीस, (सध्या निलंबीत) हे दि.१४-०६-१९९१ पासून वर्ग ४ कर्मचारी म्हणून संस्थान सेवेत आहेत. त्यांना पुर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरून गैरहजर राहणे, अचानक रजेची मागणी करणे, मद्यपान करून संस्थानचे स्वागत कक्षातील स्त्री कंत्राटी कामगार यांना उध्दट भाषा वापरून, शिवीगाळ करणे, तेथील फोन हिसकावून अपशब्द वापरणे, धमकी देणे. या गैरशिस्त वर्तनाबाबत दि.१२-११-२००५ रोजी आरोपपत्र देवून, त्यांची खाते चौकशी करणेत आली. तत्पुर्वी सदर आरोपपत्रातील आरोपांचे खाते चौकशीकामी श्री.बारसे यांना दि.२८-०९-२००५ रोजीचे आदेशान्वये संस्थान सेवेतुन तात्पुरते सेवा निलंबीत करणेत आलेले आहे. खातेचौकशीमध्ये श्री.बारसे यांचे विरूध्द ठेवणेत आलेले आरोप अंशतः सिध्द झाल्याचा व त्यात श्री.बारसे हे अंशतः दोषी

असल्याचा दि.३१-०१-२००७ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव, खातेचौकशी अधिकारी यांनी संस्थानला सादर केला.

नियमाप्रमाणे सदर खातेचौकशी निष्कर्ष अहवालाची छायांकीत प्रत श्री.बारसे यांना पाठविणेत येवून, "त्यांचे विरूध्द ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोपांचे गांभीर्य पाहता, त्यांना संस्थानचे सेवेतुन कमी (टर्मिनेट) का करणेत येवू नये? याबाबतचा लेखी खुलासा ही नोटीस मिळालेपासून सात दिवसांचे आंत व्यवस्थापनाकडे सादर करावा. अन्यथा एकतर्फा निर्णय घेतला जाईल." असे दि.२३-०५-२००७ रोजीचे सेकंड शोकॉज नोटीस अन्वये श्री.बारसे यांना लेखी कळविणेत आले होते. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचा दि.०९-०६-२००७ रोजीचा लेखी खुलासा सादर केला होता.

त्यानंतर श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे, मदतनीस, श्री साईप्रसाद निवासस्थान विभाग (सध्या निलंबीत) यांनी संस्थान विरूध्द मा. कामगार न्यायालय, अहमदनगर येथे तक्रार (यु.एल.पी.) क्र.१६/२००७ दाखल केली आहे. त्यात त्यांनी " दि.२३-०५-२००७ रोजीचे तक्रारदाराचा बडतर्फी विषयक आदेश सुनावणीच्या काळात स्थगीत ठेवण्यात यावा. तक्रारदाराचे निलंबन स्थगीत केल्याविषयी आदेश व्हावेत. दि.२३-०५-२००७ च्या आदेशान्वये तक्रारदारास बडतर्फ करणे विषयी सुरू केलेली कारवाई आदेश बेकायदेशीर/अयोग्य व नैसर्गिक न्यायाविरूध्द असल्याचे जाहिर करून, तसे आदेश जाब देणार संस्थान यांना व्हावेत. तक्रारदाराचे निलंबन कालावधीतील पुर्ण वेतन देण्याचे आदेश व्हावेत." अशी मागणी केलेली आहे.

मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी श्री.बारसे यांची तक्रार (यु.एल.पी.) क्र.१६/२००७ मधील निशाणी यु-२ चे मनाई हुकूम मिळणेसंदर्भातील अर्जाबाबत दि.३१-०७-२००९ रोजी " अर्जदार श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे यांची चौकशी कायदेशीर व नैसगिक न्यायानुसार झालेली असल्याचा " अंतरिम आदेश देवून, सदर निशाणी यु-२ चा मनाई हुकूम मिळणेसंदर्भातील अर्ज नामंजूर करून, निकाली काढलेला आहे.

त्यापुढे मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांचा दि.३१-०७-२००९ रोजीचा अंतरिम आदेश बेकायदेशीर ठरवून व रद्द करून मिळावा यासाठी श्री.बारसे यांनी संस्थान विरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे रिव्हीजन (यु.एल.पी.)क्र.४२/२००९ दाखल केले आहे. अशाप्रकारे श्री.बारसे यांनी संस्थान विरूध्द मा.कामगार न्यायालय,अहमदनगर येथे दाखल केलेली तक्रार (यु.एल.पी.) क्र.१६/२००७ व मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे दाखल केलेले रिव्हीजन (यु.एल.पी.)क्र.४२/२००९ हया दोनही कोर्ट केसेस सध्या संबंधीत न्यायालयात न्यायप्रविष्ठ असून, प्रलंबीत आहेत. तसेच श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे हे देखील सदर कोर्ट केसेस न्यायप्रविष्ठ असल्यामुळे संस्थान सेवेतून दि.२८-०९-२००५ पासून ते अद्यापपर्यंत तात्पुरते सेवा निलंबीत आहेत. त्यामुळे त्यांना संस्थानकडून नियमानुसार १००% निर्वाह भत्ता (गुजराण भत्ता) देण्यात येत आहे. असे असतांना श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे यांनी तात्पुरते निलंबन आदेश रद्द करून नोकरीवर (कामावर) हजर करून घेणेबाबत दि.१५-०१-२००९ रोजीचा अर्ज सादर केलेला होता. त्यात त्यांनी " मी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी येथे दि.१५-०४-१९९१ पासून म्हणजे १९ वर्षापासून कायम कर्मचारी म्हणून प्रामाणिकपणे नोकरी केलेली आहे. दोन वर्षापूर्वी माझी घरगुती कारणास्तव मनस्थिती व्यवस्थीत नसल्याने नकळत माझ्या हातुन काही चुका घडल्या. त्यामुळे मला संस्थानने निलंबीत केले व खाते निहाय चौकशी करून बडतर्फीची कारवाई का करू नये? अशी नोटीस आल्याने मला नाईलाजास्तव मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे जावे लागले.

तरी मला झालेली ही शिक्षा भरपूर झाली असून, मला आपण क्षमा करावी. यापुढे माझेकडून संस्थान आस्थापनेचा कोणताही भंग होणार नाही. तसेच कोणतेही गैरवर्तन होणार नाही याची मी लेखी हमी देतो. तसेच मला तीन-चार दिवसांची शिक्षा देवून कामावर घेतल्यास मी न्यायालयीन केसेस काढून माघार घेतो. तरी आपण मला एक वेळेस दया करून, कमीत कमी शिक्षा देवून, मला पुर्ववत कामावर घेणेस नम्रपणे विनंती करतो." असे म्हटलेले आहे.

सदर प्रकरणाबाबत संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील,ॲडव्होकेट, अहमदनगर यांनी दि.०९-०३-२००९ रोजी Perused the Office note.Punishment of ४ Days suspension can be awarded as per model standing order. Hence, he be directed to withdraw complaint. I shall draft mou and shall be kept ready to withdraw complaint. असा कायदेशीर अभिप्राय दिलेला होता.

म्हणून श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे, मदतनीस, श्री साई प्रसाद निवासस्थान विभाग यांचे तात्पुरते सेवा निलंबन आदेश रद्द करून, त्यांचे कोर्ट केसेसबाबत तडजोड करून, त्यांना गैरशिस्त वर्तनाबाबत संस्थान सेवेतून कायमस्वरूपी बडतर्फ अथवा टर्मिनेट करणेऐवजी सौम्य शिक्षा म्हणून संस्थान सेवेतून चार दिवस तात्पुरते सेवा निलंबीत करून, त्यांना कामावर पुर्ववत रूजू/हजर करून घेणेबाबत प्रस्ताव निर्णयासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१-०६-२००९ रोजीचे सभेमध्ये सादर

करणेत आला होता. त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१-०६-२००९ रोजीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय क्र.५४५ अन्वये सदर प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे.

त्यानंतर मा.उपाध्यक्ष साो.यांचेकडील दि.०२-०२-२०१० व दि.१६-०६-२०१० रोजीचे शिफारस पत्र प्राप्त झालेले असून, त्यात " श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे, रा.येसगांव, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर संस्थानचे कायम कर्मचारी यांनी पुर्ववत कामावर घ्यावे यासाठी विनंती केली आहे. श्री.मधुकर बारसे हे माझे चांगले माहिती परिचयाचे असून, ते आपले संस्थानमध्ये कायम कर्मचारी म्हणून १९ वर्षापासून काम करीत होते. परंतू मध्यंतरी कौटंबीक अडचणीमुळे त्यांचे मानसिक संतुलन बिघडल्यामुळे काम करीत असतांना चुका झाल्या आहेत. त्यामुळे त्यांना गेल्या चार वर्षापासून कामावरून कमी केलेले आहे. वास्तविक त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे त्यांना नोकरीची खास गरज आहे. त्यांना उपजिविकेसाठी अन्य कोणतेही साधन नाही. तसेच त्यांनी त्यांचेकडून झालेल्या चुकांबद्दल क्षमा मागितलेली असून, त्यांनी कोर्टात दाखल केलेली केस ते मागे घेणार आहेत. तेव्हा आपण त्यांचे आर्थिक परिस्थितीबाबत खास सहानुभूती दाखवावी व त्यांना आपले संस्थानच्या नोकरीत नियमानुसार पुर्ववत कामावर घेण्यासाठी शिफारस आहे." असे म्हटलेले आहे.

तसेच अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी निलंबीत कर्मचारी श्री.मधुकर बारसे यांना कामावर घेणेबाबत दि.१२-०४-२०१० रोजीचे पत्र सादर केले आहे. त्यात त्यांनी " संस्थानमधील कायम कर्मचारी श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे, मदतनीस, श्री साईप्रसाद निवासस्थान विभाग (तात्पुरते निलंबीत) हे संस्थान सेवेत १९ ते २० वर्षापासून असून, त्यांचेकडून संस्थान सेवेत असतांना कौटुंबीक अडचणीमुळे त्यांचे मानसिक संतुलन बिघडल्याने ते कामावर असतांना काही प्रमाणात चुका झाल्यामुळे त्यांना तात्पुरते निलंबीत करून, किरकोळ दोषी ठरविले आहे. श्री.बारसे यांनी संस्थानचे कोणतेही आर्थिक नुकसान व संस्थान स्थावर मालमत्तेचे नुकसान केलेले नसून, व संस्थानमध्ये कोणत्याही प्रकारचा आर्थिक गैरव्यवहार केलेला नाही. श्री.मधुकर बारसे यांनी चुकांबद्दल क्षमा मागितलेली असून, त्यांनी कोर्टात दाखल केलेली केस ते मागे घेण्यास तयार आहेत. तसेच त्यांना कामावर घेणेबाबत वरील संदर्भीय पत्रान्वये माजी आमदार श्री.शंकररावजी कोल्हे साो., उपाध्यक्ष यांनी कामावर घेणेबाबत शिफारस केली आहे. श्री.बारसे यांचेवर जो काही दोष ठेवला आहे तो किरकोळ स्वरूपाचा असल्याने त्यांना पुर्ववत संस्थान सेवेत, तात्पुरते निलंबन मागे घेऊन कामावर घेणेस विनंती करतो. श्री.बारसे यांची आर्थिक परिस्थीती नाजूक असून त्यांना कामाची फार गरज आहे. तरी त्यांना कामावर घेणेबाबत आदेश होणेस विनंती." असे म्हटलेले आहे.

तरी, मा.उपाध्यक्ष साो. यांचेकडील शिफारस पत्र व श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना यांचेकडील दि.१२-०४-२०१० रोजीचे पत्र, तसेच ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचे सल्ल्याप्रमाणे श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे यांना तक्रार (यु.एल.पी.) क्र.१६/२००७ व रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.४२/२००९ या दोन्हीही कोर्टकेस संबंधीत न्यायालयातून काढून घेणेचे अटीवर त्यांचे तात्पुरते निलंबन रद्द करून, त्यांना गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षा म्हणून संस्थान सेवेतुन चार दिवस तात्पुरते सेवा निलंबीत करून, श्री.बारसे यांना पूर्ववत कामावर हजर/रुजु करुन घ्यावयाचे किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उपाध्यक्ष साो. यांचेकडील शिफारस पत्र व श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना यांचेकडील दि.१२-०४-२०१० रोजीचे पत्र, तसेच ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचे सल्ल्याप्रमाणे श्री.मधुकर पंढरीनाथ बारसे यांना तक्रार (यु.एल.पी.) क्र.१६/२००७ व रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.४२/२००९ या दोन्हीही कोर्टकेस संबंधीत न्यायालयातून काढून घेणेचे अटीवर, त्यांचे तात्पुरते निलंबन रद्द करून, त्यांना गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षा म्हणून संस्थान सेवेतुन चार दिवस तात्पुरते सेवा निलंबीत करण्यात यावे. तसेच श्री.बारसे यांना कागदपत्रांची पुर्तता करुन वरील दोन्ही कोर्ट केसेस विनाअट संबंधित न्यायालयातून काढून घेतलेनंतर त्यांना पूर्ववत कामावर हजर/रुजु करुन घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.६७** **भक्तनिवासस्थान ते आय.टी.आय. वर्कशॉप पर्यंतची ५० पेअरची दुरध्वनी केबल खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.९१५** **सदरहू विषय मागे घेण्यात आला.** (कार्यवाही- आय.टी. विभागप्रमुख)

---

**विषय नं.६८** **H.P. कंपनीस Brahma Device ला टाटा कम्यूनिकेशन्स यांचेमार्फत लाईव्ह दर्शन सिग्नल पुरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** टाटा कम्युनिकेशन्स लि., मुंबई यांचेमार्फत श्रींचे Live Darshan सुविधा सुरु करणेत आलेली आहे. यासाठी त्यांना संस्थानमार्फत सिग्नल पुरविण्यात आलेले आहे. त्यासाठी टाटा कम्युनिकेशन्स यांचेकडून

रक्कम रुपये १.२५ कोटी रॉयल्टी घेणेत येत आहे. एचपी कंपनीच्या Brahma Device वर Live Darshan सुविधा सुरू करणेसाठी टाटा कम्युनिकेशन्स मार्फत सिग्नल मिळणेसाठी दिनांक ०५/१०/२०१० चे पत्राने विनंती केलेली आहे. त्यासाठी एचपी कंपनी रक्कम रुपये ५ लाख देणगी देणेस तयार आहे.

यापुर्वी एचपी कंपनीला सदर Live Darshan चे प्रायोगिक तत्वावर सिग्नल मिळावे व त्या बदल्यात संस्थानला रुपये एक लाख देणगी देणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०९/२००९ रोजीचे सभेत सादर केला असता सदर प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे.

एचपी कंपनीचे Brahma नावाचे Device बाजारात येणार असून त्यावर श्रींचे Live Darshan ची सुविधा देणेचा फेर प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचे सुविधेपोटी ते संस्थानला प्रति वर्षी रक्कम रुपये ५,००,०००/- देणगी स्वरुपात देणेस तयार आहेत.

उपरोक्तप्रमाणे, एचपी कंपनीला टाटा कम्युनिकेशन्स लि., मुंबई यांचेमार्फत लाईव्ह सिग्नलचा डेमो व निर्णयार्थ सविनय सादर.

आजचे सभेत टाटा कम्युनिकेशन्स लि., मुंबई यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी एचपी कंपनीला टाटा कम्युनिकेशन्स लि., मुंबई यांचेमार्फत लाईव्ह सिग्नलचा डेमोबाबत सविस्तर माहिती सभेस दिली.

**निर्णय क्र.९१६ यावर सविस्तर चर्चा होऊन, एचपी कंपनीला टाटा कम्युनिकेशन्स लि., मुंबई यांचेमार्फत लाईव्ह सिग्नल तीन महिने कालावधीसाठी विना मोबदला ट्रायल बेसीसवर देण्यात यावे, सदर सिग्नलचा किती लोक वापर करतात, याची तपासणी करुन रक्कम ठरविणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- आय.टी. विभागप्रमुख)

---

**विषय नं.६९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे मान्यवरांना श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका २०११ विनामुल्य भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ कलम नं.१७ (ठ) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

**१७ (ठ) समितीचे कर्तव्ये व अधिकारी**

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या विहत व त्यांची शिकवण या बाबतच्या माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहीत्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील "

श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार म्हणून इतर प्रकाशना खेरीज दर वर्षी संस्थान मार्फत साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशीत केली जाते.

दरवर्षी हिवाळी नागपूर अधिवेशनात विधिमंडळ सदस्यांना,व्हीआयपी, व्हीव्हीआयपी संस्थान कामा संदर्भातील विविध शासकीय कार्यालयातील अधिकारी वगैरेना तसेच मा. अध्यक्ष महोदय, मा. उपाध्यक्ष महोदय, मा विश्वस्त, मा. कार्यकारी अधिकारी , मा.उपकार्यकारी अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत संस्थानच्या वतीने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका विनामूल्य भेट म्हणून दिल्या जातात व त्याची रक्कम संभावना खाते खर्ची टाकली जाते.

सन.२०११ च्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका संस्थानतर्फे विनामूल्य भेट देणेकामी संबंधीतांना देणेस खालील प्रमाणे मान्यता असावी.

| अ.नं. | तपशील | दैनंदिनी प्रती किंमत रु.५५/- | दिनदर्शीका १ पानी प्रती किंमत रु.५/- | श्री साई दिनदर्शीका १ पानी मोठी प्रती किंमत रु.१०/- |
|---|---|---|---|---|
| ०१ | मा.विधिमंडळ सदस्य | ५०० | ५०० | - |
| ०२ | मा. अध्यक्ष महोदय | १०० | १०० | १०० |
| ०३ | मा. उपाध्यक्ष महोदय | १०० | १०० | १०० |
| ०४ | मा. सदस्य ( १०० प्रमाणे) | १४०० | १४०० | १४०० |
| ०५ | मा. कार्यकारी अधिकारी | १०० | १०० | १०० |
| ०६ | मा.उपकार्यकारी अधिकारी | १०० | १०० | १०० |
| ०७ | प्रशासकीय अधिकारी ४ (प्रत्येकी २५ प्रमाणे) | १०० | १०० | १०० |
| ०८ | पत्रकार | २५० | - | - |
| ०९ | विविध विभाग प्रमुख यांचे मागणीप्रमाणे | ८९० | ६४८ | - |

उपरोक्त प्रमाणे श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका विनामुल्य भेट देणेस मान्यता असावी .

**निर्णय क्र.९१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- प्रकाशने विभाग प्रमुख)

---

**विषय नं.७०** **श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल विद्यार्थ्यांची राज्यस्तरिय व राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा करिता निवड झाल्याबाबत अभिनंदन.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयमचा विद्यार्थी प्रितम किसनसिंह डुमाले (इ.८ वी ) १४ वर्ष वयोगट मुले याची महाराष्ट्र संघात (राष्ट्रीय स्पर्धेकरिता) अखिल भारतीय शालेय व्हॉलीबॉल संघात निवड झाली. सदर बाब साईबाबा संस्थान व इंग्लिश मिडीयम स्कुलकरिता निश्चितच अभिमानास्पद आहे. हा खेळाडू म्हैसुर (कर्नाटक) येथे संपन्न होणाऱ्या अखिल भारतीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धाकरिता महाराष्ट्र संघाचे व साईबाबा संस्थानचे प्रतिनिधित्व करणार आहे. तसेच उपरोक्त खेळाडूला महाराष्ट्र शासनाची रु.३०००/- मात्र शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे.

शैक्षणिक वर्ष जुन २०१० पासुन श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलने क्रीडा क्षेत्रात (व्हॉलीबॉल, तलवारबाजी, बुध्दीबळ ) दैदिप्यमान कामगिरी बजावलेली असुन पुणे विभागीय पातळीवर ४५ खेळाडू, राज्यपातळीवर २० खेळाडू व अखिल भारतीय शालेय स्पर्धेकरिता १ खेळाडूची निवड झालेली आहे.या सर्व खेळाडूंना क्रीडा प्रशिक्षक श्री राजेंद्र कोहोकडे यांचे मार्गदर्शन लाभले. अहमदनगर जिल्हयाच्या व महाराष्ट्राच्या शालेय क्रीडा स्पर्धेत शाळेने नेत्रदिपक यश संपादन केलेले आहे.

**निर्णय क्र.९१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.७१** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम करीता गोदरेज कंपनीचे टेबल खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ज्यु.केजी ते इयत्ता १० वी पर्यतचे वर्ग असुन, १५५८ इतकी विद्यार्थी संख्या आहे. व एकुण ३० वर्ग तुकडया आहेत. वर्गात वर्गशिक्षकांना खडु बॉक्स, डस्टर, पेपर बंडल, रिझल्ट शिट इ. वस्तु ठेवणेकामी प्रत्येक शिक्षकांस स्वतंत्र टेबल आवश्यक आहे. जेणेकरुन ते आपल्या वस्तु व्यवस्थित टेबलच्या लॉकर मध्ये ठेवु शकतील. शाळेकडे डेडस्टॉकवर ड्रॉव्हर असलेले २५ टेबल असुन, त्यापैंकी ३ टेबल निकामी झालेले असुन, ते टेबल आपण डेडस्टॉकवरुन कमी करणार आहोत. तरी सध्या खरेदी विभागाकडुन सोबत दिलेल्या आकृतीनुसार ४ x २ सिंगल ड्रॉव्हर असलेले १० टेबल खरेदी करता येतील. अंदाजे एक टेबलची किंमत रु.६,६०० /- मात्र आहे, त्यानुसार १० टेबलसाठी रु.६६,००० /- इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलकरीता १० टेबल खरेदी विभागामार्फत कोटेशन्स मागवून खरेदी करता येईल.

**निर्णय क्र.९१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलकरीता आवश्यक असणारे १० टेबल कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.६६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल/ अधिक्षक, खरेदी)

---

**विषय नं.७२** **कन्या विद्या मंदिरासाठी झेरॉक्स मशिन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था संचलित श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयात इयत्ता ५ वी ते इ.१०वी पर्यंतचे वर्ग असून, प्रत्येकी दोन वर्ग तुकडयांमधून एकूण ६६५ विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत.

या विद्यालयाच्या शैक्षणिक वर्षात शालेय अंतर्गत परीक्षा वर्षभरात प्रथम सत्रात एक चाचणी परीक्षा व एस सत्र परीक्षा तसेच द्वितीय सत्रात एक चाचणी परीक्षा व एक सत्र परीक्षा अशा एकंदर चार परीक्षांचे नियोजन असते. या सर्व परीक्षांकरीता आत्तापर्यंत माध्यमिक शिक्षण सेवा केंद्र, कोल्हापूर यांचेकडून प्रश्नपत्रिका मागविल्या जात होत्या.

परंतु सन २०१० मध्ये शासनाच्या नविन शैक्षणिक धोरणानुसार आता शालेय अंतर्गत परीक्षांकामी प्रश्नपत्रिका बाहेरच्या संस्थेकडून न मागविता प्रत्येक विषय शिक्षकाने त्या स्वतः तयार करावयाच्या आहेत.

सध्या इंग्लिश मिडीयम स्कूलकडील झेरॉक्स मशिनवर प्रश्नपत्रिका झेरॉक्स काढण्यात येतात. परंतु त्या मशिनवर इं.मिडी.स्कूल, कन्या विद्या मंदिर व औ.प्र.संस्था अशा तीनही संस्थांचे कार्यालयीन कागदपत्रे तसेच परीक्षा संबंधित सर्व कागदपत्रे झेरॉक्स काढल्याने एकाच मशिनवर ताण येतो.

शासनाच्या नविन शैक्षणिक धोरणानुसार परीक्षाविषयक व कार्यालयीन कामकाजाकरीता एक स्वतंत्र व अद्ययावत झेरॉक्स मशिनची आवश्यकता आहे. नविन झेरॉक्स मशिन खरेदीकामी अंदाजे खर्च रुपये १,२५,०००/- (अंदाजे अक्षरी रुपये एक लक्ष पंचवीस हजार) मात्र पर्यंत अपेक्षित आहे.

**निर्णय क्र.९२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

(कार्यवाही- प्राचार्या, कन्या विद्या मंदीर)

---

**विषय नं.७३** **मा.सुप्रिम कोर्टातील स्पेशल लिव्ह पिटीशन (सिव्हील) नं. २७९८८/ २०१० सय्यद रतनभाई सय्यद वारस व इतर विरुध्द तहसिलदार, राहाता.**

**प्रस्ताव-** संस्थानचे मंदिर परिसराचे दक्षिणेकडील शिर्डी मोफत सर्व्हे नं. १ पैकी ३० गुंठे जागेबाबत सदर जागेवरील दुकानदार व संस्थान यांचे विरुध्द खालील रिट पिटीशन दाखल केले होते.

१) रिट पिटीशन नं. १७०४/२००९, चांदमल गोपालदास लोकचंदानी विरुध्द महाराष्ट्र शासन.

२) रिट पिटीशन नं. १७०५/२००९, सय्यद रतनभाई सय्यद विरुध्द महाराष्ट्र शासन.

३) रिट पिटीशन नं. २९५२/२००९, गंगाधर काशीनाथ तुरकणे विरुध्द महाराष्ट्र शासन.

४) रिट पिटीशन नं. ५४५१/२००९, सोमनाथ गणपत कोळपकर विरुध्द महाराष्ट्र शासन.

सदर रिट पिटीशनचा निकाल मा.उच्च न्यायालय मुंबई , खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर दि.०५/०७/२०१० रोजी झाला असून सदर निकालाचे नाराजीने दुकानदारांच्या वतीने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे खालील लेटर पेटंट्स अपिल महाराष्ट्र शासन व संस्थानच्या विरुध्द दाखल करण्यात आले.

१) लेटर पेटंट अपिल नं. २२९/२०१०, चांदमल गोपालदास लोकचंदानी विरुध्द महाराष्ट्र शासन.

२) लेटर पेटंट अपिल नं. २३२/२०१०, सय्यद रतनभाई सय्यद विरुध्द महाराष्ट्र शासन.

३) लेटर पेटंट अपिल नं. २२७/२०१०, गंगाधर काशीनाथ तुरकणे विरुध्द महाराष्ट्र शासन.

४) लेटर पेटंट अपिल नं. २३१/२०१०, सोमनाथ गणपत कोळपकर विरुध्द महाराष्ट्र शासन.

मात्र सदर ४ लेटर पेटंट अपिलचा निकाल दि. १५/०९/२०१० रोजी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दिला, त्यामध्ये प्रस्तुतचे लेटर पेटंट अपिल फेटाळण्यात आले. त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे सैय्यद रतनभाई सैय्यद व इतर, विरुध्द तहसीलदार, राहाता, व संस्थान यांचे विरोधात स्पेशल लिव्ह पिटीशन सिव्हिल नं. २७९८८/२०१० अंतरिम आदेश प्राप्तीचे अर्जासह प्रकरण दुकानदारांनी दाखल केलेले आहे. सदर प्रकरणामध्ये संस्थानने जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/९४५६/१०, दि.१७/०९/२०१० चे पत्राने श्री संजय खर्डे अॅडव्होकेट, सुप्रिम कोर्ट यांचेकडे संस्थानचेवतीने काम पहाणेसाठी वकीलपत्र व इतर कागदपत्र पुढील यथायोग्य कार्यवाहीसाठी सादर केले आहे.

तसेच दिल्ली येथे मा. उपकार्यकारी अधिकारी सो. श्री मानेसो. यांनी समक्ष जाऊन प्रकरणांची माहीती वकीलांस दिलेली आहे. दि. ०१/१०/२०१० रोजीची तारीख मा.कोर्टात हजर केलेली आहे. सदर तारखेस संस्थानतर्फे अॅड.संजय खर्डे, अॅड.शेखर नपाडे, अॅड.अरविंद व्ही सावंत, अॅड.अरुण पेंडणेकर इ. वकीलांनी संस्थानचेवतीने काम पाहिले होते व Status Quo ऑर्डर मा.कोर्टाने दिलेली आहे.

श्री संजय खर्डे अॅडव्होकेट यांचेशी दुरध्वनीवर प्रकरणी मा.उपकार्यकारी अधिकारी यांचेशी झालेले चर्चेस अनुसरुन दि.१६/१०/२०१० रोजी दिल्ली येथे संस्थान प्रतिनिधीने श्री खर्डे अॅडव्होकेट यांची दि. १६/१०/२०१० रोजी भेट घेतली. त्याचदिवशी श्री पेडणेकर अॅडव्होकेट यांचेशी श्री खर्डे अॅडव्होकेट यांनी विचार विनिमय बैठक चर्चा बैठक घेतली. सर्व्हे नं.०१ मधील ५६ दुकानदारांबाबतचा निर्णय यापूर्वीच मा.कोर्टाने दिलेला आहे.

त्यामुळे त्यांचेबाबतीत मुद्दा उपस्थित होणार नाही. ४५ दुकानदारांचेबाबत पर्यायी जागा देता येणार नाही, कारण जागा उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे संस्थान सन २००८ पावेतो compromise decree Execute व्हावी अशाच मताचे होते. परंतू प्रस्तुत ठिकाणी बांधकामच होऊ शकत नाही. त्यामुळे decree Execute होऊ शकत नाही. संस्थानचा decree Execute होणेबाबत स्वच्छ हेतू असतांनाही बांधकाम होऊ शकत नाही, करीता decree Execute होत नाही, अशा अर्थाची बाजू संस्थानतर्फे मांडता येईल, अशी चर्चा झाली. त्यानंतर श्री बोबडे, अॅडव्होकेट सिनिअर कॉन्सील यांचेशी बैठक श्री संजय खर्डे, अॅडव्होकेट यांनी आयोजित करुन चर्चा झाली. नगरपंचायतीचे मुळतः प्रस्तुत सुलेनाम्यामध्ये पक्षकार नाही. सरकारने डेव्हलपमेंट प्लॅन तयार केलेला आहे, करीता सर्व्हे नं. १ मध्ये बगीचा आरक्षण टाकतांना त्यावेळेला सरकारकडून विचार होणे आवश्यक होते, असा प्रश्न कदाचित मा.कोर्ट उपस्थित करील अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली. संस्थानकडे नगरपंचायतीकडे दुकानदारांना देणेसाठी जागा उपलब्ध नाही. तसेच संबंधीत दुकानदारांची जागा घेतलेस त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन जाणार नाही. कारण त्यांची परिस्थिती चांगली आहे, अशी माहिती त्यांना देणेत आली. दि. १७/१०/२०१० रोजी श्री सावंतसो. यांची भेट श्री खर्डे सो., पेंडणेकर सो. यांनी घेतली. विकास आराखड्यात दर्शविलेले त्रिकोण जागेचे नकाशा, आरक्षण यासह प्रकरणी चर्चा झाली. प्रस्तुतची जागा बगीचासाठी आरक्षित आहे. या बाबीपेक्षा जागा रस्त्यामुळे बाधीत होते. त्यामुळे त्याठिकाणी बांधकाम होऊ शकत नाही. यावर जास्त consentration देता येईल, असे त्यांनी सुचित केले. केसबाबत श्री खर्डेसो. व पेडणेकरसो. यांनी श्री सावंत अॅडव्होकेट व श्री बोबडे अॅडव्होकेट यांचेबरोबर चर्चा केली आहे.

त्यानंतर दि. १८/१०/२०१० रोजी कोर्ट नं. ०३, ॲटम नं.३० मध्ये सदर प्रकरणी सुनावणी झ ाालेली आहे. मा.सर्वोच्च न्यायालय श्री.आर.व्ही. रविंद्रन व मा.ना.एच.एल. गोखले यांचेसमोर दि.१८/१०/२०१० रोजी प्रस्तुतचे केसची सुनावणी अ.क्र.३० वर झाली. अ.क्र. १ ते २९ अन्य लोकांचे केसेस पेक्षा आपले प्रकरणांची / केसची सुनावणी जास्त वेळ झाली. दुकानदारांना जागेची पर्यायी व्यवस्था करता येईल किंवा काय ? याबाबत तसेच केसेसमधील इतर मुद्यावर सुनावणी झाली. ॲड.श्री अरविंद सावंत व ॲड.श्री अरविंद बोबडे या सिनियर वकिलांनी पर्यायी जागा उपलब्ध नाही. अन्य जागेवरील दुकानदारांना देखील जागा उपलब्ध नाही, असा युक्तीवाद केला आहे. तसेच संस्थानने संबंधीत दुकानदारांसाठी नुकसान भरपाई रक्कम रु. २ कोटी १९ लाख मात्र मा.कोर्टात जमा केले आहेत. अशा अर्थाचे युक्तीवाद केला. मात्र अशी पर्यायी जागा उपलब्ध होत असेल तर त्याबाबत विचार विनिमय व्हावा, असे मा.सुप्रिम कोर्टाने सुनावणीचेवेळी म्हटलेले आहे. मा.सुप्रीम कोर्ट मा.जस्टिस श्री.आर.व्ही.रविंद्रन व मा.जस्टिस श्री.एच.एल. गोखले यांनी दि.१८/१०/२०१० रोजी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

" Learned senior counsel for the Sansthan submitted that a sum of rupees two crores nineteen lakhs has been deposited by the Sansthan in terms of the order of the lear ned single Judge which has been affirmed by the appellate Bench of the High Court. "

"The matter is adjourned by four weeks to enable the Sansthan and the State Government to explore the possibility of identifying a suitable altertive plot even away from the existing plot , for the purpose of construction of shops for petitioners, without prejudice to their contentions. "

"Interim protection to continue till the next date of hearing. "

प्रकरणी चार आठवड्याची मुदत देण्यात आलेली आहे.

तसेच दुकानदारांचे हॉटेल मिळकती आहेत त्याची माहीती उपलब्ध आहेच, आणखी कांही माहीती सर्वोच्च न्यायालयात दाखवता येईल.

ॲड.श्री. संजय खर्डे यांचेमार्फत उपरोक्त केसबाबत कामकाजाची खालीलप्रमाणे बिले दि.०८/१०/२०१० चे व दि.१८/१०/२०१० चे पत्रा सोबत सादर केलेली आहेत.

| अ.नं. | वकीलाचे नांव | तपशील | फी रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | ॲड.श्री.अरुण आर पेडणेकर, दि.०८/१०/२०१० रोजीचे बील | स्पे.लि.पे.(सि.) नं. २७९८८/२०१० - सैय्यद रतनभाई सैय्यद व इतर विरुध्द तहसिलदार रहाता व इतर यावर दि.०१/१०/२०१० रोजी मा. न्यायाधीश आर.व्ही.रविंद्रन व मा. न्यायाधीश एच.एल.गोखले, सुप्रीम कोर्ट यांचेसमोर सुनावणी | रु. २५,०००/- |
| ०२. | ॲड.श्री. अरविंद व्हि.सावंत, दि.०१/१०/२०१० रोजीचे बील | स्पे.लि.पे.(सि.) नं. २७९८८/२०१० - सैय्यद रतनभाई सैय्यद व इतर विरुध्द तहसिलदार रहाता व इतर यावर दि.०१/१०/२०१० रोजी मा. न्यायाधीश आर.व्ही.रविंद्रन व मा. न्यायाधीश एच.एल.गोखले, सुप्रीम कोर्ट यांचेसमोर सुनावणी | रु. १,००,०००/- + १० % रु. १०,०००/- लिपीक चार्ज रु. ०१,१०,०००.०० |
| | | **एकूण रक्कम रुपये** | **रु. ०१,३५,०००/-** |
| ०३. | ॲड.श्री.विनोद ए बोबडे, बील नं.२७०२ अे, दि.१८/१०/२०१० रोजीचे बील | स्पे.लि.पे.(सि.) नं. २७९८८/२०१० - सैय्यद रतनभाई सैय्यद व इतर विरुध्द तहसिलदार रहाता व इतर यावर दि.१८/१०/२०१० रोजी मा. न्यायाधीश आर.व्ही.रविंद्रन व मा. न्यायाधीश एच.एल.गोखले, सुप्रीम कोर्ट यांचेसमोर सुनावणी | रु. २,००,०००/- |
| ०४. | ॲड.श्री. अरविंद व्हि.सावंत, दि.१८/१०/२०१० रोजीचे बील | स्पे.लि.पे.(सि.) नं. २७९८८/२०१० - सैय्यद रतनभाई सैय्यद व इतर विरुध्द तहसिलदार रहाता व इतर स्पे.लि.पे.(सि.) नं. २९६८३-८५/२०१० यावर ०१) दि.१७/१०/२०१० रोजी श्री. संजय खर्डे व श्री अरुण पेडणेकर, ॲडव्होकेटस् सुप्रिम कोर्ट यांचे समवेत सभा. ०२) दि.१८/१०/२०१० रोजी मा. न्यायाधीश आर.व्ही.रविंद्रन व मा. न्यायाधीश एच.एल. गोखले, सुप्रीम कोर्ट यांचेसमोर सुनावणी | रु. ५०,०००/- रु. १,००,०००/- + १० % रु. १५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | लिपीक चार्ज<br>रु. १,६५,०००/- |
| | | **एकूण रक्कम रुपये** | **रु. ३,६५,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे रक्कमेचे वकील फी बिल ॲड.संजय खर्डे यांचे पत्रासमवेत सर्वोच्च न्यायालयातील ॲड.अरुण पेडणेकर, श्री अरविंद व्ही सावंत व श्री व्ही.ए.बोबडे यांनी कळविले आहे. तरी त्याप्रमाणे रक्कम संबंधीत ॲडव्होकेट यांना अदा करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२१ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ॲडव्होकेट फी आदा करणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.७४ श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१० अंदाजपत्रक व झालेल्या प्रत्यक्ष खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयास अनुसरुन दि.२२/०५/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळेचा विषय नं.१८, व निर्णय क्र.५१४ अन्वये श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१० साठी एकूण खर्च रु. ३९,३०,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला होता. प्रत्यक्षात मात्र अंदाजीत खर्चापेक्षा एकूण कमी खर्च झालेला आहे. परंतू काही बाबीवर अंदाजत्रकापेक्षा जास्त खर्च झालेला आहे. तपशिलवार माहिति खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | मान्य केलेली अंदाजपत्रकीय रक्कम | प्रत्यक्षात झालेला खर्च | तरतुदी पेक्षा कमी झालेला खर्च | तरतुदी पेक्षा जादा झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | मंडप, कमानी, स्टेज व इतर | ०८,००,०००/- | ४,६९,२०२/- | ०३३०७९८ | ० |
| ०२) | कलाकार बिदागी -(कीर्तनकार व निमंत्रीत कलाकार , कलाकार हजेरी कार्यक्रमासह) | २,००,०००/- | ७७,५०७/- | १२२४९३ | ० |
| ०३) | भक्तांना मिष्टान्न अन्नदान कक्ष, व श्रमपरिहार - मजूरीसह | ०३,७५,०००/- | ४,०२,३४९/- | ० | २७३४९ |
| ०४) | विद्युत रोषणाई ,जनसेट भाडे , इंधन खर्च इ. | १,००,०००/- | ५१,८७८/- | ४८१२२ | ० |
| ०५) | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदी-प्रसादासह १ लाख ५५ हजार तहहयात, आश्रयदाते विदेशी भक्तांसह | १८,००,०००/- | १५,८९,३६१/- | २१०६३९ | ० |
| ०६) | जादा कंत्राटी कर्मचारी स्वयंसेवक(विद्यार्थी) मानधन | ३,००,०००/- | १,३०,६८९/- | १६९३११ | ० |
| ०७) | इतर खर्च -मंदिर रंगकाम मंदिर प्रसाद, प्रसादाल्य फर्निचरभाडे, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, फोटोग्राफी,पेंटर बीले | १,००,०००/- | ८,४३२/- | ९१५६८ | ० |
| ०८) | पालख्याचे ठिकाणी पिण्याचे पाण्याची व्यवस्था खर्च- टँकर व डिझेल सह. | १०,०००/- | १०,०९९/- | ० | ९९ |
| ०९) | उत्सवात येणारे भक्तांसाठी रांगेत वाटण्यात येणा-या पाऊचचा खर्च. | ६५,०००/- | ०० | ६५००० | ० |
| १० | मंदिर व मंदिर परीसर फुलांचे डेकोरेशन | १,५०,०००/- | ०० | १५०००० | ० |
| ११ | प्रथमोपचार केंद्राकरीता तातडीचे औषध खरेदी | ३०,०००/- | १,३५,६९८/- | ० | १०५६९८ |
| | **एकूण** | **३९,३०,०००/-** | **२८,७५,२१५/-** | **११८७९३१** | **१३३१४६** |

प्रत्येक तरतूदीवरील खर्च विचारात घेता , अ.नं. ०३ भक्तांना मिष्टान्न, अन्नदान कक्ष व श्रमपरिहार, मजूरीसह करीता ३,७५,०००/- तरतूद करण्यात आली होती मात्र प्रत्यक्षात रु ४०२३४९/- इतका म्हणजे तरतूदीपेक्षा रु. २७३४९/- इतका जास्त व ०८ पालख्यांचे ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे व्यवस्था (टँकर डिझेल सह) करीता रु. १०,०००/- तरतूद करण्यात आलेली होती मात्र प्रत्यक्षात रु. १०,०९९/-इतका म्हणजे तरतूदी पेक्षा रु. ९९/- जास्त झालेला आहे.

तसेच अ.नं. ११ - प्रथमोपचार केंद्रा करीता तातडीचे औषध खरेदी करीता रु. ३०,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली होती मात्र प्रत्यक्षात रु. १,३५,६९८/- इतका म्हणजेच तरतूदीपेक्षा रु.१,०५,६९८/- इतका खर्च जास्त झालेला आहे. जादा झालेल्या खर्चाबाबत साईबाबा रुग्णालय विभागाने सविस्तर अलाहिदा अहवाल व्य.समिती समोर सादर केला असून त्यास दिनांक १०/१०/२०१० चे सभेत मान्यता मिळालेली आहे.

गुरुपौर्णिमा उत्सव-२०१० करीता रु. ३९,३०,००० अंदाजपत्रक मंजूर करण्यात आलेले होते प्रत्यक्षात एकूण तरतूदी पेक्षा कमी म्हणजे एकूण रु. २८,७५,२१५/-इतका खर्च झालेला आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे अ.नं. ३ वर एकूण जादा झालेला रु. २७३४९/- व अ.नं. ८ वर एकूण जादा झालेला रु. ९९/- चे खर्चास मान्यता मिळणेस तसेच उत्सवा करीता झालेल्या एकूण रु. २८,७५,२१५/- चे खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.९२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वशी-०५)

---

**विषय नं.७५ श्री विरभद्र बिरोबा बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांच्या हगामाकरीता रु. ७५,०००/- देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री सर्जेराव भाऊराव काटकर व इतर ग्रामस्त, श्री विरभद्र यात्रा कमिटी, शिर्डी (बिरेगांव बन) यांनी त्यांचे दिनांक २६/१०/२०१० रोजीचे अर्जात विरभद्र (बिरोबा) या दैवताची यात्रा हि शुक्रवार, दि.१९/११/२०१० ते रविवार, दि.२१/११/२०१० अखेर बिरोबा बन, शिरडी येथे मोठया थाटात भरणार असून यात रविवार, दि.२१/११/२०१० रोजी कुस्ती हगामाही आयोजित केलेला आहे, या कुस्त्यात भाग घेणा-या व विजयी पहिलवानांना वाटण्यासाठी म्हणून मागील वर्षी रु.७५,०००/- मात्रची रक्कम मदत मिळाली होती, यावर्षीही रु.७५,०००/- ची आर्थिक मदत मिळावी अशी नम्र विनंती केलेली आहे.

दि.१७/११/२००४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.११९ नुसार एक विशेष बाब म्हणून विरभद्र यात्रा बन, शिर्डी यांना शुक्रवार, दि.२६/११/२००४ रोजी होणा-या कुस्त्यांच्या हगाम्यासाठी रु.२५ हजार रक्कम श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थान प्रतिनिधी नेमून देण्यात यावी, " असे ठरल्याप्रमाणे रक्कम देणेत आली होती. तसेच त्यानंतर दरवर्षी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खालीलप्रमाणे रक्कम मंजूर करुन वाटणेत आलेली आहे.

| अ.नं. | सभेची तारीख व निर्णय क्र. | मंजूर रक्कम | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| ०१. | दि.१७/११/२००४, निर्णय क्र.११९ | २५,०००.०० | २४,४९९.०० |
| ०२. | दि.०५/११/२००५, निर्णय क्र.७१२ | ५०,०००.०० | ४८,१५२.०० |
| ०३. | दि.१४/१०/२००६, निर्णय क्र.८६६ | ५०,०००.०० | ४३,५३३.०० |
| ०४. | दि.१८/११/२००७, निर्णय क्र.७८२ | ५०,०००.०० | ४९,०२०.०० |
| ०५. | दि.०३/०१/२००९, निर्णय क्र.०४(१९) | ७५,०००.०० | ६४,०८०.०० |
| ०६. | दि.०७/११/२०१०, निर्णय क्र.८६७ | ७५,०००.०० | ६९,५७०.०० |

दि.०७/११/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ८६७ नुसार मागीलवर्षी सदरकामी रु. ७५,०००/- मात्रची आर्थीक मदत संस्थानमार्फत देण्यात आली होती. त्यापैकी रु. ६९,५७०/- इतकी रक्कम बिदागी म्हणून वाटली असून उर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा-नांवे करण्यात आलेली होती. चालूवर्षीही गेल्या वर्षाप्रमाणे रु. ७५,०००/- मंजूर करुन श्री रामनवमी उत्सवातील प्रथेप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन विजयी पहिलवानांना बिदागी म्हणून रक्कम वाटून उर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा-नांवे करता येईल.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली. तसेच, येथून पुढे श्री विरभद्र बिरोबा बन येथील श्री विरभद्र यात्रेतील कुस्त्यांचा हगामा स्थानिक विश्वस्तांच्या उपस्थितीत संस्थानचे प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन विजयी पैहिलवानांना बिदागी म्हणून रक्कम वाटणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वशी-०५)

---

**विषय नं.७६ श्री ए.एन.रेड्डी, ए.एम.आर कन्स्ट्रक्शन प्रा.लि. हैद्राबाद यांना लेंडीबागेत भजनाचे कार्यक्रमास परवानगी देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री ए.एन.रेड्डी, हैद्राबाद, यांनी दिनांक ३०/०९/२०१० चे अर्जान्वये दि.२४/१२/२०१० ते दि.३१/१२/२०१० अखेर लेंडीबागेत अखंड भजनाचे कार्यक्रमास परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

या कालावधीत नाताळ व वर्षाअखेर असल्याने साईभक्तांची मोठया प्रमाणात होणारी गर्दी होत असते. श्री ए.एन. रेडडी, हैद्राबाद यांनी श्री साईबांबाना सोन्याचे सिहांसन देणगी स्वरुपात अर्पण कलेले आहे. तसेच समाधी मंदिराच्या मुख्य गाभ्या-यातही भिंतीवर तसेच खांबावर सोन्याचे काम देणगी स्वरुपात अर्पण केले आहे. मागील वर्षी त्यांनी लेंडीबागेत उपरोक्त कार्यक्रमास परवानगी देण्यात आलेली होती.

श्री रेडडी यांना परवानगी देण्यात आलेनंतर शिरडी ग्रामस्थांनी दि.२३/१२/२००९ च्या अर्जान्वये त्यास हरकत घेतली होती. सदर अर्जात ग्रामस्थांनी या काळात होणा-या उच्चांकी गर्दीचा इतिहास पाहता कोणतीही दुर्घटना घडू शकते त्यामुळे श्री रेडडी यांना लेंडीबागेत परवानगी देण्यात येऊ नये अशी विनंती केली होती.

उपरोक्त अर्जदार श्री राजेंद्र हरीभाऊ गोंदकर व अन्य ग्रामस्थ यांना इकडील जा.नं. एसएसएस-वशी-५- १५७३९- २००९ दिनांक २५/१२/२००९ नूसार, "आपले निवेदन श्री रेडडी यांना

परवानगी दिलेनंतर प्राप्त झालेले आहे व श्री रेडडी यांनी कार्यक्रमाची पुर्वतयारीही केलेली आहे. तथापी आपले निवेदनानूसार व शिरडी येथे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी दिवसेंदिवस वाढत जाणारी गर्दी याचा विचार करुन यापूढे लेंडीबागेत अशाप्रकारच्या कार्यक्रमांना परवानगी देणेबाबत विचार करणे आवश्यक असलेमूळे तसा प्रस्ताव संस्थानच्या व्यवस्थापन समितीपूढे मांडण्यात येईल व झालेला निर्णय आपणास कळविण्यात येईल." असे कळविण्यात आलेले आहे.

त्यानूसार सदरचा अर्ज व्यवस्थापन समिती समोर निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. यावर मा.व्यवस्थापन समितीचे दिनाक ०६/०३/२०१० चे सभेत विषय क्र.४२ अन्वये चर्चा होऊन निर्णय क्रं. ३१५ नूसार , "श्री ए. एन. रेडडी हैद्राबाद यांचेसह कोणासही मंदिर परिसरात तसेच लेंडीबागेत भजन व अन्य कार्यक्रमासाठी परवानगी देण्यात येऊ नये " असे ठरलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय तसेच उपरोक्त बाब विचारात घेता श्री.ए.एन. रेड्डी यांना चालू वर्षी दि. २४/१२/२०१० ते ३१/१२/२०१० या कालावधीत लेडीबागेत भजनाचे कार्यक्रम करणेस परवानगी दयावी किंवा कसे या बाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.९२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वशी-०५)

---

**विषय नं.७७ सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास आर्थिक मदत देणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.डॉ.पी.अल्बलगन, जिल्हाधिकारी अहमदनगर तथा अध्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अ.नगर यांनी जा.क्र.१३१२/१/जिसैका-३, दि.३० जुलै १० चे पत्रान्वये, महाराष्ट्र शासनाकडुन यावर्षी ध्वजदिन निधी अहमदनगर जिल्हयासाठी रुपये ६६ लाखाचे उदिष्ठ ठरवून देण्यात आलेले आहे. यासाठी शासकीय कार्यालये, विविध संस्था, महामंडळे, शैक्षणिक संस्था, शालेय विद्यार्थी यांचे मदतीने निधी जमविण्याचे प्रयत्न चालु आहे. श्री साईबाबा संस्थानकडून या कार्यास रु.११ लाख मदत मिळावी, अशी विनंती केली आहे.

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ कलम क्र.२१ (२) (दोन) मध्ये, "विविध नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांना छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाचे मान्यतेने अनुदान देण्याची तरतुद आहे. सदची मागणी शासकीय संस्थेची असल्यामुळे छाननी समितीच्या अखत्यारित येत नाही.

मागील वर्षी मा.डॉ.अन्बलगन, जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी दि.१३/०२/२००९ चे पत्रान्वये, संस्थानकडून ध्वजदिन निधीसाठी रु.११ लाखाची मागणी केली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१३ अन्वये, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०५/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१३ अन्वये, संस्थान कर्मचारी व श्री साईबाबा संस्थान मिळुन रु.५ लाख सशस्त्रसेना ध्वजदिन निधीसाठी देण्यास मान्यता दिलेली होती.

त्यास अनुसरुन कर्मचाऱ्यांच्या वेतनबॅन्डनुसार खालीलप्रमाणे रक्कम कपात केलेली आहे.

| अ.नं. | वेतनबॅन्ड | वसुल करावयाची रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी | ३०० |
| २ | १५६००-३९१०० | ३०० |
| ३ | ९३००-३४८०० | २४० |
| ४ | ५२००-२०२०० | १२५ |
| ५ | ४४४०-७४४० | ७५ |
| ६ | ३५००० (फिक्स पे) | ३०० |
| ७ | ३०००० (फिक्स पे) | ३०० |
| ८ | २७००० (फिक्स पे) | २५० |
| ९ | १२००० (फिक्स पे) | १०० |
| १० | ८००० (फिक्स पे) | ७० |
| ११ | ७५०० (फिक्स पे) | ७० |
| १२ | ५५०० (फिक्स पे) | २५ |
| १३ | ५००० (फिक्स पे) | २५ |
| १४ | ४५०० (फिक्स पे) | २५ |
| १५ | ४००० (फिक्स पे) | २५ |
| १६ | २५०० (फिक्स पे) | २५ |
| १७ | २००० (फिक्स पे) | २५ |

वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची कपात केलेली एकूण रक्कम रुपये २,६६,७६५/- व संस्थानची रक्कम रु.२,३३,२३५/- अशी एकुण रक्कम रु.५,००,०००/- (रु.पाच लाख ) सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी दिलेली आहे.

तरी मा.डॉ.पी.अल्बलगन, जिल्हाधिकारी, अ.नगर यांच्या या वर्षीच्या सशस्त्र सेना ध्वजदिन निधी मागणीबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, गतवर्षाप्रमाणे रु.५,००,०००/- सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास आर्थिक मदत देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वशी-०६)

---

**विषय नं.७८ फ्रॅकिंग मशिन खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** जावक विभागाकडे फ्रॅकिंग करणेकामी मेंबरशिप विभागाकडील प्रत्येक उत्सवास १लाख ५० हजार भक्त मंडळ सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका व उदी प्रसाद असे एका उत्सवास तीन लाख टपाल फ्रॅकिंग करावे लागत आहे. व वार्षिक निमंत्रण पत्रिका व उदी प्रसाद पाठविणे करीता ९ लाख टपाल फ्रॅकिंग करावे लागते. त्याचप्रमाणे दैनंदिन मनिऑर्डर पाकीटे अंदाजें १८००ते २००० पर्यंत असतात. व वार्षिक मनिऑर्डर पाकीटे ७ लाख २० हजार टपाल फ्रॅकिंग करावे लागत आहे. तसेच तिनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका, उदी प्रसाद व मनिऑर्डर पाकीटे व इतर दैनंदिन टपाल अशी एकूण अंदाजे १६ लाख २५ हजार टपाल फ्रॅकिंग करावे लागते.

सदर टपाल पोष्टेज खर्चाकामी फ्रॅकिंग मशिनचा वापर करण्यात येत असून त्याकरीता सन. १९९७ मध्ये मे. कोरस इंडिया ली.पुणे यांचे कडून रू. २,९०,७००/- किमतीचे एसकॉम व्हॅसलर कंपनीचे मॉडेल नं.२२० इलेक्ट्रिक फ्रॅकिंग मशिन खरेदी करण्यात आलेले आहे. सदरचे मशिन १२ वर्षापासुन कार्यरत आहे.

सदरचे मशिन अत्यंत जुने झाले असलेने ते अनेक वेळा बंद पडते. सदरची कंपनी कायम स्वरूपी बंद झाली असुन फ्रॅकिंग मशिन दुरुस्त करणेकामी स्पेअर पार्टस उपलब्ध होत नसल्याने मशिन दुंरुस्ती कामी अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे संस्थानचे दैनंदिन कामकाजात व्यत्यय निर्माण होऊन टपाल पाठविण्यास उशीर होतो.

सन- २००८ मध्ये नविन मशिनखरेदी बाबदचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेत दि.१०/११/२००८ रोजी सादर करण्यात आला होता. सदर मशिन खरेदी बाबद निर्णय क्र. १२७ अन्वये नविन मशिन खरेदी करण्यास मान्यता देण्यात आलेली असुन सध्या कार्यरत असलेल्या मशिनच्या क्षमतेपेक्षा जास्त क्षमतेचे व शासन मान्यता असलेले मशिन बाजारात उपलब्ध नसल्याने सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात आला आहे

भारत सरकार डाक विभाग यांच्या आदेशान्वये दि.१६/०८/२०१० पासून Remotly Managed Franking System रद्द केली आहे. सदरचे पत्र अवलोकनार्थ सादर केले आहे. सध्या कार्यरत असलेल्या मशिनचा परवाना कालावधी डिसेंबर २०११ पर्यंत आहे. तथापी सध्याचे मशिन वारंवार दुरुस्त करावे लागत असल्याने संस्थानला पोष्टेज कामाकरीता नवीन फ्रॅकिंग मशिन तातडीने खरेदी करावे लागणार आहे.

मे. कोरस इंडिया लि.पुणे यांनी दि. १७ /०८ /२०१० रोजी नवीन डिजीटल फ्रॅकिंग मशिन बाबतचे माहिती पत्रक व दरपत्रक दिलेले आहे. ते सोबत अवलोकनार्थ सादर केले आहे.त्यामध्ये त्यांनी खालील प्रमाणे दोन वेगवेगळया क्षमतेच्या मशिनचे दर खालील प्रमाणे दिलेले आहे.

| अ. क्र. | फ्रॅकिंग मशिन प्रकार | फ्रॅकिंग मशिन किंमत | फ्रॅकिंग क्षमता दर ताशी | दररोजची एकूण फ्रकिंगची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | Kores IJ ५० | २,६५,०००/- | ५,७०० | ४५,६०० |
| २ | Kores IJ ९० | ८,२०,०००/- | १३,५०० | १,०८,००० |

उपरोक्त पैकी Kores IJ ९० हे जादा क्षमतेचे फ्रॅकिंग मशिन असून ते जावक विभागाच्या कामकाजाच्या दृष्टिने योग्य राहील. नवीन फ्रॅकिंग मशिन घेण्यासाठी देणगीदार मिळाल्यास त्यांचेकडून फ्रॅकिंग मशिन देणगी स्वरूपात घेण्यास किंवा देणगीदार न मिळाल्यास सदर मशिन खरेदी करणेकामी मा. व्यवस्थापन समितीपुढे प्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.९२६ यावर सविस्तर चर्चा होऊन, Kores IJ ९० नवीन फ्रॅकिंग मशिन घेण्यासाठी देणगीदार मिळाल्यास त्यांचेकडून फ्रॅकिंग मशिन देणगी स्वरूपात घेण्यास किंवा देणगीदार न मिळाल्यास सदर मशिन कोटेशन मागवून खरेदी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वशी- ११)

---

**विषय नं.७९ श्री शिवाजीराजे गोंदकर व इतर १३ ग्रामस्थ यांचे दिनांक २५.०८.२०१० रोजीचे निवेदनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री शिवाजीराजे गोंदकर व इतर १३ ग्रामस्थ यांनी मा.नामदार श्री राधाकृष्ण विखे पा. व संस्थानचे अध्यक्ष मा. श्री. जयंतराव ससाणे याचेंशी प्रसादालयातील अतिथीकक्षात बुधवार दिनांक २५/०८/२०१० रोजी रात्रौ ९-४५ चे दरम्यान सविस्तर चर्चा केलेली आहे. यावेळी त्यांनी लेखी निवेदन देखील दिलेले आहे. सदरचे अर्जाची प्रत या सोबत अवलोकनार्थ सादर केलेली आहे.

उपरोक्त चर्चेस अनुसरुन श्री शिवाजीराजे गोंदकर यांना जा.नं.एसएसएस-वशी-१-९१०१ दिनांक २७/०८/२०१० अन्वये, " श्री साईबाबांच्या पादुका १९ सप्टेंबर २०१० रोजी लंडन येथे नेण्याचे रदद करणेत आले आहे. तसेच श्रींच्या पादूका अगर इतर कोणत्याही वस्तू यापूढे शिरडीबाहेर नेऊ नये, ही बाब धोरणात्मक असल्यामुळे याबाबतचा प्रस्ताव संस्थानच्या व्यवस्थापन समितीपुढे सादर करीत आहोत." असे कळविण्यात आले आहे.

तरी उपरोक्त विषयाबाबत धोरणात्मक निर्णय होणस विनंती आहे.

**निर्णय क्र.९२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय काढून टाकण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वशी- ०५)

---

**विषय नं.८० श्री साईबाबा हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी/आरएमआ या पदावर देण्यात आलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६/०३/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८३ नुसार श्री साईबाबा हॉस्पीटलकरिता खालील ज्यु. रेडीओलॉजिस्ट यांची दि. २८/०९/२०१० रोजी व आरएमओ यांची दि. ०६/१०/२०१० रोजी डॉ. एकनाथ भा. गोंदकर, विश्वस्त -श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांनी मुलाखती घेतल्या असून, खालील उमेदवारांना वैद्यकीय अधिकारी, आर.एम.ओ. या पदावर नेमणुक आदेश देणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार खालील उमेदवारांना नेमणूक आदेश देणेत आलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | वैद्यकिय अधिकाऱ्याचे नाव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश क्र. | दिलेले पदनाम व एकत्रित वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ. निलेश दादाराव जांभळे सोलापूर. | एम.बी.बी.एस.-०४ डी.एम.आर.ई - १० | जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/४०८१/२०१० दिनांक १९/१०/२०१० | श्री साईबाबा हॉस्पिटलकडे मासिक रु. २७,०००/- फिक्स पे-वर ज्यु. रेडीओलॉजिस्ट पदावर नेमणूक |
| ०२. | डॉ. प्रभूराज अे. बाली मुंबई. | एम.एस. (Obst. & Gynac) २००७ | जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/४०४६/२०१० दिनांक १६/१०/२०१० | श्री साईनाथ रुग्णालयाकडे मासिक रु. २७,०००/- फिक्स पे-वर आर.एम.ओ. पदावर नेमणूक |
| ०३ | डॉ. राम मोहनलाल कुकरेजा श्रीरामपुर. | एम.बी.बी.एस.- २००९ | जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/४०४४/२०१० दिनांक १६/१०/२०१० | श्री साईबाबा हॉस्पिटलकडे मासिक रु. २७,०००/- फिक्स पे-वर आर.एम.ओ. पदावर नेमणूक |
| ०४ | डॉ. शरदचंद्र मोहन जगमवार मनमाड. | एम.बी.बी.एस.- २००९ | जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/४०४५/२०१० दिनांक १६/१०/२०१० | श्री साईबाबा हॉस्पिटलकडे मासिक रु. २७,०००/- फिक्स पे-वर आर.एम.ओ. पदावर नेमणूक |

उपरोक्तप्रमाणे मुलाखती घेण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे आर.एम.ओ. या पदावर नेमणूक आदेश देण्यात आलेले आहे. सदर नेमणूकांस कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना/ वैद्यकिय संचालक (सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.८१ डॉ.निलेश भगवान पवार, आर.एम.ओ श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. निलेश भगवान पवार, यांची जा. नं. एसएसएस/वशी-०१/१११४०/२००९ दि. ०४/०९/२००९ अन्वये संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे आर.एम.ओ. या पदावर प्रतिमाह रु. २७,०००/- एकत्रित वेतनावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दि. ०४/०९/२००९ रोजी कामावर हजर झालेले आहेत. सदरची नेमणूकीची मुदत दि. ०३/०९/२०१० अखेर संपुष्ठात आली आहे.

डॉ. निलेश पवार यांची मुदत दि. ०३/०९/२०१० रोजी संपुष्टात आली असून, त्यांचेबाबत मा. वैद्यकिय संचालक यांनी डॉ. निलेश भगवान पवार यांचे रजेचे प्रमाण जास्त आहे. तसेच ड्युटीबाबत अनियमीतता असलेने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी अजून ०६ महिने वाढवावा असा अभिप्राय दिलेला आहे.

डॉ. निलेश पवार यांनी दि. ०४/०९/२००९ ते दि. ०३/०९/२०१० या एक वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीमध्ये एकुण ६८ रजा घेतलेल्या असल्याने त्यांचा ६८ दिवसांनी परीविक्षाधीन कालावधी वाढेल. वैद्यकीय संचालक यांचा अभिप्राय व आरएमओ यांची आवश्यकता विचारात घेवुन डॉ. पवार यांचा ६८ दिवस परिविक्षाधीन कालावधी अधिक ११२ दिवस सुधारणेची संधी म्हणून असे एकुण ०६ महिने परिविक्षाधीन कालावधीची मुदत वाढविता येईल.

तरी, डॉ. निलेश भगवान पवार, आर.एम.ओ. यांचेबाबत वैद्यकीय संचालक यांचे अभिप्राय व आर एम ओ यांची आवश्यकता विचारात घेऊन, डॉ. पवार यांचा परिविक्षाधीन कालावधी ६ महिने (दि.०४.०९.२०१० ते ०३.०३.२०११ अखेर) वाढविणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.निलेश भगवान पवार, आर.एम.ओ. श्री साईबाबा हॉस्पिटल यांना सेवामुक्त करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना/ वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.८२ पालखी सेवेकरी व चौघडा वादक यांचे मानधनात वाढ करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे रथाची व पालखीची मिरवणूक दर गुरुवारी, स्थानिक उत्सव व तसेच श्री साईबाबा चे श्री. गुरुपौर्णिमा उत्सव, श्री रामनवमी उत्सव, व श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव या तीन प्रमुख उत्सवाचे वेळी असते. प्रत्येक गुरुवारी समाधी मंदिर ते चावडी मंदिर व चावडी मंदिर ते परत समाधी मंदिर अशी पालखीची मिरवणूक असते. सदर श्रींचे पालखी/रथ मिरवणूकीचे वेळी पालखी/रथ धरणारे सेवेकरी-०४, अब्दागिरीधारक-०१, सनईवादक-०१, शिंगवादक-०१, ढोलवादक -०१, ताशावादक-०२, डफवादक-०१, तसेच बत्तीधारक-०२ असे एकूण १३ सेवेकरी हजर असतात. ते करत असलेल्या सेवेबाबत त्यांना खाली त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे आतापर्यंत देण्यात आलेल्या मानधनाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | पालखी सेवेकरी पूर्ण नांव | सेवाप्रकार | आतापर्यंत वाढविण्यात आलेल्या मानधनाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सन-१९९० | सन-१९९९ | सन-२००७ | सध्या मिळते |
| ०१ | श्री. अमोल नथूराम बिडवे | पालखी धरणे | रु. २५/- | रु. २००/- | रु.२५०/- | रु.२५०/- |
| ०२ | श्री. रामनाथ हरिभाऊ वर्पे | पालखी धरणे | रु. २५/- | रु. २००/- | रु. २५०/- | रु. २५०/- |
| ०३ | श्री. दत्तू नारायण शेळके | पालखी धरणे | रु. २५/- | रु. २००/- | रु. २५०/- | रु. २५०/- |
| ०४ | श्री. निवृत्ती रामचंद्र आहेर | पालखी धरणे | रु. २५/- | रु. २००/- | रु. २५०/- | रु. २५०/- |
| ०५ | श्री. दगडू भिवाजी अडांगळे | ढोलवादक | रु. २५/- | रु. २००/- | रु. २५०/- | रु. २५०/- |
| ०६ | श्री. रामदास माधव गायके | बत्तीधारक | रु. २५/- | रु. २००/- | रु. २५०/- | रु. २५०/- |
| ०७ | श्रीमती मुमताज शिरीकभाई सय्यद | बत्तीधारक | रु. २५/- | रु. २००/- | रु. २५०/- | रु. २५०/- |
| ०८ | श्री. गंगा धोंडीराम सोळसे | सनई वादक | रु. २५/- | रु. २००/- | रु. २५०/- | रु. २५०/- |
| ०९ | श्री. बाळा साळबा आरणे | शिंगवादक | रु. २५/- | रु. २००/- | रु. २५०/- | रु. २५०/- |
| १० | श्री. दिपक सर्वोत्तम बिडवे | अब्दागिरी धारक | रु. २५/- | रु. २००/- | रु. २५०/- | रु. २५०/- |
| ११ | श्री. सुकदेव भागाजी बत्तीसे | ताशा वादक | रु. २५/- | रु. २००/- | रु. २५०/- | रु. २५०/- |
| १२ | श्री. बालमभाई पापाभाई सय्यद | ताशा वादक | रु. २५/- | रु. २००/- | रु. २५०/- | रु. २५०/- |
| १३ | श्री. अर्जुन रामा ढोबळे | डफ वादक | रु. २५/- | रु. २००/- | रु. २५०/- | रु. २५०/- |

तसेच श्रींच्या दररोज सकाळी-काकडआरती, दुपारी-माध्यान्ह आरती, सायंकाळी-धूपारती व रात्री-शेजारती अशा चार आरत्या होतात सदर चारही आरतीचे वेळी चौघडा वाजविण्याचे काम -०१ सेवेकरी करत असतात. ते करत असलेल्या सेवेबाबत त्यांना खाली त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे आतापर्यंत देण्यात आलेल्या मानधनाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | आरती सेवेकरी पूर्ण ना | सेवाप्रकार | आतापर्यंत वाढविण्यात आलेल्या मानधनाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सन-१९९६ | सन-१९९९ | सन-२००९ | सध्या मिळते |
| ०१ | श्री. दिपक सर्वोत्तम बि | चौघडा वादन | रु. १००/- | रु.२००/- | रु.३५०/- | रु.३५० |

"उपरोक्त प्रमाणे देण्यात आलेले मानधन हे त्यांना मोबदला म्हणून दिले जाते. त्यांचा संस्थान कर्मचारी म्हणून कोणताही सहभाग नसतो. सदर सेवेक-यांना सन -२००७ पासून व चौघडा वाजविण्याचे काम करणारे सेवेकरी यांना आतापर्यंत मानधनात कुठल्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. सदर सेवेकरी यांना रथ/पालखी हजेरीच्या प्रमाणे मानधन आदा करण्यात येते.

सदर पालखी/रथ तसेच आरती चे वेळी चौघडा वाजविण्याचे काम करणारे सेवेक-यांना सध्या मिळत असलेल्या मानधनात प्रत्येकी दरमहा एकत्रित रु.११००/-(एक हजार शंभर मात्र) मानधन देण्यात

यावे. त्यांना हजेरीनुसार आदा करता येईल. तसेच उपरोक्त सेवेकरी स्वतः व त्यांची पत्नी व त्यांचे ०३ मुले यांना श्री साईनाथ हॉस्पीटल मध्ये त्यांचे आजारपणात मोफत औषधोपचाराची सवलत देण्यात यावी." असे मंदिर अधिक्षक यांनी नमूद केले आहे.

तरी सदर प्रस्तावास अनुसरुन खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती .

**०१)** श्री. रथ पालखी व पालखी मिरवणूकीचे वेळी हजर असणा-या उपरोक्त प्रमाणे १३ सेवेक-यांना सध्या प्रतिमहा रु.२५०/- व आरतीचे वेळी चौघडा वाजविण्याचे काम करणारे ०१ सेवेकरी यांना रु.३५०/- प्रमितहा इतके मानधन देण्यात येत आहे. त्यांना आता त्यांचे मानधनात किती वाढ करावी ?

**०२)** तसेच संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांप्रमाणे त्यांना श्री साईनाथ रुग्णालयात स्वतः, त्यांची पत्नी व मुलांना मोफत औषधोपचाराची सवलत देणे.

**निर्णय क्र.९३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री. रथ पालखी व पालखी मिरवणूकीचे वेळी हजर असणा-या सेवेकऱ्यांना प्रत्येकी प्रतिमहा रु.५००/- एकत्रित मानधन देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदीर)

---

**विषय नं.८३** **श्री. वैभव विलास पंडीत यांनी वर्ग-४ (वॉर्डबॉय) पदावर स्थानापन्नतेचा आदेश न स्विकारलेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री वैभव विलास पंडीत यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे कंत्राटी पध्दतीने ज्यु. बायोमेडीकल इंजिनिअर या पदावर प्रति महिना रुपये ८,०००/- या एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती.

दि.०७.०८.२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.६६० अन्वये श्री वैभव पंडीत यांना ज्यु. बायोमेडीकल इंजिनिअर या पदावर दि.१८.१०.२००९ ते दि.३१.०८.२०१० अखेर मुदतवाढ देण्यात येऊन त्यांचेकडे शैक्षणिक पात्रता नसल्याने श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वर्ग-०४ (वॉर्ड बॉय) या पदावर दि.०१.०९.२०१० पासून स्थानापन्न करणेबाबत निर्णय झालेला आहे.

त्यास अनुसरुन श्री पंडीत यांना जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/१५८/२०१०, दि.२७.०९.२०१० अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलकडे वर्ग-०४ (वॉर्ड बॉय) या पदावर स्थानापन्नतेचा आदेश पारीत करणेत आलेला आहे. दि.२७.०९.२०१० रोजी सदरचा आदेश स्विकारणेकामी त्यांना श्री साईबाबा हॉस्पीटलचे एच आर कार्यालयात तसेच दि.२८.०९.२०१० रोजी वैद्यकिय संचालक यांनी त्यांचे कार्यालयात समक्ष बोलविले असता श्री पंडीत यांनी आदेश स्विकारणेस नकार दिल्याने स्थानापन्नतेचा आदेश त्यांचे पत्त्यावर रजि. ए डी व्दारे पाठविण्यात आला होता. परंतु रजिस्टर ए डी केलेल्या पाकीटावर पोस्ट कार्यालयाकडून Refused या नावाखाली अधोरेखित करुन पोस्टातील संबंधीतांचे सहीनिशी सदर पाकिट पोस्टाकडून इकडील कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहे.

श्री पंडीत यांचे वर्ग -०४ कर्मचारी हजेरी रजिस्टरमध्ये नांव स्थापन्नतेच्या आदेशान्वये दि.२८.०९.२०१ पासून वर्ग करण्यात आले होते. श्री वैभव पंडीत दि.२८.०९.२०१० ते.३०.०९.२०१० या कालावधीत बायोमेडीकल विभागात कामावर येत होते. परंतु त्यांनी सदर कालावधीत हजेरी रजिस्टरमध्ये स्वाक्षरी केलेली नाही व दि.०१.१०.२०१० पासून आजपर्यंत कामावर आलेले नाहीत.

तरी श्री वैभव पंडीत यांचे श्री साईबाबा हॉस्पीटलचे आस्थापनेवरुन नांव कमी करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. वैभव विलास पंडीत, वर्ग-४ कर्मचारी (वॉर्डबॉय), यांना कामावर हजर होणेबाबत सात दिवसाची मुदत देण्यात यावी, या मुदतीत ते कामावर हजर न झाल्यास त्यांना सेवामुक्त करण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ अधिक्षक, आस्थापना)

---

**विषय नं.८४** **कु.वेरोनिका काशिनाथ पंडीत व श्री लिजो जोस विद्यातील, स्टाफ नर्स यांचे शैक्षणिक रजा मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** कु. वेरोनिका काशिनाथ पंडीत यांनी दि. ०६/०९/२०१० ते दि. ०६/०९/२०१२ या कालावधीत उच्च शिक्षण (एम.एस्सी. नर्सीग) घेणेसाठी रजा मिळणेबाबत दि. ०१/०९/२०१० अन्वये विनंती अर्ज केलेला आहे. तसेच लिजो जोस विद्यातील, स्टाफ नर्स यांनी दि.१३/०९/२०१० ते दि.३१/०८/२०१२ अखेर दोन वर्षाचे कालावधीची शैक्षणिक रजा मिळणेबाबत दि. २६/०८/२०१० अन्वये विनंती अर्ज सादर केला आहे.

कु.वेरोनिका काशिनाथ पंडीत यांची जा.नं. एसएसएस/वशी-०१/५२१८/२००६ दि.२२/०४/२००६ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलकडे स्टाफ नर्स या पदावर रु. ८०००/- या एकत्रित वेतनावर नेमणूक करण्यात आली असून, त्या दि. ०२/०५/२००६ रोजी कामावर हजर झालेल्या आहेत. तद्नंतर

त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कु. पंडीत यांना दि. ०१/०८/२००७ पासून वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे.

लिजो जोस विद्यातील यांची जा. नं. एसएसएस/वशी-०१/३४८९/२००९ दि. २७/०३/२००९ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटलकडे स्टाफ नर्स या पदावर रु. ८०००/- या एकत्रित वेतनावर नेमणूक करण्यात आली असून, ते दि. २८/०३/२००९ रोजी कामावर हजर झालेले आहेत. तद्नंतर जा. नं. एसएसएस/वशी-०२/२७२०/२०१० दि. ०६/०५/२०१० चे आदेशान्वये त्यांना दि. २८/०३/२०१० पासून वेतन बँड रु. ९३००-३४८०० मध्ये मूळवेतन रु. ९३०० व ग्रेड वेतन रु. ४२००+संस्थान नियमाप्रमाणे अनुज्ञेय भत्ते व इतर सवलती देऊन त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यात आली आहे.

कु. वेरोनिका काशिनाथ पंडीत व लिजो जोस विद्यातील यांचे मागणी प्रमाणे त्यांना एम.एस्सी. नर्सींगचे शिक्षणासाठी रजेवर सोडावे किंवा कसे? याबाबत सहा. अधिसेविका, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचेकडून अभिप्राय मागविला असता, त्यांनी जा. नं. एसएसएस/एसएसबीएच/मेट्रन/२१३/२०१० दिनांक १०/०९/२०१० खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

सध्या परिचारिका संख्या अपुरी असल्याने उपरोक्त कर्मचाऱ्यांचे अर्ज प्रतिक्षा यादीत ठेवून रजेवर सोडलेल्या पाच कर्मचाऱ्यांपैकी कमीत कमी दोन कर्मचारी हजर झालेनंतर त्यांना अध्ययन रजेवर पाठवावे. व प्रतिवर्षी बी.एस्सी. नर्सींग करिता एक व एम.एस्सी. नर्सींग करिता एक अशा दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवाजेष्ठतेनुसार प्राधान्य द्यावे, असे मत आहे.

सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलकडील खालील परीचारक / परीचारीका यांना अध्ययनासाठी असाधारण रजेवर सोडण्यात आलेले आहे.

| अ.नं. | नाव | रजेचा कालावधी | |
|---|---|---|---|
| १ | श्री. मनोज ब. साबळे परिचारक, | ०१/११/२००९ | ३१/१०/२०११ |
| २ | श्री. प्रमोद शि. वाणी, परिचारक | ०१/११/२००९ | ३१/१०/२०११ |
| ३ | कु. मयुरा स. हासे, परिचारिका | ०१/११/२००९ | ३१/१०/२०११ |
| ४ | कु. शितल युवराज एंडाईत, परिचारिका | ०१/११/२००९ | ३१/१०/२०११ |
| ५ | कु. सोनाली सोमनाथ गोरक्ष, परिचारिका | ०१/०८/२०१० | ३१/०७/२०१२ |

उपरोक्त अभिप्राय व पूर्वी शिक्षणासाठी सोडण्यात आलेले कर्मचारी संख्या विचारात घेऊन, मनुष्यबळ विभागाचे दि. १३/०९/२०१० रोजीचे टिपणीअन्वये कु. वेरोनिका पंडीत व लिजो जोस विद्यातील यांचे नाव प्रतिक्षा यादीत ठेवून, उपरोक्त कर्मचाऱ्यांपैकी दोन कर्मचारी कामावर हजर झालेनंतर त्यांना शिक्षणासाठी सोडणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापि, कु. वेरोनिका काशिनाथ पंडीत यांनी दि. १३/१०/२०१० रोजी पुन्हा अर्ज सादर करुन, एम.एस्सी. नर्सींगचे शिक्षणासाठी जाणेकामी दोन वर्ष कालावधीची रजा मिळणेस विनंती केली आहे. सदर अर्जासोबत कु. पंडीत यांची एम.एस.सी. नर्सिग या उच्च शिक्षणासाठी निवड झाली असून, त्यांना दोन वर्षाकरिता शैक्षणिक रजा तातडीने पाहिजे असल्याने, ती मंजूर करणेबाबत मा. अध्यक्ष सो., श्री जयंतराव ससाणे सो यांनी दि. ०७/०९/२०१० रोजीचे पत्राने शिफारस केलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलकडील वैद्यकिय अधिकारी, स्टाफ नर्स, पॅरामेडिकल स्टाफ व इतर कर्मचारी यांना अध्ययन असाधारण रजेवर सोडतांना दरवर्षी येणाऱ्या अर्जांची प्रतिक्षा यादी तयार करुन खालीलप्रमाणे नियमावली करता येईल.

१. उच्च शिक्षणासाठी याआधी सोडण्यात आलेल्या संबंधीत विभागातील कर्मचारी परत आलेनंतरच एका वेळी दोन परीचारीका, एक वैद्यकिय अधिकारी, एक पॅरामेडीकल कर्मचारी व इतर पैकी एक असे कर्मचारी असाधारण रजेवर सोडणेस सेवाजेष्ठतानुसार परवानगी देणे.
२. उच्च शिक्षण झालेनंतर किमान ०३ वर्ष संस्थान सेवा करावी लागेल. तसे रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र करुन घेणे.
३. रजेच्या कालावधीत त्यांना कोणतेही वेतन, भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.
४. रजा कालावधीत त्यांना आवश्यक असणारा ०५ वर्षाचा सेवा कालावधी नसल्यास त्यांची सेवाजेष्ठता कोणत्याही प्रकारे सुरक्षित राहणार नाही.
५. रजा कालावधी संपुष्टात आल्यानंतर रजेचा नियमीत करणे अथवा भत्ते, वेतन वगैरेसाठी साईबाबा संस्थानचे मा. व्यवस्थापन मंडळ, मा. न्यायालय अथवा फोरम समोर त्यांना दाद मागता येणार नाही.
६. उच्च शिक्षणाचा कालावधी संपताच त्यांनी कामावर त्वरीत हजर होऊन ०३ वर्षापर्यंत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीस सेवा द्यावी लागेल. अगर ०३ वर्षाची सेवा करणार नसलेस ०३ महिन्यांचे वेतन संस्थानमध्ये जमा करावे लागेल.

उपरोक्त नियमांप्रमाणे पुर्वी सोडण्यात आलेले कर्मचारी कामावर हजर झालेनंतर प्रतिक्षा यादीनुसार पुढील कर्मचारी अध्ययन असाधारण (उच्च शिक्षणासाठी) रजेवर / सोडता येतील.

महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ मधील प्रकरण सात मध्ये अध्ययन रजा संदर्भातील मार्गदर्शक तत्वे व प्रकरण पाच (६३) असाधारण रजा संदर्भात मार्गदर्शक तत्वांनुसार व या पुर्वी अध्ययन असाधारण रजेवर सोडण्यात आलेल्या स्टाफनर्सपैकी दोन स्टाफनर्स कामावर हजर झालेनंतर कु. पंडीत वेरोनिका व लिजो जोस विद्यातील यांना उपरोक्त नियमावलीनुसार उच्च शिक्षणासाठी सोडता येईल, असे मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटलकडील स्टाफ नर्स कु. वेरोनिका काशिनाथ पंडीत व लिजो जोस विद्यातील यांना उच्च शिक्षणासाठी रजेवर सोडणेबाबतचे प्रस्ताव निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.९३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच त्यांचेकडून आवश्यक ते कागदपत्र करुन घ्यावेत, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकिय संचालक/ अधिक्षक, आस्थापना)

---

**विषय नं.८५ श्रीरामपूर येथील भू-संपादन कक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी करीता भू-संपादन करणेकामी दि.१५-१६-१७ जुलै २००० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.२३८ नुसार मा. उपविभागीय अधिकारी महसूल श्रीरामपूर यांचे पर्यवेक्षणाखाली दि.०२/०८/२००० पासून एक कक्ष सुरु करण्यात आलेला आहे. या कक्षाकडे कंत्राटी पद्धतीने खालील कर्मचारी देण्यात आलेले असून त्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे एकत्रित मानधन देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे पद | हुद्दा | संख्या | मासिक एकत्रीत वेतन / मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | नायब तहसीलदार | कंन्सल्टंट | ०१ | रु.७०००/- |
| ०२ | अव्वल कारकुन संवर्गातील | अव्वल कारकुन | ०१ | रु.४५००/- |
| ०३ | लिपीकाचे कामासाठी | कंत्राटी कुशल कामगार | ०४ | रु.४०००/- |
| ०४ | कार्यालयीन कामकाजासाठी शिपाई | कंत्राटी अकुशल कामगार | ०१ | किमान वेतनानुसार हजेरी |
| | | **एकूण** | **०७** | |

जा.नं.एसएसएस वशी ०१/९०३८ व ९०३७ /२०१० दि. २३/०८/२०१० अन्वये सदर भू-संपादन कक्ष व कक्षात काम करीत असलेले कर्मचारी यांना देण्यात आलेली एक वर्ष मुदतवाढ दि.३१/१०/२०१० रोजी संपुष्ठात आलेली आहे.

मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपुर यांनी दि. २५/१०/२०१० रोजी सदर कक्षास व कक्षाकडे काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला असून सदर प्रस्तावामध्ये संबंधीत कक्षाकडे चालू असलेल्या प्रकरणांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

| अ क | भूसंपादन संस्थेचे नांव | भूसंपादनासाठी एकूण दाखल झालेल्या प्रकरणांची सख्या | त्यापैकी १२/०३/२०१० पर्यंत निर्गत केलेली प्रकरण संख्या | १२/०३/२०१० पर्यंत शिल्लक प्रकरणे संख्या | पैकी १२/०३/२०१० ते २५/१०/२०१० पर्यंत निर्गत केलेली प्रकरणे | दि.२५/१०/२०१० रोजी शिल्लक प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साईबाबा संस्थान शिर्डी | ०९ | ०६ | ०३ | ०० | ०३ |
| २ | शिर्डी नगरपंचायत शिर्डी | १३ | ०४ | ०९ | ०३ | ०६ |
| ३ | कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अ.नगर<br>अ) शिर्डी बाहय वळण रस्ता<br>ब) चौपदरीकरण रस्ते | <br><br>०८<br>१० | <br><br>००<br>०५ | <br><br>०८<br>०५ | <br><br>०४<br>०१ | <br><br>०४<br>०४ |
| ४ | एकूण | ४० | १५ | २५ | ०८ | १७ |

भू-संपादनाबाबत चालू असलेल्या उपरोक्त १७ प्रकरणांसाठी साधारण ०६ महिण्यांचा कालावधी आवश्यक आहे. सबब ही भू-संपादन प्रकरणे सत्वर निर्गत करणेकामी या कक्षास तसेच या कक्षाकडे कार्यरत असलेले वरिल कर्मचारी यांना दि.०१/११/२०१० ते दि.३०/०४/२०११ अखेर ०६ महिने मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

सदर बाबत उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांनी " मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचे कार्यालयातील भू-संपादन कक्षास व सदरहू कक्षातील ०७ कर्मचाऱ्यांना उपरोक्त प्रकरणांचा निपटारा लवकरात लवकर होणे गरजेचे असल्याने ०६ महिने मुदतवाढ देणेबाबत तसेच त्यांना द्यावयाचे मानधन / वेतनाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व निर्देशानुसार उचित निर्णय घेणेस हरकत नाही. " असे अभिप्राय दिलेले आहेत.

उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांची विनंती व उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेऊन ०६ महिन्यांची मुदतवाढ देणे बाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपूर येथील भू-संपादन कक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना पुर्वीचेच अटी/ शर्तीवर ०६ महिने मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

---

**विषय नं.८६ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व कनिष्ठ अभियंता (मशिनरी व दुरुस्ती देखभाल) या पदावरील कंत्राटी अभियंत्यांना मुदतवाढ देणे किंवा स्थायी पदावर नेमणूका देणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०८/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६२६ नुसार सर्वश्री अजय शिवराम पांडे, गिरीष एकनाथ चोळके, मधुकर परशराम गव्हाणे, गंगाधर शंकर जाधव, स्वप्नील बाबासाहेब गायकवाड यांना कनिष्ठ अभियंते (स्थापत्य), बांधकाम विभाग व श्री अमृत गंगाधर जगताप, कनिष्ठ अभियंता (मशिनरी व दुरुस्ती देखभाल), प्रसादालय विभाग या पदांवर एक वर्षे कालावधीसाठी एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने संस्थान कामगार कायदेशीर सल्लागार ॲड अशोक पाटील,अहमदनगर यांचे सल्लानुसार नेमणूका करण्यात आहेत.

संबंधीतांचा नेमणूकीचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वेळोवेळी मुदतवाढी देण्यात आलेल्या असून जा.नं.एसएसएस/वशी-०१/३४५/२०१० दि.०२/०२/२०१० अन्वये देण्यात आलेली मुदतवाढीची मुदत दि.०७/१२/२०१० अखेर संपुष्ठात येत आहे.

आता, उपरोक्त श्री.अजय शिवराम पांडे व इतर ०४ कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) यांनी दि.०५/११/२०१० रोजी व श्री. अमृत गंगाधर जगताप कंत्राटी कनिष्ठ अभियंता ( मशिनरी दुरुस्ती व देखभाल ) यांनी २७/१०/२०१० रोजी अर्ज करुन त्यात,"संस्थानचा नवीन आकृतीबंध शासनाने मंजूर केलेला असून त्यानुसार आमचेबरोबर कंत्राटदारामार्फत काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सन.२००६ मध्ये निश्चित मासिक वेतनावर व तद्नंतर सन -२००९ मध्ये मंजूर कर्मचारी आकृतीबंधानुसार, या कर्मचाऱ्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार, काम करीत असलेल्या पदांवर, त्या त्या पदांची वेतनश्रेणी देवून पदस्थापना करुन संस्थान सेवेत कायम करण्यात आलेले आहे. त्याच धर्तीवर आमची शैक्षणिक पात्रता पदांसंबधीत संस्थानमधील कामाचा अनुभव आणि प्रामाणिक व जबाबदारीपूर्वक केलेल्या कामाचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन आम्हांस "कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) " या पदावर पदस्थापना करावी अशी विनंती केलेली आहे.

शासन निर्णय क्र.सासंवि -२००९ /४३३/(३७/०९) का.सोळा,दि.०७/०८/२००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान कर्मचारी आकृतीबंध मंजूर झालेला असून त्यातील कर्मचारी नेमणूकीसंदर्भात अट-शर्त क्र.३. "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी." अशी तरतूद आहे.

आकृतीबंधामध्ये सदर पदाकरीता शैक्षणिक पात्रता "मान्यता प्राप्त विद्यापीठाची D.C.E. / B.E. Civil पदवी पास, MS-CIT, तसेच सदर क्षेत्रातील ०५ वर्षाचा अनुभव अशी नमूद करण्यात आलेली असून सदर पदाची वेतनश्रेणी रु.५५००-९००० (सुधारीत वेतन बॅन्ड रु. ९३००-३४८०० + ४४०० ग्रेड पे) अशी आहे.

सदर मंजूर आकृतीबंधामध्ये बांधकाम विभागाकडे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या हुद्याची एकूण-१३ पदे मंजूर आहेत. सध्या ०३ पदावर कायम कर्मचारी कामे करीत असून सध्या १० पदे रिक्त आहेत.

तसेच मेन्टेंनन्स विभाग विभाग नव्याने निर्माण करण्यात आलेला असून सदर विभागाकडे कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) हे ०३ पदे असून सदरची ०३ पदे रिक्त आहेत.

आकृतीबंधात सदर पदाची शैक्षणिक पात्रता बीई मेकॅनिकल / डी.एम.ई व कन्टीन्युअस प्रोसेस प्लॅट दुरुस्ती देखभालीचा ०५ वर्षाचा अनुभव अशी नमूद करण्यात आलेली आहे. सदर साठी वेतन श्रेणी रु.६५००-१०५०० ( सुधारित वेतन बँड ९३००-४३८०० ग्रेड वेतन रु.४४०० ) अशी आहे.

आकृतीबंधात नमूद केलेप्रमाणे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता सध्या बांधकाम विभागाकडे कार्यरत असलेले अ.नं.०१ ते ०५ कर्मचारी यांचे कडे आहे. तसेच श्री अमृत जगताप कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) यांचकडेही सदर पदासाठीची शैक्षणिक अर्हता आहे.तथापी, उपरोक्त कनिष्ठ अभियंते यांचेकडे आकृतीबंधात नमूद केलेप्रमाणे MS-CIT हि वाढीव शैक्षणिक अर्हता नाही.

उपरोक्त मंजूर आकृतीबंधातील कर्मचारी नेमणूकीबाबत तरतूदी विचारात घेता उपरोक्त ०१ ते ०६ कंत्राटी कनिष्ठ अभियंते यांना 'कनिष्ठ अभियंता 'या पदावर आकृतीबंधामध्ये नमूद केल्याप्रमाणे

सदर पदाची वेतनश्रेणी (सुधारित वेतन बँन्ड ) देऊन पदस्थापना करणेबाबत किंवा सध्या आहे त्याच एकत्रित मानधनावर पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देणेबाबचे प्रस्तावावर विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ अभियंते (स्थापत्य, दुरुस्ती व देखभाल) या पदांवर नेमणूका देण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन कार्यवाही करणेत यावी. जाहिरातीनुसार पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने नेमण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंते यांना पूर्वीचे अटी शतीवर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

---

**विषय नं.८७** **वाहनचालक या पदावर मुदतवाढ मिळणेबाबत श्री जयपाल राज, कंत्राटी वाहनचालक, मुंबई कार्यालय यांचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. जयपाल राज, कंत्राटी पध्दतीने वाहनचालक,मुंबई कार्यालय यांनी दि.०१/१०/२०१० रोजी अर्ज केला असून त्यात "माझी जा.नं.एसएसएस/वशी-०१ /१३६/२००९ दि.०३/०१/२००९ अन्वये कंत्राटी पध्दतीने वाहनचालक या पदावर नेमणूंक करण्यात आलेली आहे. सदर नेमणूंकीची मुदतवाढ दि.०२/०१/२०११ रोजी संपत आहे. सदर पदावर पुन्हा काम करण्याची माझी इच्छा आहे. तरी कृपया पुढील एक वर्षाकरीता मला पुन्हा एक वर्ष मदतवाढ मिळावी" अशी विनंती केली आहे.

श्री. जयपाल राज हे श्री साईबाबा संस्थानचे मुबई कार्यालयाचे आस्थापनेवर वाहनचालक या पदावर काम करीत होते. त्यांचे विहीत वयोमान पूर्ण झाल्यामुळे संस्थान नियमानुसार दि.३१/१२/२००८ चे माध्यान्होत्तर सेवानिवृत्त करण्यात आले होते.

सेवानिवृत्तीनंतर त्यांनी केलेल्या अर्जातील विनंती व मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३६/२००९ दि.०३/०१/२००९ अन्वये दि.०३/०१/२००९ पासून एक वर्ष कालावधीसाठी रु.७०००/- एकत्रित माधनावर कंत्राटी पध्दतीने वाहनचालक या पदावर नेमणूक देण्यात आली. सदरची मुदत संपुष्ठात आल्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/९५८/२०१० दि.२५/०३/२०१० अन्वये दि.०३/०१/२०१० पासून पुढे एक वर्ष आहे त्याच एकत्रित मानधनावर मुदतवाढ देण्यात आलेली मुदतवाढ दि.०२/०१/२०११ अखेर संपुष्ठात येत आहे. श्री. जयपाल राज कंत्राटी पध्दतीने वाहन चालक यांचे आज मितीस वय ६१ वर्षे १० महिने आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम-२००४ नुसार संस्थानचे कामकाज विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचे नियंत्रणाखाली चालते. त्यामुळे संस्थान कामकाजाकरीता मा.अध्यक्ष महोदय यांना वेळोवेळी मुंबई मंत्रालयामध्ये जावे लागते. त्यावेळी मा.अध्यक्ष महोदय यांना वाहनाची / वाहनचालकाची आवश्यकता असते.

श्री. जयपाल राज यांचे मुंबई येथे बरीच वर्षे वास्तव्य तसेच वाहन चालविण्याचे काम केलेले असून त्यांना मुंबई येथील रस्त्याचे, सिग्नलचे सखोल ज्ञान असून ते जबाबदारीने वाहनचालकाचे काम करीत असतात.

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मंत्रालय मुंबई दि.०७/०८/२००९ अन्वये मंजूर झालेल्या आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र.०८. "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही". असा आहे.

वेतनबॅड रु. ५२००-२०२०० + ग्रेडवेतन रु. १९०० नुसार मुंबई कार्यालयाकडे वाहन चालकाचे स्थायी पदावर आकृतीबंधातील नियमानुसार रितसर नेमणूंक केल्यास अशा कर्मचा-यास खालील प्रमाणे वेतन द्यावे लागेल.

वेतन बँन्ड-५८३० + ग्रेडवेतन रु.१९०० =७७३० + महागाई भत्ता ४५% रु. ३४७९ + एचआरए-३० % (मुंबई) २३१९ + वाहतूक भत्ता रु. १०० + स्थानिक पूरक भत्ता रु. २०० + वैद्यकिय भत्ता रु. २५० एकुण रु.१४०७८ /-इतके वेतन + भविष्य निर्वाह निधी रु.७८०/- असे मिळूण एकूण रु. १४८५८/-

श्री. जयपाल राज कंत्राटी पध्दतीने वाहन चालक मंबई कार्यालय यांना सध्या दरमहा एकत्रित मानधन रु. ७०००/- देण्यात येत आहे. म्हणजेच संस्थानची दरमहा रु. ७८५८/- अर्थिक बचत होत आहे.

श्री. जयपाल राज यांची विनंती व उपरोक्त परिस्थिती तसेच आकृतीबंधातील अट क्र.०८ विचारात घेता श्री. जयपाल राज यांना पुढील एक वर्ष मुदतवाढ देणेबाबतचे प्रस्तावावर विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.९३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री जयपाल राज, कंत्राटी वाहनचालक, मुंबई कार्यालय यांना पुर्वीचेच अटी/ शर्तीवर एक वर्ष मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **अहमदनगर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना संस्थानमार्फत द्यावयाचे बेचेंसबाबत मा.उपाध्यक्ष महोदय यांनी पाठविलेले पत्र.**

**प्रस्ताव-** मा. श्री. शंकरराव कोल्हे साहेब, उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी यांनी मा. अध्यक्ष महोदय यांना उददेशून वरिल संदर्भित पत्र पाठविले आहे.

जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या विनंतीनुसार श्री साईबाबा संस्थानने जिल्हा परिषद अंतर्गत येणा-या शाळांना बेंचेसकरीता १० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुसार अहमदनगर जिल्हयातील प्रत्येक तालुकानिहाय शाळांना ठरवुन दिलेल्या बेंचेसची संख्या पाहता ती असंतुलीत वाटते, याबाबत व्यवस्थापन समितीमध्ये चर्चा व्हावी अशी सूचना सदर पत्रामध्ये त्यांनी केलेली आहे.

मा.उपाध्यक्ष महोदय यांना पत्र क्र.एसएसएसटी/वशी-काअ/१०१०६/२०१० दि. २३/१०/२०१० हे पाठवुन अवलोकनार्थ माहिती सादर केलेली आहे.

मा. अध्यक्ष महोदय यांनी सदर विषय मा. व्यवस्थापन समितीपुढे ठेवणेचे निर्देश दिलेले आहेत.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना वाटप केलेले बेंचेस हे जिल्हा परिषद अहमदनगर शिक्षण विभाग (प्राथ.) यांचेकडील जा.क.साटीअ/४०/१० अहमदनगर दि. १९/०६/१० चे पत्रासोबतचे यादीनुसार करणेत येत आहे.

दि.०३/११/२०१० रोजी गोदरेज ॲण्ड बॉइस कं. यांनी पुरवठा आदेशानुसार सर्व ३२५९५ बेंचेस जिल्हा परिषद शाळांना पुरवठा पुर्ण झाल्याचे कळविले आहे. पुरवठा आदेश रक्कम रु.९२३८०९३३/- चा दिलेला आहे. पुरवठयाबाबत सद्यस्थितीचा अहवाल सोबत परिशिष्ट " अ" ने जोडला आहे.त्यानुसार सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र. ९३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदनगर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना संस्थानमार्फत वाटप करण्यात आलेले बेंचेस सर्व तालूक्यांना समान पध्दतीने का वाटण्यात आले नाही तसेच बेंचेस वाटप करण्यासाठी मॉडेल स्कूल कसे ठरविले, मॉडेल स्कूल ठरविण्याचे निकष कोणते? याबाबत माहिती जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडून मागविण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री साईबाबांचे इतर ठिकाणी होणाऱ्या मंदिरात समाधी निर्माण करुन भक्तांमध्ये संभ्रम निर्माण करणाऱ्या ट्रस्ट, मंदिर यावर कारवाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी येथील मंदिरा व्यतीरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी श्री साईबाबांची पवित्र समाधी नाही. देशातून व परदेशातून लाखो साईभक्त शिर्डी येथे श्री साईबाबांचे समाधीचे दर्शनासाठी दररोज येत असतात. मात्र श्री साईबाबांचे समाधीची प्रतिकृती काही मंदिरात उभारणेत आलेली आहे. श्रींची समाधी वेगवेगळ्या ठिकाणी असू शकत नाही. श्री साईबाबांची समाधी फक्त शिर्डी येथेच आहे. विविध ठिकाणी श्रींच्या समाधीची प्रतिकृती असणे व प्रति शिर्डी म्हणून संबोधणे म्हणजे विनाकारण साई भक्तांमध्ये संभ्रम निर्माण होऊन त्याची परिनीती वादविवादात होऊ शकते. कुठल्याही मंदिरास संस्थान व्दारे मान्यता देण्यात आलेली नाही. व याबाबत भक्तांना विनम्र आवाहन , विनंती ( अपिल ) संस्थान मार्फत दैनंदिनीतून , साईलीला मासिकातून वेळोवेळी केले जाते. तसेच ठिक ठिकाणी पत्र व्यवहारही केलेला आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेवून मा. अध्यक्ष सोा. यांनी मा.मुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य यांना पत्र देऊन श्री साईबाबांच्या समाधीची प्रतिकृती काही मंदिरात उभारणेत आली आहे. त्याबाबत संस्थानचा आक्षेप असल्याचे कळविले आहे. श्रींची मूळ समाधी फक्त शिर्डी येथेच आहे. विविध ठिकाणी श्रींच्या समाधीची प्रतिकृती असणे व प्रति शिर्डी म्हणून संबोधने म्हणजे विनाकारण साई भक्तांमध्ये संभ्रम निर्माण होऊन त्याची परिणीती वाद विवादात होवू शकते. ज्या ज्या ठिकाणी अशा प्रतिकृती उभारणेत आलेल्या आहेत. त्याचेवर शासना मार्फत कार्यवाही करावी. शासनाने यासाठी विशेष कायदा करुन शिर्डी येथील श्री साईबाबांचे समाधीचे अभिरक्षण करावे व देशात / परदेशात कुठल्याही ठिकाणी श्रींच्या समाधीची प्रतिकृती करण्यास प्रतिबंध करावा असे दि. २७/१०/२०१० रोजीचे पत्र / निवेदन सादर केलेले आहे.

श्री साईबाबा समाधीची प्रतिकृती होवू नये यासाठी, तसेच ज्यांनी अशी समाधीची प्रतिकृती केली त्यांचेबाबत उचीत कायदेशीर कार्यवाही व्हावी यासाठी शासनास उपरोक्त प्रमाणे कळविणेत आलेले आहे.

तसेच, सदर विषया संबंधी महाराष्ट्र राज्याचे ॲटर्नी जनरल व विधी व न्याय विभाग यांचे सल्ल्यानुसार मे. W.S. Kane & Co.

Churchgate Mumbai,
Advocate Solicitor & Notary
Law & Prudence,
Trade mark & Patent Attorneys.

यांचे सोबत मा.अध्यक्ष सो. व कार्यकारी अधिकारी यांची प्राथमीक चर्चा झाली आहे. सदरची कंपनी ही पेटंट व Copyright इ.क्षेत्रात देशभरात नावाजलेली व फक्त याच पध्दतीचे काम करणारी कंपनी असून त्यांचेकडे याक्षेत्रात काम करणारे निष्णात तज्ञ, वकिल उपलब्ध आहेत. त्यांचे सोबत चर्चा करुन, आपल्याकडील उपलब्ध माहिती त्यांना पुरविण्यात आले नंतर याबाबतीत कोणकोणते कायदेशीर मार्ग अवलंबिता येतील याविषयी पुढील कार्यवाही अपेक्षीत आहे. तरी मे. W.S. Kane & Co. याचे सल्ल्यानुसार पुढील कायदेशीर कार्यवाही करणेस, तसेच कंपनीचे योग्य ते बिल अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र. ९३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांचे इतर ठिकाणी होणाऱ्या मंदिरात समाधी निर्माण करुन भक्तांमध्ये संभ्रम निर्माण करणाऱ्या ट्रस्ट, मंदिर यावर कारवाई करणेबाबत मे. W.S. Kane & Co., चर्चगेट, मुंबई यांचेकडे मा.अध्यक्ष, विश्वस्त यांनी जाऊन त्यांचे सल्ल्यानुसार पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, तसेच या कंपनीस योग्य ते बील आदा करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ संस्थानमधील आऊट सोर्सिंग पद्धत बंद करावी कंत्राटी कामगारांना सेवेत कायम करावे या मागण्यांबाबत.**

**प्रस्ताव-** कंत्राटी कामगारांबाबतचे म्हणणे मांडण्यासाठी दि.१७/११/२०१० रोजी दु.२ वाजता शांततामय मार्गाने संस्थानचे गेट नं.१ येथे मोर्चा आणणार असल्याबाबत काही शिरडी ग्रामस्थांकडून दि.१५/११/२०१० रोजी पत्र देवून कळविण्यात आले होते.

त्यानुसार दि.१७/११/२०१० रोजी दुपारी ४ वाजता शिरडी येथील काही ग्रामस्थ तसेच संस्थानमधील कंत्राटी कामगार मोर्चाने येवून संस्थानचे श्री साईनिवास गेस्टहाऊसमोर त्यांनी सभा घेतली. व कंत्राटी कामगारांच्या मागणीचे लेखी निवेदन दिले.

दि.०७/०८/२००९ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या आस्थापनेवरील एकूण ४८२६ पदांचा आकृतीबंध शासनाकडून मंजूर झालेला असून या मंजूर पदांमध्ये २९०८ स्थायी पदे असून, १९१८ एवढी पदे कंत्राटी पध्दतीची आहेत.

सस्थानमध्ये सध्या अकुशल, कुशल सर्व मिळून पटसंख्येनुसार २१८९ एवढी कंत्राटी कामगारांची पटसंख्या आहे. याशिवाय प्रसादालय विभाग व द्वारावती बिल्डींग याठिकाणी स्वच्छता कामासाठी आऊटसोर्सिंग पध्दत सुरु केलेली आहे.

दि.१७/११/२०१० रोजी मोर्चाधारकांनी दिलेल्या लेखी निवेदनात खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

(१) श्री साईबाबा संस्थानमध्ये नव्याने सुरु होत असलेली अन्यायकारक व जाचक अशी आऊटसोर्सिंग पध्दत बंद करावी.

(२) सन २००० नंतरचे कंत्राटी कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत (फिक्स पे) अथवा मानधनावर कायम करावे. अशी मागणी केलेली आहे.

दि.१७/११/२०१० रोजीचे अगोदर कांही शिरडी ग्रामस्थ व कंत्राटी कामगार यांनी संस्थानचे मा.अध्यक्षसो.यांची समक्ष भेट घेवून तोंडी चर्चेत आऊटसोर्सिंग पध्दत बंद करण्याबाबत मागणी केली आहे.

**निर्णय क्र. ९३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, यापूर्वी आऊट सोर्सिंग पध्दतीने संस्थानमध्ये कामे चालू आहेत, त्याच धर्तीवरती विविध विभागात कामे चालू आहेत. त्यामध्ये कर्मचाऱ्यांचे किमान वेतन पी.एफ. वर्गणी व यापूर्वीच्या सुविधा यामध्ये कोणताही फरक नाही. त्यामुळे जे निर्णय झालेले आहे त्यामध्ये बदल करण्यात येऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ अपघातामध्ये मृत्यू पावलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची अनामत रक्कम त्यांच्या पालकांना परत करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश देते वेळी शासकिय दराने प्रशिक्षण शुल्क घेण्यात येते. त्याच बरोबर रु.५०००/- अनामत रक्कम काही अटींवर परतीच्या बोलीवर घेण्यात येते. प्रशिक्षणार्थ्याने मध्येच प्रशिक्षण सोडून दिल्यास किंवा संस्थेने प्रशिक्षणार्थ्यांच्या गैरहजेरी, गैरवर्तणुक, असमाधानकारक प्रगती याकारणांमुळे प्रशिक्षण पुर्ण होण्या-अगोदर संस्थेतुन नांव कमी केल्यास वरील अनामत रक्कम परत केली जात नाही. मात्र प्रशिक्षण कालावधी पुर्ण करणाऱ्या सर्व प्रशिक्षणार्थ्यांना मग ते उत्तीर्ण होवो अथवा अनुत्तीर्ण होवो, अनामत रक्कम परत केली जाते.

श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश सत्र ऑगस्ट -२००८ मध्ये फिटर व्यवसायात प्रवेश घेऊन प्रशिक्षण घेत असलेला प्रशिक्षणार्थी आंबरे रमेश गोपीनाथ दि.०७/०३/२०१० रोजी मुंबई (कलिना) येथे पोलिस भरतीसाठी (नोकरीसाठी) गेलेला होता. तेथे ०८/०३/२०१० रोजी झालेल्या उमेदवारांच्या चेंगराचेंगरीमध्ये तो मृत्यु पावला आहे.

प्रवेश घेतेवेळी त्याने डिपॉझिट रक्कम पा.नं.१००१ दि.१६/०८/२००८ नुसार रु.५०००/- व टर्म फि पा.नं.३९०० दि.१६/०८/२००८ नुसार रु.८४००/-इतर प्रशिक्षणार्थ्यांच्या रक्कमेबरोबर कॅ.मेमो.नं. ७२६ दि.१६/०८/२००८ नुसार भरलेली आहे.

वरिल प्रशिक्षणार्थ्यांचे पालक श्री. आंबरे गोपीनाथ कृष्णा, मु.पो.लिंगदेव, ता.अकोले, जि. अहमदनगर यांनी त्यांचे मृत मुलाचे नावे संस्थानमध्ये जमा असलेली अनामत रक्कम रु.५०००/- अक्षरी रु. पाच हजार मात्र अर्जदार श्री आंबरे गोपीनाथ कृष्णा यांना मिळणेबाबत विनंती अर्जाने मागणी केलेली आहे.

मयत प्रशिक्षणार्थ्यांच्या कुटुंबियांना विशेष बाब म्हणून संस्थानकडून रु.१,००,०००/- (एक लाख मात्र.) अनुदान देणेचा निर्णय मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१८/०४/२०१० रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं. ४४३ नुसार ठरलेली आहे.

अपघाताने मयत प्रशिक्षणार्थीची अनामत रक्कम विशेष बाब म्हणून परत करणेबाबत निर्णय होणेसाठी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये सादर.

**निर्णय क्र.९३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, अपघातामध्ये मृत्यू पावलेल्या प्रशिक्षणार्थी कै. रमेश गोपीनाथ आंबरे यांचे पालक श्री आंबरे गोपीनाथ कृष्णा यांना विशेष बाब म्हणून संस्थानकडे जमा असलेली अनामत रक्कम रु.५,०००/- परत करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५ आर्थोस्कोप सेटमधील Shaver Motor दुरुस्तीबाबत.**
**निर्णय क्र.९४० सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०६ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदी बाबत.**
**निर्णय क्र.९४१ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०७ लिक्वीड सोप, सेंटेड फिनेल बनविणेसाठी केमिकल खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे स्वच्छता विभाग, प्रसादालय विभाग, रुग्णालय विभाग यांना साफ-सफाई करणेसाठी लिक्विड सोप व सेंटेड फिनेलची मोठया प्रमाणावर गरज भासते. याकरीता या विभागांना लागणारे मटेरीयल कनकुरी साठवण तलाव येथे तयार करण्यात येते. यासाठी लागणारे केमिकल्स (कच्चा माल) खरेदी करुन त्यापासून लिक्विड सोप व सेंटेड फिनेल तयार करण्यात येत आहे. वरील विभागांना सदरचे मटेरीयल वर्षभर पुरविणेसाठी ते तयार करणेसाठी लागणारे मटेरीयल सन २००९-२०१० चे वार्षिक खरेदीमध्ये खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात आलेले होते.

खरेदी करण्यात आलेले केमिकल संपलेले आहे. त्यातच संस्थानचा वाढता व्याप लक्षात घेता पुन्हा लिक्विड सोप व सेंटेड फिनेल तयार करण्यासाठी केमिकल्स खरेदी करावे लागणार आहे.

सन २०१०-२०११ चे पाणी पुरवठा विभागाची प्लंबींग व इतर साहित्याचे यादीत सदर मटेरियलचा समावेश करण्यात आलेल्या नसल्याने दि.१९.०७.२०१० चे टिपणीन्वये मान्यता घेऊन सदर साहित्याचा समावेश सन २०१०-२०११ चे वार्षिक खरेदी यादीत करणेसाठी मान्यता घेण्यात आलेली होती. परंतू खरेदी विभागामार्फत उपरोक्त संदर्भान्वये सदर प्रस्तावास लेखाधिकारी यांची मान्यता घेऊन खरेदीचा खर्च अंदाजे रु.४ लाख ३० हजार मात्र असल्याने व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेण्याचे सुचविण्यात आलेले आहे.

तरी संबंधीत विभागांना दैनंदिन वापराकरीता लिक्विड सोप पुरविणे गरजेचे असल्याने त्यासाठी खालील तक्त्याप्रमाणे केमिकल्स (कच्चा माल) तातडीने खरेदी करावा लागेल.

कनकुरी साठवण तलाव- लिक्विड सोप व सेंटेड फिनेल बनविणेसाठी आवश्यक केमिकल्स (कच्चा माल) मटेरियलची वार्षिक मागणी सन २०१०-२०११.

| अ.नं. | मटेरियलचा तपशील | गुणवत्ता | मागणी सन २०१०-२०११ | अंदाजे दर | अंदाजे एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टी.आर.ओ. ऑईल | ७५% | १००० किलो | ७०.०० | ७०,०००/- |
| ०२ | पाईन ऑईल | A ग्रेड | २००० लिटर | १२०.०० | २,४०,०००/- |
| ०३ | ॲसीड स्लरी | ७५% | १५०० किलो | ८०.०० | १,२०,०००/- |
| | | | | अंदाजे एकूण किंमत- | ४,३०,०००/- |

तरी लिक्विड सोप व सेंटेड फिनेल तयार करण्यासाठी आवश्यक केमिकल्स (कच्चा माल) खरेदी करण्यासाठी अदांजे रु.४,३०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी उपरोक्त मटेरियल खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदी करुन मिळणेस तसेच त्यासाठी येणारे रु.४,३०,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.९४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणीपुरवठा विभागासाठी लिक्विड सोप व सेंटेड फिनेल तयार करण्यासाठी आवश्यक केमिकल्स (कच्चा माल) विहित पध्दतीने कोटेशन्स मागववून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,३०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८ काजु पाकळी बाजारभाव वाढल्याने वार्षिक टेंडर दरात दरवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रसादालयासाठी सन २०१०-११ मध्ये २०० क्विंटल काजु पाकळी वार्षिक टेंडर दर प्रति किलो रु.३००/- +१२.५ टक्के व्हॅट (रु.३३७.५०) दराने आवश्यकतेनुसार पुरविणेकामी इकडील जा. नं.६०६२/१० दि.१९.०४.२०१० अन्वये मे.श्री.गणेश ड्राय फ्रुटस, पुणे यांना पुरवठा आदेश देणेत आलेला असून ते मालाचा पुरवठा करीत आहेत.

तथापि मे.श्री.गणेश ड्राय फ्रुटस, पुणे यांनी त्यांचेकडील दि.१०.१०.२०१० चे पत्रान्वये काजूचे बाजारभावात मोठ्या प्रमाणात दर वाढ झाल्याने दर प्रती किलो रु.४५०/- पर्यंत वाढले असल्याने बाजारभावानुसार दर वाढ देणेबाबत विनंती केली आहे. त्यांनी माल पुरवठा आज अखेर चालु ठेवला आहे.

पुरवठा आदेशातील शर्त/अट क्र.१३ नुसार अशाप्रकारे दरवाढ देता येणार नाही. पंरतू वार्षिक दरात ३५% ते ५०% दरवाढ झालेली दिसते. सन २०१०-११ माल पुरवठा निविदेमध्ये ज्या पुरवठादारांचे काजु पाकळीचे नमुने निवडले गेले त्या खालील निविदाधारकांकडे आज रोजी काजू पाकळी दरांबाबत दुरध्वनीवरुन चौकशी केली असता त्यांना दिलेला दरांचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| अ. ां. | पुरवठादारांचे नांव | दर प्रती किलो व्हॅटसह | सरासरी वाढ |
|---|---|---|---|
| ०१. | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव | रु.४३५.९३ | रु.४१८/- |
| ०२. | मे.सुरेश पुनमचंद बागमार, पुणे | रु.४००.०० | |

बाजारभावाचे दराचा तुलनात्मक विचार करता वार्षिक टेंडर दरामध्ये प्रति किलो सरासरी रु.११८/- दरवाढ झालेली दिसते. सदरची दरवाढ ३५% आहे. त्यांचे अर्जानुसार दरवाढ द्यावयाची झाल्यास नोंव्हेबर-१० ते मार्च -११ अखेर पुरवठा होणाऱ्या अंदाजे ८० क्विंटल मालासाठी रु.९,४४,०००/- जादा खर्च अपेक्षित आहे.

तरी मे.गणेश ड्रायफ्रुटस, पुणे यांचे काजू पाकळी टेंडर दरवाढ मागणी पत्र योग्य त्या निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.९४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, काजु पाकळी बाजारभाव वाढल्याने वार्षिक टेंडर दरात दरवाढ करणेबाबत मे.गणेश ड्रायफ्रुटस, पुणे यांची विनंती अमान्य करण्यात यावी. काजू पाकळी खरेदीकामी नवीन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९ श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय, शिर्डी यांचे मासिक भोजन शुल्क आकारणीवर फेर विचार होणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.०६/०३/२०१० चे सभेतील निर्णय क्र.३०६ नुसार प्र.शा.जा.नं. एसएसएस/वशि/प्रसादा/७३७०/१० दि.१९/०५/२०१० चे पत्रान्वये श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय, शिर्डी मधील प्रती विद्यार्थ्यांस दोन वेळचे भोजनासाठी दरमहा रु.४५०/- शुल्क भरुन भोजन घेऊन जाणेस परवानगी देणेत आलेली होती. मात्र सदर संस्थेने दि.१६/०६/२०१० चे विनंती पत्राद्वारे कळविले होते की, आमचे संस्थेत एकूण ९९ विद्यार्थी असून त्यांचेसाठी दरमहा प्रति विद्यार्थी रु.४५०/-

शुल्क भरणे परवडणारे नाही. तरी ७५ अनुदानीत विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी रु.२११/- दर आकारावा व विनाअनुदानीत २४ विद्यार्थ्यांसाठी निशुल्क भोजन मिळावे.

श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय यांचेकडील दि.१६/०६/२०१० चे अर्जाद्वारे केलेल्या मागणीबाबत विचार होणेसाठी मा.व्यवस्थापन समिती दि.०७/०८/२०१० चे सभेपुढे विषयाची टिपणी निर्णयार्थ सादर करण्यात आलेली होती. सदर टिपणीवर दि.०७/०८/२०१० चे सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय यांनी दि.१६/०६/२०१० चे अर्जाद्वारे केलेली विनंती अमान्य करण्यात आलेली आहे. सदर निर्णयानुसार श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय, शिर्डी यांना इकडील जा.नं.एसएसएस-वशि/प्रसादा/९६४६/१० दि.२८/०९/२०१० चे पत्राद्वारे विनंती अमान्य करणेत आलेबाबत व इकडील व जा.नं.एसएसएस-वशि/प्रसादा/७३७०/१० दि.१९/०५/२०१० चे पत्रानुसार खालीलप्रमाणे रक्कम लेखाशाखेत जमा करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

| अ.नं. | कालावधी | विद्यार्थी संख्या | दरमहा प्रति विद्यार्थी दर रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | १५/०६/१० ते १४/०७/१० = ०१ महिना | ९७ | ४५०/- | ४३,६५०/- |
| ०२. | १५/०७/१० ते १४/११/१० = ०४ महिने | ९९ | ४५०/- | १७८,२००/- |
| | | | **एकूण =** | **२,२१,८५०/-** |

श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय शिर्डी यांनी दि.०५/१०/२०१० चे पत्राद्वारे संस्थेतील मुकबधीर विद्यार्थी-विद्यार्थीनींना भोजन शुल्क दर कमी करणेबाबत सहानुभूतीपूर्वीक फेरविचार होणेबाबत विनंती केलेली आहे. सदर पत्रावर मा.श्री डॉ.एकनाथराव गोंदकर, मा.व्यवस्थापन समिती सदस्य यांनीही उपरोक्त विषयाचे संदर्भात पुनश्च विचारार्थ विषय मा.व्यवस्थापन समिती दि.१०/१०/२०१० चे सभेपुढे ठेवावे असे सुचित केलेले आहे.

श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय, शिर्डी यांनी दि.०५/१०/२०१० चे पत्राद्वारे विनंती केलेली आहे की, दि.०७/०८/२०१० चे सभेतील निर्णयापासून अनुदानित व विनाअनुदानीत एकूण ९९ विद्यार्थ्यांसाठी दरमहा प्रति विद्यार्थी रु.४५०/- ऐवजी रु.२२५/- प्रमाणे आकारणी करावी अशी मागणी केलेली आहे.

तरी श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय शिर्डी यांचेकडील दि.०५/१०/२०१० चे पत्रान्वये प्रति विद्यार्थी मासिक भोजन आकार रु.४५०/- ऐवजी रु.२२५/- करावी या मागणीचा फेरविचार होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.९४४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईश्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय शिर्डी यांना दि.०७.०८.२०१० पासून प्रति विद्यार्थी मासिक भोजन आकार रु.४५०/- ऐवजी रु.२२५/- करण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१० श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे मा.पंतप्रधान राष्ट्रीय सहाय्यता निधी योजनेअंतर्गत इन्स्पेक्शन.**
**निर्णय क्र.९४५ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११ श्रीसाईबाबा हॉस्पिटमध्ये आंतराष्ट्रीय तज्ञांमार्फत Mitral And Aortic valve repair workshop आयोजित करणेबाबत.**
**निर्णय क्र.९४६ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२ फुल टाईम कार्डीयाक सर्जनच्या ऑपरेटीव व ओ.पी.डी.कामकाजाबाबत सुधारित वेळापत्रक लागु करणेबाबत.**
**निर्णय क्र.९४७ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१३ आय.टी.आय.येथील दूरध्वनी विस्तारीकरणाबाबत.**
**प्रस्ताव-** प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण केंद्र यांनी आय टी आय येथील इमारतीमध्ये नविन सहा ठिकाणी अंतर्गत दुरध्वनी बसवून मिळणेबाबत कळविलेले आहे. त्यानुसार प्रत्यक्ष पहाणी केली असता, दुरध्वनी विस्तारीकरणासाठी खालीलप्रमाणे साहित्य खरेदी करावे लागणार आहे.

| Sr. No. | Description | Qty. | Approx. Rate | Approx. Price |
|---|---|---|---|---|
| 01. | Telephone cable 2 pair (0.5mm Polly cab copper) in provided conduit | 700 Mtr. | 08.00 per mtr. | 5600 |
| 02. | Telephone socket modular (with surface box & plate)Anchor Roma | 15 Nos. | 140.00 | 2100 |
| 03. | Casing capping 25 mm. (Modi Co.) | 250 mtr. | 14.00 | 3500 |
| 04. | Junction box for 50 pair with crone module | 1 Nos. | 6000 | 6000 |
| 05. | Junction box for 10 pair with crone module | 2 Nos. | 650 | 1300 |
| 06 | Instalation Charges (Cable leying with saddle, Casing Caping DP Box Feeting Turmination & Testing etc. | 1 | 1 | 10000 |
| TOTAL | | | | 28500 |

तरी, आय टी आय येथील अंतर्गत दुरध्वनी विस्तारीकरणासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये २८,५००/- + कर पर्यंतच्या खर्चास विहित पध्दतीने कोटेशन मागवून न्यूनत्तम कोटेशनधारकाकडून करुन घेणेची मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.९४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे आय टी आय येथील अंतर्गत दुरध्वनी विस्तारीकरणासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये २८,५००/- + कर पर्यंतच्या खर्चास तसेच विहित पध्दतीने कोटेशन मागवून न्यूनत्तम कोटेशनधारकाकडून करुन घेणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **निदेशक भरती लेखी परिक्षा सिलबंद पाकिटे उघडून निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये खालील प्रमाणे निदेशक पदे भरतीसाठी वृत्तपत्रात जाहीरात देण्यात आली. तसेच शासनाच्या सेवा योजन कार्यालयाकडे याबाबत माहीती देऊन त्यांचेकडूनही उमेदवारांच्या यादया मागविण्यात आल्या.

| अ. नं. | ट्रेड | पदसंख्या | नेमणूक आरक्षण | देण्यात येणारे संकलित वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रॅमिंग असिस्टंट (COPA) | २ पुर्णवेळ | अ.जा.(ST) | १२०००/- |
| ०२ | क्राफ्टसमन फुड प्रॉडक्शन (व्हेज ) | १ पुर्णवेळ | वि.मा.प्र.(SBC) | |
| ०३ | आय.टी.ॲण्ड ई.एस.एम. निदेशक | १ पुर्णवेळ | ई.मा.व (OBC) | |

अर्ज केलेल्या उमेदवारांची अर्जाची छाननी करुन शैक्षणिक अर्हता व आरक्षणानुसार संवर्ग यानुसार खालीलप्रमाणे उमेदवारांना लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेसाठी दि.२९/१०/२०१० रोजी बोलविण्यात आले.

| अ. नं. | ट्रेड | बोलविण्यात आलेले उमेदवार | प्रत्येक्ष उपस्थित उमेदवार |
|---|---|---|---|
| ०१ | कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रॅमिंग असिस्टंट (COPA) | १५ | ०१ |
| ०२ | आय.टी.ॲण्ड ई.एस.एम. निदेशक | २७ | ०९ |

वरील पैकी क्राफ्टसमन फुड प्रॉडक्शन (व्हेज ) या पदासाठी आरक्षण श्रेणी मधुन एकही अर्ज किंवा शासनाच्या सेवा योजन कार्यालयाकडुन नांव प्राप्त झालेले नाही. त्यामुळे यापदार सध्या तात्पुरत्या सेवत कार्यरत आसलेले श्री प्रशांत प्रभाकर सोनवणे यांना प्रस्तावित पद भरती कार्यक्रमा अंतर्गत ठरलेले रु.१२०००/- दरमहा वेतनावर पुढील कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक देता येईल.

प्राप्त झालेल्या अर्ज व यादी नुसार घेतलेल्या दोन पदांच्या तीन जागांसाठी परीक्षेसाठी मा.सहसंचलाक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,प्रादेशिक कार्यालय नाशिक यांचेकडून लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका मागवून वापरण्यात आली. तसेच प्रात्यक्षिक परीक्षेसाठी मा.सह संचालीका,तंत्र शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना विनंती करुन प्रात्यक्षिक तंज्ञ बोलविण्यात आले. त्यांनी शासकिय तंत्रनिकेतन,अंबड जि.औरंगाबाद येथील इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विभाग प्रमुख मा.श्री आप्पासाहेब.एस.अबक,यांना परीक्षेसाठी पाठविण्याची व्यवस्था केली.

यानुसार १०० गुणांची, ०२ तासांची, १०० बहुपर्यायी प्रश्नासह (मराठी,इंग्रजी,बुध्दीमत्ता चाचणी व सामान्यज्ञान) लेखी परीक्षा तसेच ८० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये घेण्यात आली.

परीक्षेच्या गुणमुल्यांकन यादयासह अनुषंगिक सर्व कागदपत्रे परीक्षेच्या दिवशी सिलबंद करुन ठेवली असून सदर सिलबंद पाकीट मा.व्यवस्थापन समितीच्या समोर उघडून निर्णय होणेसाठी सादर.

**निर्णय क्र.९४९ परीक्षेच्या गुणमुल्यांकन यादयासह अनुषंगिक सर्व कागदपत्रे परीक्षेच्या दिवशी सिलबंद करुन ठेवण्यात आलेले सिलबंद पाकीट पाकीटे आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. यानुसार पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/प्राचार्य,आय.टी.आय)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५ गुंतवणूकीबाबत निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** माहे डिसेंबर,२०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, खंडाळा | ०१/१२/२०१० | ४,०७,४६,३१२.०० |
| २) | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, श्रीरामपूर | ०१/१२/२०१० | ५,६५,९२,१००.०० |
| ३) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे डिसेंबर २०१० अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | ५,००,००,०००.०० |
| | | **एकूण रक्कम -** | १४,७३,३८,४१२.०० |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम रु. १४.७३ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
३) आंध्र बँक, शिर्डी
४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
६) बँक ऑफ बरोडा, नासिक
७) बॅंक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
८) विजया बँक, शिर्डी
९) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
११) कॅनरा बँक, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते ११ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु.१४.७३ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.९५० यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं.०१ ते ११ या बँकांकडून जसजशी गुंतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते ११ बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम दैनंदिन खर्च वजा जाता टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १६ मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.९५१ मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**०१.** श्री साईभक्तांकडून ऑनलाईन देणगी स्विकारणेसाठी सध्या एच.डी.एफ.सी. बँक व एक्सीस बँकेचा पेमेंट गेटवे व त्यांची नेट बँकींग सुविधा उपलब्ध आहे. या पेमेंट गेटवेसाठी या बँका १.६ % बँक आकार लावत आहे. तसेच नेट बँकींग सुविधा यासोबत मोफत पुरवित आहेत. ऑनलाईन देणगी स्विकारणेसाठी आय.सी.आय.सी.आय. बँकेकडून त्यांचा दि.२० नोव्हेंबर २०१० चा प्रस्ताव संस्थानला सादर करण्यात आला. या प्रस्तावामध्ये एच.डी.एफ.सी. बँक व एक्सीस बँक यांच्याप्रमाणेच १.६% बँक आकार लाऊन पेमेंट गेटवे पुरविला जाईल त्यासोबत

नेट बँकींगची सुविधा मोफत पुरविली जाईल. नेट बँकीगमध्ये त्यांच्याशी संलग्न असलेल्या इतर २० बँका सुध्दा जोडलेल्या आहेत. या सर्व बँकांद्वारे येणारी देणगी संस्थानला मोफत दिली जाईल. तसेच जमा होणारी रक्कम प्रत्येक दिवशी संस्थानच्या स्टेट बँक शिर्डी या शाखेत जमा केली जाईल, असे कळविले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन आय.सी.आय.सी.आय. बँक खाजगी क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक असून तिची ग्राहक संख्या ही मोठी आहे. त्यांचा पेमेंट गेटवे इतर दोन बँकांसोबत सुरु केल्यास भक्तांना देणगी देणे अधिक सोयीचे होईल. तसेच या बँकेसोबत इतर २० बँका सलग्न असल्याने त्या बँकांची नेट बँकींग सुविधाही संस्थानला प्राप्त होईल. तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७.०७.२००८ चे सभेमधील निर्णय क्र.४२६ (२) मध्ये नमुद केलेप्रमाणे "नामांकित बँका अगर संस्था यांच्याकडून पेमेंट गेटवेसाठी येणारे सुरक्षित व संस्थानला फायदेशीर असणारे प्रस्ताव स्विकारणेत यावेत व त्याचा ऑनलाईन देणगीसाठी साईभक्तांना उपयोग करुन द्यावा", असा निर्णय झालेला आहे. यानुसार मा.व्यवस्थापन समितीने आय.सी.आय.सी.आय. बँकेचा संस्थानला प्राप्त झालेला पेमेंट गेटवेचा प्रस्ताव इतर दोन बँकांप्रमाणेच १.६% बँक आकार व त्यावरील कर याप्रमाणे सुरु करणेस मान्यता देण्यात आली आहे. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**०२.** दिवसेंदिवस प्रसाद लाडूची मागणी वाढत आहे, याकरिता यापूढे प्रसाद लाडू तयार करणेकामी दोन ठेकेदारांची नेमणूक करण्यात यावी. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**०३.** श्री सुरेश वाधवा, मुंबई यांनी म्यूझियम हॉलमध्ये देणगी म्हणून देऊ केलेली ग्रिल किंवा काच बसविणेकामी मा.विश्वस्त श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे,मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी समक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा.
(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/अधिक्षक,मंदीर)

**०४.** संरक्षण विभाग प्रमुख या पदावर सेवानिवृत्त लष्करी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात यावी.
(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**०५.** जुन्या प्रसादालयात पडून असलेल्या डिश वॉशिंग मशिन व अन्य मशिनरींची जाहिर लिलावाने विक्री करण्यात यावी. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**०६.** समाधि मंदीरात गर्दीचे वेळेस समाधीस काच लावणेबाबत परिस्थितीनूरुप मंदिर प्रमुख यांनी निर्णय घ्यावा. (कार्यवाही-अधिक्षक, मंदीर/ संरक्षण विभाग प्रमुख)

वरील निर्णय क्र ८४९ ते ९०६ व ९०८ ते ९५१ सर्वानुमते व निर्णय क्र.९०७ बहुमताने घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)